**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | चंद्रकांत रंगनाथ काळे, | : | अपिलार्थी |
| | २१, चैतन्य गुरुनगर, सिडको, एन-८, एफ-४, औरंगाबाद | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद | | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - चंद्रकांत रंगनाथ काळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, | : | अनुपस्थित |
| | महानगरपालिका, औरंगाबाद | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-०१-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांनी त्यांच्या दिनांक ०२-११-२०१० च्या माहिती अर्जान्वये कलम २३ व २१ अन्वये नारळीबाग भूखंडाचे आरक्षण कायदेशीर झाल्याची माहिती व कागदपत्रे मागितली आहे. त्यांना आतापर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती व कागदपत्रे मिळाली नाहीत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित आयोगास दिसून येत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०४-१२-२०१० च्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आयोगास दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणात विशेष बाब म्हणून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेण्याकरिता आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून आयोगातर्फे निश्चित करण्यात येत आहे. याकरिता प्रकरण त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. चंद्रकांत रंगनाथ काळे, २१, चैतन्य गुरुनगर, सिडको, एन-८, एफ-४, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रणजीत एच. मनोरे, : अपिलार्थी
रेल्वेस्टेशन, जहागीरदार कॉलनी, मुजीब सर्व्हिसिंग सेंटरच्या बाजूला, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह कृषि अधीक्षक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/००९७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सह कृषि अधीक्षक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०१-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन तसेच अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रणजीत एच. मनोरे, रेल्वेस्टेशन, जहागीरदार कॉलनी, मुजीब सर्व्हिसिंग सेंटरच्या बाजूला, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सह कृषि अधीक्षक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन बी. पाटील, : अपिलार्थी
एल सेक्टर ८०/१, छत्रपती शिवाजीनगर, हडको, एन-९,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५००
२ सुनावणीची तारीख दि. ०५-०१-२०१२
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी - श्री. गजानन बी. पाटील : उपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
- श्री. म. हि. पाटील
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
- श्री. सं. दे. बाविस्कर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०५-०८-२०१०
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. ०२-०९-२०१०
६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. ०२-०९-२०१०
७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. ३०-०९-२०१०
८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०१-१२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांच्या माहिती अर्जान्वये त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी बहुतांश माहिती जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी त्यांना दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी झाली त्यावेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रथम अपील निर्णयानुसार उर्वरीत माहिती मिळाली आहे. त्यांना फक्त मुद्दा क्रमांक सहा मधील परिच्छेद एक मधील काही माहिती मिळाली असून खालील माहिती मिळाली नाही.

त्रयस्थ श्री. नागलोत देविदास रामलाल, माजी कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या-बाबत झालेल्या मालमत्तेच्या गुप्त चौकशी अहवालाची प्रत, त्यांनी दिलेल्या जबाबाची प्रत ही माहिती देण्यात आलेली नाही. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी कलम ८ (१) (ज) अन्वये नाकारली आहे व जन अपिलीय अधिकारी यांनी 8 (1) (j) अन्वये नाकारली आहे. त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी आयोगापुढे असे सादर केले की कलम २२ नुसार व कलम ८ (१) (ज) च्या परिच्छेद दोन नुसार ही माहिती त्यांना देय होत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे. तथापि जी माहिती नाकारली आहे. (मुद्दा ६ परिच्छेद १ मधील अंशतः माहिती) त्याचा उल्लेख युक्तिवादामध्ये त्यांनी केला आहे. ती त्रयस्थाच्या मालमत्तेच्या संबंधी आहे. कलम ८ (१) (ज) नुसार खाजगी बाबीत अगंतूक हस्तक्षेप होत असल्याने ती देण्यात आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी घेतलेला निर्णय कलम 8 (1) (j) अन्वये योग्य असल्याचा निर्णय दिला आहे.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी लेखी युक्तिवाद सादर केले आहेत. तसेच त्यांनी आयोगापुढे त्यांची बाजू मांडलेली आहे. वरील युक्तिवाद विचारात घेऊन आयोगाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये विस्तृत अशी नऊ मुद्दयावर माहिती मागितली आहे. बहुतांश माहिती ही त्रयस्थाबाबत मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या या माहिती अर्जाबाबत दिनांक ०२-०९-२०१० रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविलेले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०९-२०१० च्या प्रथम अपिलावर सुनावणी

घेऊन दिनांक २०-०९-२०१० रोजी निर्णय दिला आहे. युक्तिवादात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री. नागलोत देविचंद यांच्या गुप्त अहवालाची जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 8 (1) (j) नुसार नाकारलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मागितलेली सर्व माहिती मिळालेली असून त्याबाबत त्यांचे समाधान झाले आहे. तथापि त्यांना त्रयस्थ श्री. नागलोत देविचंद यांच्या मालमत्तेचा गुप्त अहवाल प्राप्त झाला नाही व तो देण्यात यावा कारण ही बाब गोपनीय नसून कलम २२ नुसार तसेच कलम ८ (१) (ज) च्या परिच्छेद दोन नुसार त्यांना देय होत आहे, असा युक्तिवाद अपिलार्थी यांनी केला आहे. तथापि अपिलार्थी त्रयस्थाची वैयक्तीक माहिती मागत आहेत. त्यात जनहित आहे ही बाब ते आयोगापुढे सिध्द करु शकले नाहीत. मालमत्तेचा तपशील इत्यादीची मागणी करणे ही बाब त्रयस्थाच्या खाजगी बाबीत अगंतुक हस्तक्षेप करणारी आहे. त्यामुळे अशी माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 8 (1) (j) नुसार देय होत नाही. तसेच अपिलार्थी यांनी माहिती देण्यासाठी उल्लेख केलेले कलम २२ विचारात घेत असताना सुध्दा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या तरतुदी विचारात घेणे आवश्यक ठरते. अपिलार्थी हे त्यांना माहिती देण्यासाठी व्यापक जनहित असल्याची बाब सिध्द करु शकले नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याचा घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन बी. पाटील, एल सेक्टर ८०/१, छत्रपती शिवाजीनगर, हडको, एन-९, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपिलार्थी
हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विद्युत अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
विद्युत विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विद्युत अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>विद्युत विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास त्यांना माहिती मिळाली नसल्याचे तसेच त्यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे सांगितले.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी, विद्युत विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी, विद्युत विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजील, टाऊन हॉल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विद्युत अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, विद्युत विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहंमद अब्दुल फहीम, : अपिलार्थी

फ्लॅट नं. २, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

कार्यकारी अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी, :

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५०२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०-०७-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २४-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६-१०-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-१२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २०-०७-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती ही गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनस्त कार्यरत तीन प्रादेशिक व दहा मंडळ कार्यालयाच्या संबंधित असल्याने ही माहिती परस्पर प्राप्त करुन घ्यावी असे दिनांक २२-०७-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे. माहिती प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २२-१०-२०१० रोजी निर्णय दिला की, महामंडळ मुख्य कार्यालयाची माहिती आठ दिवसाच्या आत देण्यात यावी तसेच मंडळ कार्यालयाअंतर्गत असलेल्या सर्व विभागाची माहिती त्या त्या मंडळ कार्यालयानी संकलीत करुन द्यावी. घरभाडे भत्त्याबद्दलची माहिती आपआपल्या विभागामार्फत प्रमाणपत्रासह अर्जदारास उपलब्ध करुन द्यावी. जन अपिलीय अधिकारी यांनी सदर निर्णय घेताना अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विविध कार्यालयाशी संबंधित होती व त्या कार्यालयात जन माहिती अधिकारी निश्चित केले आहेत व अपिलार्थी यांनी त्या जन माहिती अधिका-याकडे अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घेणे अपेक्षित होते ही बाब विचारात घेतली नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती यापूर्वी अपिलार्थीस दिली नसल्यास ती तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठविण्यात यावी. तसेच अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ज्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे त्या कार्यालयाकडे अपिलार्थी यांनी स्वतंत्रपणे अर्ज करुन माहितीची मागणी करावी या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०५-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहंमद अब्दुल फहीम, फ्लॅट नं. २, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अंबादास राजाराम तळणकर,<br>एन-११, सी-४, गजानन नगर, हडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क औरंगाबाद यांचे कार्यालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद<br>- श्री. पी. व्ही. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद<br>- श्री. अर्जुन नाना ओहोळ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५-१०-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये त्यांच्या कार्यालयात जात प्रमाणपत्राआधारे किती अधिकारी व कर्मचारी काम करत आहेत इत्यादीबाबतच्या प्रमाणपत्राची अशी एकूण चार मुद्दयावर माहिती मागितली आहे. ही माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला व दिनांक २६-११-२०१० च्या पत्रान्वये अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी माहिती व्यक्तिशः घेतली आहे आणि त्याची पोच दिनांक ३०-११-२०१० ला दिली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांच्या व्दितीय अपिलावरुन त्यांना माहिती मिळाली आहे असे दिसून येत आहे. तथापि संबंधित कार्यालयातील कर्मचा-यांचे सेवापुस्तिका व जात वैधता प्रमाणपत्राबाबत असे मोघमपणे नमूद केले आहे. अपिलार्थी यांना नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंबादास राजाराम तळणकर, एन-११, सी-४, १/२, गजानन नगर, हडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गिरीष सुरेशराव गायकवाड, | : | अपिलार्थी |
| हॉटेल आशिर्वाद समोर, मटन मार्केटच्या बाजूला, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी, | : | |
| नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५०४ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०९-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक १५-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गिरीष सुरेशराव गायकवाड, हॉटेल आशिर्वाद समोर, मटन मार्केटच्या बाजूला, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, नगर रचना विभाग, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सिध्दार्थ रामराव पवार, : अपिलार्थी
प्रशांत केशवराव म्हस्के, प्लॉट नं. २६ संगिता कॉलनी,
भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद - ४३१ ००२

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सिध्दार्थ रामराव पवार | : | उपस्थित |
| | अपिलार्थी - प्रशांत केशवराव म्हस्के | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी एक अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

पुढील सुनावणी दिनांक २२.२.२०१२ रोजी ११.०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२.२.२०१२ रोजी ११.०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिध्दार्थ रामराव पवार, प्रशांत केशवराव म्हस्के, प्लॉट नं. २६ संगिता कॉलनी, भावसिंगपुरा रोड, औरंगाबाद - ४३१ ००२.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. शिवाजी हायस्कूल, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लईक शफीयोद्दीन शेख,<br>३३६, अमीन प्रा. शाळेजवळ, आसेफिया कॉलनी, घाटी, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद क्रमांक १, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद क्रमांक १, औरंगाबाद - श्री. एम. एल. कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी. बी. देशपांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-१०-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८-१०-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०९-२०१० च्या माहिती अर्जान्वये ०१ सप्टेंबर २००७ ते ३१ ऑगस्ट २०१० अशा विस्तृत कालावधीची त्रयस्थ व्यक्तींनी कोणकोणती मिळकत खरेदी अथवा विक्री केलेली आहे याची दस्तावेजासह छायांकीत प्रतीसह अशी माहिती मागितली आहे. त्याचप्रमाणे इतर दोन मुद्दयावर माहिती मागितली आहे. यावर प्रथम प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत दिनांक २८-०९-२०१० ला दिला असून माहिती प्राप्त करण्याकरिता त्यांच्या विभागाने निश्चित केलेले दर कळविले आहे. त्याचप्रमाणे कार्यालयाचे अभिलेखे पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील असेही कळविले आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ नुसार जर विभागाने पूर्वी दर निश्चित केले असतील तर त्या दराने माहिती उपलब्ध होईल ही बाब स्पष्ट होत आहे. या पार्श्वभूमीवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने / विभागाने निश्चित केलेल्या दराप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी तसेच माहितीच्या प्रती देय होत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद क्रमांक १, औरंगाबाद यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसेच पाहणीचा दर व छायांकित प्रती देण्याकरिता त्याचा प्रतिपृष्ठ दर इत्यादी पुन्हा एकदा अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणी केल्यानंतर मागणी केलेल्या दस्तावेजाची मागणीकरिता जन माहिती अधिकारी यांनी निश्चित केलेल्या दराने शुल्क भरुन घेऊन माहितीच्या प्रती देण्याची व्यवस्था करावी ही कार्यवाही एक महिन्याच्या आत पूर्ण करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन तसेच पाहणीचा दर व छायांकित प्रती देण्याकरिता त्याचा प्रतिपृष्ठ दर इत्यादी पुन्हा एकदा अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या विभागाने निश्चित केलेल्या दराने शुल्क भरून घेऊन छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी.

ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लईक शफीयोद्दीन शेख, ३३६, अमीन प्रा. शाळेजवळ, आसेफिया कॉलनी, घाटी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, औरंगाबाद क्रमांक १, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अ. जावेद अ. वाहेद,<br>भाजी मंडई, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/१५०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२-१०-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५-११-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७-१२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-१२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

पुढील सुनावणी दिनांक २२.२.२०१२ रोजी ११.०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२.२.२०१२ रोजी ११.०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अ. जावेद अ. वाहेद, भाजी मंडई, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर रचना विभाग,
महानगरपालिका,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक संचालक,
नगर रचना विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०२.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०९.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.०१.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोगाने गंभीर दखल घेतली असून त्यांना आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांच्यामार्फत यासंदर्भात खुलासा सादर करावा लागेल.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, वॉर्ड क्र. ८७ औरंगाबाद महानगरपालिका उल्कानगरी येथील मोकळया जागेच्या संदर्भात सीटी सर्वे नं., क्षेत्रफळ, सोसायटीचे नाव इत्यादीची सविस्तर माहिती मागितली आहे. या माहितीकरिता त्यांनी ₹१००/- चा भरणाही केलेला आहे. तरीही त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या दि. ०८.११.२०१० रोजीच्या माहिती अर्जावर प्रथम प्रतिसाद जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगर रचना यांनी दिल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगररचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भातील दि. २७.१२.२०१० रोजीच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना अनावश्यक व अर्धवट दस्तऐवज दिले व अप्रमाणित माहिती दिली आहे, असा युक्तिवाद केल्याचे दिसून येत आहे.अर्जदारास संपूर्ण संचिका दाखवावी व त्यांनी मार्क करुन दिलेले सर्व कागदपत्रे विनामूल्य पंधरा दिवसांच्या आत पुरवावेत, असा निर्णय दिला आहे. तथापि त्यांना अशी माहिती मिळालेली नाही, असेही आयोगास कथन केले.

वरील सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने या माहितीपोटी भरलेले शुल्क ₹१००/- त्यांना परत करावे लागेल

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने या माहितीपोटी भरलेले शुल्क ₹१००/- त्यांना परत करावे.

३) आज दि.०५.०१.२०१२ रोजी आयोजित सुनावणीस अनुपस्थित राहिल्याबद्दल संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास खुलासा सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेशचंद्र रामचंद्र एकबोटे,तुळजाई, ४१, श्रीनगर कॉलनी, संत एकनाथ हॉस्पीटलसमोर, उल्कानगरी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सबीर हुसेन एफ.अत्तार,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहसंचालक,<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. सुनावणीची पुढील

तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.साबीर हुसेन एफ. अत्तार, २७ - बी एन-१२, प्रोफेसर कॉलनी, हिमायत बागेसमोर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सिध्दार्थ रामराव पवार, श्री. प्रशांत केशवराव म्हस्के, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव,
श्री. व्यंकटेश शिक्षण संस्था,समर्थनगर,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अध्यक्ष,
श्री. व्यंकटेश शिक्षण संस्था,
समर्थनगर,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३३९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रशांत केशवराव म्हस्के | : उपस्थित |
| ३.२ | सरचिटणीस, श्री. व्यंकटेश शिक्षण संस्था, समर्थनगर,औरंगाबाद - श्री.महेंद्र खानापूरकर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०१.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सरचिटणीस, श्री व्यंकटेश शिक्षण संस्था, समर्थनगर, औरंगाबाद उपस्थित आहेत.

अपिलार्थी व श्री व्यंकटेश शिक्षण संस्थेचे सरचिटणीस यांनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर कथन केले. आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी

सचिव, श्री व्यंकटेश शिक्षण संस्था यांच्याकडे माहितीचा अर्ज करुन या शिक्षण संस्थेकडून शाळेस मान्यता मिळाल्यापासून सन २०१० पर्यंत या कालावधीची माहिती मागितली आहे. मा. उच्च न्यायालयाचा संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा लागू होत नाही, असा निर्णय झालेला आहे. ही बाब विचारात घ्यावी लागेल. अपिलार्थीच्या दि. ०७.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन उचित निर्णय देणे आवश्यक ठरत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना निश्चित करण्यात यावे. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन यथोचित निर्णय पारित करावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.०७.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.सिध्दार्थ रामराव पवार,श्री.प्रशांत केशवराव म्हस्के, प्लॉट नं.२६, संगिता कॉलनी,भावसिंगपुरा रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, श्री. व्यंकटेश शिक्षण संस्था, समर्थनगर,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रामकृष्ण कचरु गंडे,रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>सहाय्यक पोलीस आयुक्त,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस उप आयुक्त,परिमंडळ -२, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३६० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रामकृष्ण कचरु गंडे | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे वकील ॲड.मोहसीन खॉन | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग,औरंगाबाद- श्री. नरेश मेघराजानी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस उपआयुक्त परिमंडळ-II, औरंगाबाद - श्रीमती सुनिता साळुंके-ठाकरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २६.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २५.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १४.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे वकील, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंनी त्यांचे म्हणणे आयोगासमोर कथन केले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अर्जान्वये जिन्सी पोलीस

स्टेशन गुन्हा क्र. १,११७/२००७ बाबत एकूण सात मुद्यांवर माहिती मागितली आहे. या गुन्हयाबाबत २००७ मध्ये तपास झाला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे व कागदपत्रे न्यायालयात आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध आहे, ती देण्याचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या सुनावणीमध्ये घेतला व कागदपत्रे देण्यात आली आहेत. माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे उपलब्ध कागदपत्रे झेरॉक्स प्रतीच्या स्वरुपात पुरविली. त्या माहितीच्या संदर्भात अपिलार्थीचे म्हणणे असे आहे की, त्यांना दिलेली माहिती अपूर्ण आहे. मुद्दा क्र. ४ व ५ मध्ये आरोपीचे नाव चुकीचे दिले आहे.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी मुद्दा क्र. ४ व ५ संदर्भात पुन्हा अभिलेखातील माहितीची पडताळणी करुन त्यासंदर्भात उपलब्ध कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन अपिलार्थीस देण्याचे आयोगासमोर प्रस्तावित केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्र. ४ व ५ बाबतच्या उपरोक्त विशिष्ट माहितीबाबतच्या झेरॉक्स प्रती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.रामकृष्ण कचरु गंडे, ८४२, सहयाद्रीनगर, एन-५,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ- II, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वासुदेव दयाराम चावडा, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वॉर्ड अधिकारी,
महानगपालिका,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कर निर्धारक व संकलक,
महानगरपालिका, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/३६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वासुदेव दयाराम चावडा | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वॉर्ड अधिकारी (वॉर्ड ड), महानगपालिका, औरंगाबाद - श्री. एस.आर.जरारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका,औरंगाबाद - श्रीमती अलका खैरे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवादावरुन दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मालकीचा भूखंड सिटीएस नं. १३८०२/१ अजबनगर या भूखंडावर मालमत्ता कर लावण्यात येत नाही, याबाबतची माहिती मागितली आहे. जो कर रद्द करण्यात आला आहे, तो कोणत्या कागदपत्रांच्या आधारे रद्द केला याबाबतची माहिती स्पष्टीकरण व अभिप्राय या स्वरुपात मागितली आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या दोनही भूखंडासंदर्भातील कागदपत्रांच्या संचिका अपिलार्थीस दाखविण्यात आलेल्या आहेत व त्या त्यांनी पाहिलेल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणात त्यांच्या भूखंडाबाबत कर लावण्याबाबतचा निर्णय घेणे ही प्रशासकीय बाब ठरत असल्यामुळे आयोगाच्या अधिकारकक्षेच्या बाहेर आहे. अपिलार्थी त्यांचा हा प्रश्न स्वतंत्रपणे सादर करुन संबंधित प्राधिकरणाकडून अथवा वरिष्ठ कार्यालयाकडून दाद मागू शकतील, असे आयोगाचे मत आहे.

या पार्श्वभूमीवर सदरचे अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०५-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.वासुदेव दयाराम चावडा, तिरुपती वाशिंग सेंटर, अजबनगर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी (वॉर्ड ड), महानगपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गिरीष सुरेशराव गायकवाड,रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालयीन अधिक्षक,<br>पंचायत विभाग,जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गिरीष सुरेशराव गायकवाड | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालयीन अधिक्षक, पंचायत विभाग,जिल्हा परिषद, औरंगाबाद-श्री. भाऊसाहेब वाल्मीकराव सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २८.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. २०.१२.२०१० रोजीच्या माहितीअर्जान्वये त्यांनी दि. १४.०७.२०१० रोजीचे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयात दि. ०६.१२.२०१० रोजी ५ महिने उशिराने प्राप्त का झाले व काय कार्यवाही केली, अशी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस विहित मुदतीत दि. २८.१२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, पंचायत विभाग,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांनी संदर्भित पत्र दि. ०६.१२.२०१० रोजीच प्राप्त झाले असून आवक रजिस्टरचा शिक्का आहे, असे कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी सुनावणी घेऊन दि. २८.०१.२०११ रोजी निर्णय दिला आहे की, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण यांचे दि. १४.०७.२०१० रोजीचे पत्र त्यांच्या कार्यालयास दि. ०६.१२.२०१० रोजी प्राप्त झाल्याचा आवक शाखेचा शिक्का आहे व कार्यालयाकडून उशिर झालेला नसल्यामुळे उशिराबाबतची कार्यवाही करु शकत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.गिरीष सुरेशराव गायकवाड, हॉटेल आशिर्वादसमोर,मटन मार्केटच्या बाजुला, रेल्वेस्टेशन रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गणपत हरिचंद्र दराडे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहाय्यक पोलीस आयुक्त,
पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय),
पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गणपत हरिचंद्र दराडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद - श्री. के.एस.बहुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस उपआयुक्त (मु.),औरंगाबाद शहर,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी वैद्यकीय प्रतिपूर्ती बिलासंदर्भात महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम/परिपत्रके याच्या प्रती मागितल्या आहेत. माहितीचा कालावधी सन १९८० ते २०१० असा तब्बल तीस वर्षांचा देण्यात आलेला आहे. वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत नेमक्या विशिष्ट रोगाबाबत किंवा इतर तपशील याचा उल्लेख त्यांच्या माहिती अर्जामध्ये नाही. त्यामुळे या माहितीचे स्वरुप व्यापक असल्याचे दिसून येत आहे. सर्व माहिती संकलीत करुन देण्यास ७४ दिवस उशिर झाला आहे, असे दिसून येत आहे. तथापि मागितलेली माहिती व माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेला विलंबाबाबत दंडनीय कारवाई योग्य ठरत नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गणपत हरिचंद्र दराडे, पोलीस निरीक्षक, महिला सहाय्य कक्ष, पोलीस आयुक्त कार्यालय,मिल कॉर्नर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त (प्रशासन), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मु.),औरंगाबाद शहर,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विशाल दिनेश बावनकर,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,<br>नगर रचना, महानगपालिका,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक संचालक,<br>नगर रचना, महानगरपालिका,<br>औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विशाल दिनेश बावनकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १६.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांच्या अनुपस्थितीची आयोग गंभीर दखल घेत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जालना रोडवर समांतर असलेल्या नवीन हायकोर्टाच्या बाजूने हरितपट्टा हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित आहे अथवा महानगरपालिकेच्या यासंबंधीची सन १९९६ ते २०१० पर्यंतची माहिती तसेच सदर हरितपट्टा हस्तांतरण झाला असल्यास त्यासंदर्भातील कागदपत्रांच्या प्रती मागितल्या आहेत. यासंदर्भात त्यांना दि. ११.०१.२०११ रोजीच्या पत्राद्वारे जी माहिती पाठविण्यात आली आहे त्यामध्ये करारनाम्याच्या प्रतींचा समावेश आहे. त्यामध्ये त्यांनी मागितलेली कागदपत्रे नाहीत. सदरची जमीन महानगर पालिकेच्या ताब्यात आहे अथवा इतर सार्वजनिक प्राधिकरणाच्या यासंदर्भातील कागदपत्रे त्यांना मिळावीत,अशी त्यांची अपेक्षा आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रे विचारात घेता असे सूचित करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगर रचना, महानगपालिका,औरंगाबाद यांना अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भातील संचिकेचा शोध घ्यावा लागेल व उपलब्ध कागदपत्रे विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी लागेल. सदरचा हरितपट्टा महानगरपालिकेमध्ये हस्तांतरित झाला नसल्यास त्यासंदर्भात अपिलार्थीस स्पष्टपणे एका महिन्याच्या आत कळवावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगर रचना, महानगपालिका,औरंगाबाद यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भातील संचिकेचा शोध घ्यावा व उपलब्ध कागदपत्रे नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य देण्याची व्यवस्था करावी. तसेच सदरचा हरितपट्टा महानगरपालिकेमध्ये हस्तांतरित झाला नसल्यास त्यासंदर्भात अपिलार्थीस स्पष्टपणे कळवावे. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.विशाल दिनेश बावनकर,प्लॉट नं. ९, एन-३,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगर रचना, महानगपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
कार्यालय अधिक्षक अभियंता तथा लाभक्षेत्र विकास
प्राधिकरण, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक अधिक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४३६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मनिष भगवानदास अग्रवाल | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०६.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०३.११.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १३.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, दि. ०६.१०.२०१० रोजीच्या माहिती अर्जान्वये अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांच्या

मंडळाअंतर्गत सर्व प्रकारचे सर्व कर्मचारी व सर्व अभियंते यांच्या बदलीची सन २०१० च्या ज्येष्ठता यादीच्या प्रती तसेच मंडळात व मंडळांतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचारी व सर्व अभियंता यांच्या आदेशाच्या छायांकित प्रती इ. विविध विषयावर माहिती मागितली आहे. या माहितीकरिता ₹२/- प्रतिपृष्ठ प्रमाणे ₹१००/- भरणा करण्याकरिता दि. ०३.११.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. त्यानुसार दि. २५.११.२०१० रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्याच दिवशी माहिती मिळाली. त्यामध्ये काही माहिती अपूर्ण आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे निर्णय देताना अपीलकर्ता यांनी विभागांअंतर्गत ज्येष्ठता यादीची मागणी केली आहे, तरी विभागामार्फत सदर अभिलेख्याची पडताळणी करुन ते अभिलेखे दहा दिवसात अपिलकर्ता यांना सशुल्क द्यावी असा निर्णय घेतला व या निर्णयानुसार तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी ₹२६/- शुल्काचा भरणा करावा, असे कळविले आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास विनंती केली की, सदरची माहिती त्यांना विलंबाने मिळत असल्याकारणाने विनाशुल्क देण्यात यावी. ही बाब विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (आस्थापना),लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद यांनी अपिलार्थी यांना वर नमूद केल्याप्रमाणे द्यावयाची उर्वरित माहिती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पाठविण्याची व्यवस्था करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०५-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.मनिष भगवानदास अग्रवाल, संपादक साप्ताहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर,सिंधी कॉलनीमागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक (आस्थापना),लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहंमद रईसोद्दीन शुजाउद्दीन,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,तहसील कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०५-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार(महसूल), तहसील कार्यालय,औरंगाबाद - श्री. भाऊसाहेब थोरात | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज तहसीलदार, औरंगाबाद (लेखा विभाग) कार्यालयाकडे अग्रेषित केला आहे व त्यांचा प्रथम अपील अर्ज तहसीलदार,औरंगाबाद यांच्याकडे केलेला आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या

प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुक्रमे नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, औरंगाबाद व तहसीलदार,औरंगाबाद हे होत असल्यामुळे सध्याचे जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः सुनावणी घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. ०८.१२.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०५-०१-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.मोहंमद रईसोद्दीन शुजाउद्दीन, घर नं.३-१-६८, सि.स.नं.४१५८, बारुदगरनाला, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजमोहंम्मद हबीबुद्दीन शेख, : अपिलार्थी
जिल्हा परिषद क्वॉर्टर, घर नं. बी. १३, घाटी दवाखाना गेट समोर, पानचक्की रोड, ज्युबिली पार्क, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
चेअरमन, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०४५९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. राजमोहंम्मद हबीबुद्दीन शेख | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०१-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

पुढील सुनावणी दिनांक २२-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजमोहंम्मद हबीबुद्दीन शेख, जिल्हा परिषद क्वॉर्टर, घर नं. बी. १३, घाटी दवाखाना गेट समोर, पानचक्की रोड, ज्युबिली पार्क, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, औरंगाबाद जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनोज किशोर सरीन, : अपिलार्थी
रा. कैलासनगर, ग. नं. ५, राम मंदिराजवळ, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/४७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मनोज किशोर सरीन | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, औरंगाबाद - श्री. सुर्यवंशी सु. दे. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना "चार किंवा सहा चाकी लक्झरी, बसेस, मिनी बसेस, कंपनी बसेस यांना दुसरा आपातकालीन दरवाजा बसविण्याचा नियम आहे का, असल्यास नियमाची प्रत, नसल्यास यांची पासिंग होते का, होत असल्यास नियमांची माहिती द्यावी, आतापर्यंत अशा किती बसेसची पासिंग झाली. त्याचप्रमाणे आपल्या कार्यालयातून अशा प्रकारच्या पासिंग झालेल्या किती बसेसना दुसरा दरवाजा नाही, अशा प्रकारच्या किती बसेस रोडवर धावत आहेत त्यांची संख्या," अशी माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३, ४ व ५ बाबत खालील माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही.

१. मुद्दा क्रमांक तीन बाबत १९९५ ते २०१० या कालावधीत किती चार किंवा सहा चाकी बसेस पासिंग झाल्या.

२. मुद्दा क्रमांक चार बाबत १९९५ ते २०१० या कालावधीत पासिंग झालेल्या बसेसबाबत किती बसेसना दुसरा आपातकालीन दरवाजा नाही त्यांची संख्या.

३. मुद्दा क्रमांक पाच बाबत उपरोक्त बसेसना दुसरा आपतकालीन दरवाजा नसल्याबाबत आलेल्या तक्रारींचा तपशील.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत स्वतंत्र अशी माहिती ठेवण्यात आलेली नाही. दुसरा आपातकालीन दरवाजा हा प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांना वरील मुद्दयासंदर्भात त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पुरवावी लागेल.अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती सुमारे १५ वर्षाची आहे.सुनावणीच्या वेऴी त्यांनी स्वेच्छेने माहितीचा कालावधी कमी करून एक वर्षाची माहिती द्यावी,अशी आयोगाने विनंती केली आहे.अत: दिनांक ०१-०१-२०१० ते ३१-१२-२०१० या एक वर्षाची माहिती देण्यात यावी. उपरोक्त माहितीमध्ये मुद्दा क्रमांक दोनची माहिती उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र मुद्दा क्रमांक तीन, चार व पाचची माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे तशीच माहिती त्यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. माहितीचे संस्करण करुन माहिती अपिलार्थीस देणे ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार अभिप्रेत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित दिसून येते. या दृष्टीने शास्त्रशुध्द पध्दतीने कार्यालयात माहिती ठेवण्यात आल्यास वाहनांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यात येऊ शकेल व अपघाताचे प्रमाण कमी होऊ शकेल या दृष्टीकोनातून सचिव (परिवहन) यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8)

(a) (iii) व  (iv), 19 (7) व 25 (5) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगास दिलेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे माहिती ठेवण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१. प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडील वेगवेगळ्या प्रकाराची वाहने पासिंगसाठी येतात त्यांची पासिंग केली जाते, त्यांचे रजिस्टर वर्गनिहाय जसे कार, ट्रक, बसेस इत्यादी वेगवेगळे ठेवले जावे.

२. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दुसरा आपतकालीन दरवाजा याबाबत आलेल्या तक्रारी व त्यावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील स्वतंत्रपणे ठेवावा.

३. प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्या अधिका-यांकडून वाहनांची तपासणी करण्यात येते त्यांचे वाहननिहाय व वर्गनिहाय रजिस्टर ठेवण्यात यावे.

४. प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्या पाहणीमध्ये दोषयुक्त आढळलेल्या वाहनांची यादी व सदर दोष सुधारुन करण्यात आलेले अनुपालन यांचा तपशील स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा.

संगणकीकरणाच्या युगामध्ये उपरोक्त माहिती संकेतस्थळरावर ठेवणे शक्य आहे.  वरील यादी ही प्रतिकात्मक आहे.  परिपूर्ण यादी विभागाने यामागील व्यापक जनहित विचारात घेता तयार करावी अशी राज्य माहिती आयोगातर्फे शिफारस करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात ज्या स्थितीत माहिती उपलब्ध आहे अशी एका वर्षाची माहिती अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने आयोगाचे आदेश प्राप्त होताच एका महिन्याच्या आत पाठवावी.

२. राज्य माहिती आयोगास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (8) (a) (iii) व (iv), 19 (7) व 25 (5) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार सचिव, परिवहन, मंत्रालय, मुंबई यांना वर नमूद केल्याप्रमाणे माहिती ठेवण्याबाबत व माहिती संगणकावरील संकेतस्थळरावर उपलब्ध करुन देण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोज किशोर सरीन, रा. कैलासनगर, ग. नं. ५, राम मंदिराजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, परिवहन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील,<br>एन-९, एच-१६४/०३, श्रीकृष्णनगर, अहिंसा रोड, टी. व्ही. सेंटर चौकाजवळ, सिडको, औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>प्रशासक, सिडको नवीन औरंगाबाद यांचे कार्यालय, नवीन औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रशासक, सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>प्रशासक, सिडको नवीन औरंगाबाद यांचे कार्यालय, नवीन औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रशासक, सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी ५० दिवसानंतर माहिती देण्याकरिता प्रतिसाद दिला. तथापि त्यांनी पाठविलेली माहिती त्यांनी मागितलेल्या माहितीच्या केवळ दहा टक्के इतकी आहे. नव्वद टक्के माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. ज्या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे माहिती पाठविली त्याच दिवशी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिला आहे. निर्णय दिला त्यावेळी अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यात आली नाही. अपिलार्थी यांनी एकूण नऊ मुद्दे व त्यांचे काही उप मुद्दे यावर माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आवश्यक वाटते. तथापि आयोगापुढील कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेताना अपिलार्थीची बाजू ऐकून घेतली नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी १७/१८ मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्या मुद्दयांपैकी कोणत्या मुद्दयावर माहिती अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार माहिती देय होते याबाबत स्पष्टपणे निर्णय दिलेला नाही. मोघमपणे माहिती द्यावी असा निर्णय दिला आहे. ही बाब प्रथम अपिलाच्या वेळी विचारात घेणे आवश्यक होते. माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे, अतः माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची पाहणी देणे योग्य ठरले असते याचाही विचार करणे आवश्यक होते. यास्तव अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन वर नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन पुन्हा सुनावणी घेऊन निर्णय पारीत करणे आवश्यक आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या दिनांक १७-०२-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत पुन्हा सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक 	०६-०१-२०१२**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील, एन-९, एच-१६४/०३, श्रीकृष्णनगर, अहिंसा रोड, टी. व्ही. सेंटर चौकाजवळ, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, प्रशासक, सिडको नवीन औरंगाबाद यांचे कार्यालय, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको कार्यालय, नवीन औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष शंकरराव पवार, : अपिलार्थी

व्दारा, सा. लहुप्रहार, डॉ. आंबेडकर नगर, सिडको, एन-७,
गौतमनगर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०६१२ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संतोष शंकरराव पवार | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २१-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची आयोग गंभीर दखल घेत आहे.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये एकूण सहा मुद्दयावर सन २००८ ते २०१० या वर्षाची विस्तृत अशी माहिती मागितली आहे.

अपिलार्थीच्या दाखल झालेल्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांना बोलावून सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०१-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष शंकरराव पवार, व्दारा, सा. लहुप्रहार, डॉ. आंबेडकर नगर, सिडको, एन-७, गौतमनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बन्सी आसाराम सरोवर, : अपिलार्थी
एन-११, जी-१२/१, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०६५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बन्सी आसाराम सरोवर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद - श्री. सुर्यवंशी सु. दे. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद<br>- श्री. आर.एन. वर्मा | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. एम. जी. नाईक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे तसेच त्रयस्थ पक्ष यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री. बी. जी. नाईक यांच्यासंदर्भात एकूण चार मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यातील प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या संज्ञेत येत नाही. त्यामुळे ती अपिलार्थीस देय होणार नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाच्या मत्ता व दायित्वाच्या प्रती मागितल्या आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 8 (1) (j) नुसार अशा प्रकारची वैयक्तीक स्वरुपाची माहिती देण्यापूर्वी व्यापक जनहित तपासणे आवश्यक ठरत आहे. अपिलार्थी सुनावणीच्या वेळी याबाबतचे व्यापक जनहित स्पष्ट करु शकले नाहीत त्यामुळे ती माहिती अपिलार्थीस देय होत नाही. माहिती आयोगानेही मत्ता व दायित्व याबाबतची माहिती देय होणार नाही असे निर्णय प्रसंगी घेतलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी त्रयस्थ यांचे पद, शैक्षणिक पात्रता, नेमणुकीच्या सत्यप्रती, ज्या जागी कार्यरत आहेत तेथील कार्यकालाचा कालावधी इत्यादी माहिती देय होत आहे. ती अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठविण्याची व्यवस्था जन माहिती अधिकारी यांना करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बन्सी आसाराम सरोवर, एन-११, जी-१२/१, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीरंग मारुती वारे, : अपिलार्थी
मेहराज हॉटेल, जयसिंगपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्राचार्य, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०७०१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २१-०८-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-१०-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५-११-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६-०२-२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २१-०८-२००८ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-१०-२००८ रोजी दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक १५-११-२००८ रोजी सुनावणी घेऊन याबाबतची नोंद घेऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीरंग मारुती वारे, मेहराज हॉटेल, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सलीम कासीम पटेल वाहेगावकर, : अपिलार्थी
मलिक अंबरनगर (किराडपुरा), रहेमानिया कॉलनी,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड,
औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०७०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-१०-२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-१२-२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-१२-२००७ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०१-२००८

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन अपिलार्थीस माहिती मिळाली आहे किंवा कसे दिसून येत नाही. तसेच अपिलार्थीच्या दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय घ्यावा.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सलीम कासीम पटेल वाहेगावकर, मलिक अंबरनगर (किराडपुरा), रहेमानिया कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण दगडू माडुकर, : अपिलार्थी
फ्लॅट नं. ए-३, अमृत वैभव अपार्टमेंट, जालाननगर,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसंचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी
समिती, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०७४५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण दगडू माडुकर | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद - श्री. डी. आर. देसले | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद - श्री. एम. अे. शेख | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६-११-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०३-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक ०१-११-२०१० च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना दिनांक २६-११-२०१० रोजी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व्यापक स्वरुपात असल्यामुळे माहितीची पाहणी सुध्दा अपिलार्थी यांना देण्यात आली आहे. सदरचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांनी आयोगास कथन केल्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सदर पत्राची प्रत दाखविली. जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २६-११-२०१० चे हे पत्र अपिलार्थीस दिनांक ३०-११-२०१० ला मिळाले आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये माहिती व्यक्तिशः मागितली आहे. त्यांनी या पत्रावर कार्यालयात जाऊन माहितीची पाहणी करुन आवश्यक असलेल्या माहितीचे शुल्क भरुन ती प्राप्त करुन घेणे अभिप्रेत होते. मुद्दा क्रमांक दोन बाबत अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितली आहे. त्याबाबतही अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात यावे या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण दगडू माडुकर, फ्लॅट नं. ए-३, अमृत वैभव अपार्टमेंट, जालाननगर,

औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मोहमंद फरजान मोहंमद इब्राहिम, : अपिलार्थी
महानगरपालिका स्विमींग पूल गेटजवळ, गरम पाणी,
औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०७६६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद<br>- श्री. सु. दे. सुर्यवंशी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप प्रादेशिक प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद<br>- श्री. आर. एन. वर्मा | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०१-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक २०-०१-२०११ रोजी प्राप्त झाली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक २, ४, ५ व ६ ची माहिती प्राप्त झालेली नाही. या माहितीमध्ये उप प्रादेशिक प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड कार्यालयात बदली झालेल्या लिपिकाचे नाव, बदली दिनांक व वर्ष, लिपिकाच्या बदलीसंबंधी वरिष्ठ कार्यालयाकडून आलेल्या आदेशाची प्रत, बदली झाल्यानंतर कार्यमुक्त न करण्याबाबतची माहिती आहे. ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहमंद फरजान मोहंमद इब्राहिम, महानगरपालिका स्विमींग पूल गेटजवळ, गरम पाणी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती विद्या सुनिल विश्वासू, : अपिलार्थी

मातोश्री नरसाया शाळेच्या मागे, प्लॉट नं. ७१, ग. नं. १०-बी, न्यायनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद (मॅट)

जन अपिलीय अधिकारी तथा :

प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद (मॅट)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/०८०९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी श्री. सुनिल छन्नुलाल विश्वासू यांचेसह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>लघुलेखक उच्च श्रेणी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद (मॅट) - श्री. अभय आर. जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद (मॅट) - श्री. के. जी. मोहमद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-०१-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-०२-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. १७-०२-२०११

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३-०३-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व त्यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

अपिलार्थी श्रीमती विद्या सुनिल विश्वासू यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री. सुनिल छन्नुलाल विश्वासू यांनी त्यांची बाजू मांडली. त्यांनी आयोगास कथन केले की, त्यांना माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अशाच प्रकारची माहिती श्री. सुनिल छन्नुलाल विश्वासू यांनी यापूर्वी मागितली आहे व त्यावर राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठाने दिनांक ०१-०२-२०११ रोजी निर्णय दिलेला आहे. अपिलार्थी यांनी दिनांक १३-०१-२०११ च्या माहिती अर्जान्वये त्रयस्थाची माहिती मागितली आहे. याबाबत जी माहिती देय होत आहे ती दिनांक १५-०१-२०११ रोजी अपिलार्थीस देण्यात आलेली आहे व जी माहिती देता येणार नाही ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ञ) नुसार नाकारली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १७-०२-२०११ रोजी सुनावणी घेऊन त्यासंदर्भात निर्णय दिला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी देय असलेली माहिती अपिलार्थीस दिली आहे. उर्वरीत माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (j) प्रमाणे देता येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जो निर्णय दिला आहे त्यामध्ये कोणतीही त्रुटी आढळून येत नाही, म्हणून अपील नामंजूर केले आहे.

या सर्व बाबी विचारात घेता, संबधित जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०१-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती विद्या सुनिल विश्वासू, मातोश्री नरसाया शाळेच्या मागे, प्लॉट नं. ७१, ग. नं. १०-बी, न्यायनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा लघुलेखक उच्च श्रेणी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद (मॅट) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद (मॅट) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रभाकर विठ्ठलराव मगरे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८१९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रभाकर विठ्ठलराव मगरे | : | उपस्थित |
| ३.२ | सहायक जन माहिती अधिकारी श्री. एम.एस.शेळके, व.लिपीक | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद- श्री. एम.ए.सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २७.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,सहायक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी दोन त्रयस्थ श्री.किरणे व देव यांच्यासंदर्भात त्यांच्या घराची झडती घेतल्याच्या पंचनाम्याच्या प्रती मागितल्या आहेत. त्यापैकी श्री. किरणे यांच्यासंदर्भात पंचनाम्याची प्रत मिळाली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.१०.२०१० रोजीच्या पत्रामध्ये त्यांना माहिती उपलब्ध आहे व कार्यालयात विहित शुल्काचा भरणा करुन प्राप्त करुन घेऊन जावी, असे कळविले होते. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, चुकीची माहिती कळविल्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मागविला होता. नजरचुकीने व टंकलेखनाच्या चुकीने दोघांचा पंचनामा उपलब्ध आहे, असे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे व अपिलार्थीस त्रयस्थ परिरक्षण भूमापक स्व.देव यांच्या घराची झडती घेतलेबाबतच्या पंचनाम्याची प्रत समक्ष देण्यात आली आहे. तथापि श्री. किरणे यांची घरतपासणी झाली नसल्यामुळे त्यासंदर्भात माहिती उपलब्ध नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.प्रभाकर विठ्ठलराव मगरे, रा.घर क्र.४-१७-१८, मिलकॉर्नर, कोतवालपुरा,औरंगाबाद जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनोज एम.भालेराव, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअभियंता,
नगर रचना क्र.१, महानगरपालिका, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपअभियंता, नगर रचना क्र.१,महानगरपालिका, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८२१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअभियंता, नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद - श्री. सय्यद फहीमोद्दीन | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक संचालक, नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद - श्री. डी.पी.कुलकर्णी | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.०१.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०७.१२.२०१० रोजीच्या माहिती अर्जाद्वारे उपअभियंता श्री.फव्हेम सिद्दीकी व अभियंता श्री. शेख यांनी नगर रचना विभागात केलेल्या कामाच्यासंदर्भात काही माहिती एकूण ३ मुद्यांद्वारे मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती वर्ष २००९-२०१० या दरम्यानची असून मोघम स्वरुपाची मागितली आहे. तसेच मुद्दा क्र. २ ची माहिती सन २००३-०६ सालची आहे. अपिलार्थी यांनी अपेक्षिलेली माहिती मोघम व प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याकारणाने नेमकी कोणती माहिती द्यावी याकरिता मागितलेल्या माहितीबाबत, मिळकत धारकाचे पूर्ण नांव, मोहल्ला, नगर भूमापन क्रमांक, संचिका क्रमांक, परवाना क्रमांक, अर्ज दाखल केल्याची तारीख, गट नंबर इत्यादी तपशील दिल्यास अभिलेखात शोधून माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल, असे दि. ३१.१२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कलम ७(१) नुसार कळविले आहे. त्याचप्रमाणे प्रश्नार्थक स्वरुपात अपेक्षिलेल्या माहितीचे मुद्दे निकाली काढण्यात येत आहे, असेही कळविले आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २०.०१.२०११ रोजी सुनावणी घेतली त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. त्यावेळी निर्णय देण्यात आला की, अपिलार्थी यांना सलमान फॅशन हॉलच्या बांधकामाबाबतच्या संचिकेच्या पाहणीची आवश्यकता आहे. त्यानुसार अभिलेख कक्ष प्रमुख, महानगरपालिका,औरंगाबाद यांना दि. २८.०१.२०११ रोजीच्या पत्राद्वारे सदरची संचिका उपलब्ध करुन द्यावी, असे कळविले आहे. तथापि त्यांना अभिलेख कक्षाकडून संचिका प्राप्त न झाल्याने संबंधित संचिका क्रमांक मागितला आहे. यावर अपिलार्थीस दि.२८.०२.२०११ रोजीच्या पत्रान्वये सदरच्या संचिकेबाबतचा क्रमांक व दिनांक कळविण्यात यावा म्हणजे संबंधित संचिकेचा शोध घेणे सोपे होईल, असे कळविले आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. अभिलेख कक्ष प्रमुख, सहा.आयुक्त (श्री. बी.के.अभंग) यांनी सलमान फॅशन हॉल, दिल्ली गेट संदर्भात या नावाच्या संचिकेचा शोध घ्यावा व ती अपिलार्थीस पाहणीकरिता उपलब्ध करुन द्यावी लागेल, असे आयोगाचे मत आहे. ही कार्यवाही तीस दिवसांच्या आत करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अभिलेख कक्ष प्रमुख सहा.आयुक्त (श्री. बी.के.अभंग) यांनी सलमान फॅशन हॉल, दिल्ली गेट संदर्भात या नावाच्या संचिकेचा शोध घ्यावा व ती अपिलार्थीस पाहणीकरिता उपलब्ध करुन द्यावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.मनोज एम. भालेराव, रेल्वेस्टेशन, पैठणरोड, उड्डानपुलाखाली, जागीरदार कॉलनी, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगर रचना क्र.१, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रामराव केशवराव ठोंबरे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपसंचालक,भूमि अभिलेख,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसंचालक,भूमि अभिलेख,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, भूमी अभिलेख,औरंगाबाद-श्री. अभय जोशी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसंचालक,भूमी अभिलेख, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २९.१०.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०११<br>(फेरसादर दि.२२.०७.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत

आहे.  या बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २२.०२.२०१२ रोजी सकाळी ११.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.रामराव केशवराव ठोंबरे,ए-६३, नाथनगर, सिंधी कॉलनीमागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अनंत देविदास शिंदे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्रकल्प संचालक,<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रकल्प संचालक,<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक प्रकल्प अधिकारी (सनियंत्रण), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०६.०१.२०११ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या सेवेसंदर्भात एकूण दहा मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे. माहिती एकत्रित करण्यास अंशत: कालावधी लागला. त्यानंतर स्पीड पोस्टाद्वारे दि. ०१.०३.२०११ रोजी माहिती पाठविण्यात आली आहे.

आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांना प्राप्त झालेल्या या माहितीची त्यांनी प्रथम पाहणी करावी व त्यामध्ये काही माहिती अपूर्ण आढळल्यास पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे. तदनंतर जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंत देविदास शिंदे, ३/१३, आनंद नगर, अदालत रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी (सनियंत्रण), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुमंत शंकरराव कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
वरिष्ठ लेखा अधिकारी,
वित्त विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८८५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.०१.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३१.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. ०४.०१.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये सेवाविषयक बाबीसंदर्भात एकूण २९ मुद्यांद्वारे माहितीच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. त्यामध्ये लेखा संवर्गात विकल्पाबाबत/ज्येष्ठता याद्या/रोस्टर रजिस्टर या बाबींचा समावेश आहे. माहितीचा कालावधी सन १९६२ ते २०१० असा तब्बल ४८ वर्षांचा आहे. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिलेली आहे. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखाधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या अशा माहितीच्या अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत म्हणजे दि. २८.१.२०११ रोजी कळविलेले असून अपिलार्थी यांना मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपात असल्याकारणाने या माहितीसंदर्भातील दस्तऐवज/अभिलेखांची पाहणी अथवा निरीक्षण करता येतील, असे सूचित केले आहे. यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. जन अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ लेखा अधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारे उत्तर दिले आहे व त्यांना क्र.१ ते ३० च्या सत्यप्रती उपलब्ध करुन द्याव्यात असे नमूद करुन अपिलार्थी यांनी प्रथम अपील सादर केले आहे. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी दि. २३.०२.२०११ रोजी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीनंतर निष्कर्ष काढला आहे की, जन माहिती अधिकारी यांनी नियमाप्रमाणे लागणाऱ्या शुल्काबाबत अर्जदार यांना लेखी कळवून आवश्यक रकमेचे शुल्क भरणा केल्यानंतर अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दिल्याचे दिसून येत नाही. म्हणून जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखा अधिकारी,वित्त विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती दि. १३.०५.२०११ पूर्वी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असा निर्णय घेतला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२८.०१.२०११ रोजीच्या पत्राद्वारे अधिनियमातील तरतुदीनुसार विहीत मुदतीमध्ये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती विचारात घेऊन माहितीची पाहणी देऊ केली, ही बाब जन अपिलीय अधिकारी यांनी विचारात घेतली नाही. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. या सर्व बाबी विचारात घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात दिलेला निर्णय राज्य माहिती आयोग बाजूला ठेवत आहे.अभिलेखाची पाहणी करण्याकरिता पाहणीचे दर व दिनांक निश्चित करुन अपिलार्थीस कळविण्यात यावे व तदनंतर

माहिती देण्यासंदर्भात पुढील कार्यवाही एका महिन्याच्या आत पूर्ण करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या प्रती सशुल्क द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.सुमंत शंकरराव कुलकर्णी, जिल्हा परिषद कॉलनी, बी-१४, घाटी दवाखाना मेनगेटसमोर, पानचक्की रोड,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लेखा अधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विशाल बाबुराव कांबळे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गुंठेवारी कक्ष प्रमुख,<br>महानगरपालिका,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहाय्यक संचालक,<br>नगर रचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९३० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गुंठेवारी कक्ष प्रमुख, महानगरपालिका, औरंगाबाद - श्री. जयंत स. खरवडकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका,औरंगाबाद - श्री. डी.पी.कुलकर्णी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११.१०.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २२.०२.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ११.१०.२०१० रोजीच्या मूळ अर्जान्वये सन २००० ते २०१० या कालावधीची सिटीएस-क्र.११४८९/१ स.नं.११५ येथे गुंठेवारी नियमित करणेबाबतची एकूण ३ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यातील काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपात मागितली आहे, ती माहिती अधिनियमातील कलम २ च मधील 'माहिती' च्या व्याखेत बसत नाही. जन माहिती अधिकारी यांनी दि. २२.०२.२०११ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन माहितीसंदर्भात कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांच्या दि. ०५.०४.२०११ रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपूर्ण व चुकीची माहिती दिली आहे,असे नमूद केलेले आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांनी कोणत्या मुद्याबाबतची अपूर्ण व चुकीची माहिती त्यांना मिळाली त्याबाबतचे नेमके मुद्दे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत कळवावे. तदनंतर जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०६-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.विशाल बाबुराव कांबळे, गितानगर, मौलाना आझाद कॉलेजसमोर,हर्सूल रोड, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा गुंठेवारी कक्ष प्रमुख, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आर.के.मोरे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपअधिक्षक, भुमी अभिलेख,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. आर.के.मोरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपअधिक्षक, भुमी अभिलेख, औरंगाबाद - श्री. टी.आर.साळवे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख,औरंगाबाद - श्री. एम.ए.सय्यद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १७.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४.०१.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ११.०३.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंनी आपले म्हणणे आयोगासमोर कथन केले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी तालुका निरिक्षक भूमि अभिलेख

क्रमांक/औरंगाबाद/अ.स./मो.र./१४०७/२००६,दि. २०.०४.२००६ अन्वये ग.नं.१२८ मौ. पिसादेवी, ता.औरंगाबाद या जमिनीच्या मोजणीमध्ये दाखवलेल्या श्रीमती सावित्रबाई राम कैलाश मौर्य यांचे पोटहिस्साचे हद्दीचे अनुक्रमे, पुर्व,पश्चिम,उत्तर,दक्षिण बाजूची वेगवेगळी लॉबी मीटरमध्ये लिहून आणि त्या पोट हिस्साचे क्षेत्रफळ एक्करमध्ये लिहून मोजणी नकाशाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. अशाप्रकारे मागणी केलेली माहिती उपअधीक्षक, भूमी अभिलेख,औरंगाबाद यांच्या विभागाच्या प्रचलीत कार्यपध्दतीमध्ये ठेवण्यात येत नाही. त्यामुळे जी माहिती उपलब्ध आहे व जशी आहे तशी देण्यात आली. अशी माहिती जतन करण्याची प्रथा नाही, असे अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) नुसार दि. २४.०१.२०११ रोजी विहित मुदतीत कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख,औरंगाबाद यांनी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीअंती जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतला आहे की, जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात जी माहिती तयार आहे, ती देण्याची तयारी आहे व अपील फेटाळले आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जी माहिती अभिलेखात तयार आहे, ती माहिती अपिलार्थीस देय होत आहे. माहितीचे संस्करण करुन देणे अथवा लेखी स्वरुपात खुलासेवजा माहिती तयार करुन देणे ही प्रक्रिया अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. कारण ही बाब माहिती या संज्ञेत बसत नाही. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला प्रथम प्रतिसाद व जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय आयोगास योग्य वाटतो. अपिलार्थी त्यांना आवश्यक असलेला नकाशा तयार करुन घेण्याकरिता भूमी अभिलेख, औरंगाबाद यांच्या कार्यालयात त्या विभागाच्या कार्यप्रणालीनुसार विहित शुल्क भरणा करुन माहिती घेऊ शकतात. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस ही बाब मान्य झाली आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.आर. के. मोरे, एम-२/८,आर.-२६,एन-१, रायगडनगर, सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भुमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उस्मानशाह इब्राहिमशाह,रा.औरंगाबाद : अपिलार्थी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार(महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपजिल्हाधिकारी (महसूल),
जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. उस्मानशाह इब्राहिमशाह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.४ | तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद - श्रीमती ज्योत्स्ना धुळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.१२.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी व तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी तहसीलदार (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचा विषय

त्यांच्या विभागाच्या कार्यक्षेत्रात येत नाही व या प्रकरणी संबंधित विभाग म्हणजे प्रशासन शाखा प्रमुख व या शाखेचे प्रमुख निवासी उपजिल्हाधिकारी आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रे पाहता या प्रकरणी जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुक्रमे प्रशासन शाखा प्रमुख व निवासी उपजिल्हाधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २२.०२.२०१२ रोजी सकाळी ठीक ११.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.उस्मानशाह इब्राहिमशाह, ग.नं.२०, इंदिरानगर,बायजीपूरा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन शाखा प्रमुख, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. तहसीलदार (महसूल),जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र एस.बनकर, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९८१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात अपिलार्थीस अपूर्ण माहिती मिळाल्याचे त्यांच्या द्वितीय अपील अर्जात मोघमपणे नमूद केल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात अपिलार्थी यांनी अपूर्ण व चुकीची नेमकी कोणत्या मुद्याबाबतची

माहिती त्यांना मिळाली त्याबाबतचे नेमके मुद्दे जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसांच्या आत कळवावेत. तदनंतर जन माहिती अधिकारी यांना पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ०६-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. राजेंद्र एस.बनकर, वैशालीनगर, एन-८, घर नं.८/२१/७३१,सिडको, अनिकेत हॉस्पीटल समोर, ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. कल्याण सोपानराव सोनवणे,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>आदर्श महिला नागरी सहकारी बँक लि., शिवज्योती गृहनिर्माण हौसिंग सोसायटी, सिडको, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>आदर्श महिला नागरी सहकारी बँक लि. शिवज्योती गृहनिर्माण हौसिंग सोसायटी, सिडको, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/९८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०६-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | श्री. भोसले बी.एन., ज्युनि.ऑफिसर,आदर्श महिला नागरी सहकारी बँक लि. शिवज्योती गृहनिर्माण हौसिंग सोसायटी, सिडको, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | ॲड. मनिषा दाभाडे, कायदा सल्लागार, आदर्श महिला नागरी सहकारी बँक लि., शिवज्योती गृहनिर्माण हौसिंग सोसायटी, सिडको, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.०४.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी आदर्श महिला नागरी सहकारी बँक लि., शिवज्योती गृहनिर्माण हौसिंग सोसायटी, सिडको, औरंगाबादतर्फे कायदा सल्लागार, ॲड. मनिषा दाभाडे व ज्युनियर ऑफिसर श्री. भोसले बी.एन.उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच बँकेच्या कायदा सल्लागार यांनी आयोगासमोर कथन केले की, यापूर्वी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठासमोर द्वितीय अपील क्र. २०४१/०८ या प्रकरणात, दि. २६.११.२००९ रोजी सुनावणी होऊन आयोगाने माहिती अधिकार अधिनियम या बँकेस लागू होत नसल्यामुळे अपील खारीज करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी पुढे असेही कथन केले की, त्यांच्या बँकेस कोणत्याही प्रकारे शासनाचे वित्तीय सहाय्य मिळत नाही. त्यामुळे सदर प्रकरणही निकाली काढावे, अशी विनंती केली.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन वरील बाबी दिसून येत आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ०६-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.कल्याण सोपानराव सोनवणे,एन-११,के-४०/४,नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

२. आदर्श महिला नागरी सहकारी बँक मर्या., शिवज्योती गृहनिर्माण हौसिंग सोसायटी, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अविनाश आर. देशपांडे,<br>मानवी मेडिकोडेंटल सेंटर, प्लॉट नं. १, इंदुगंगा आर्केड,<br>सिडको कम्युनिटी सेंटरच्या बाजूला, सिडको, एन-२,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ०७-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद - डॉ. माधुरी कुलकर्णी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद - डॉ. शिवाजी बा. सुक्रे | : | उपस्थित |
| ३.४ | विशेष साक्ष - संचालक, आरोग्य सेवा, मुंबई<br>- डॉ. सुरेश चुन्नीलाल गुप्ता | : | उपस्थित |
| ३.५ | विशेष साक्ष - संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई<br>- डॉ. प्रविण हरिश्चंद्र शिनगारे | : | उपस्थित |
| ३.६ | उप संचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.७ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी - डॉ. प्रकाश लक्ष्मीनारायण गट्टाणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २३-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २१-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०२-२०१० |

२) या व्दितीय अपिलाची सुनावणी प्रथमत: दिनांक २१-०४-२०११ रोजी झाली होती त्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे स्वत: अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात आली होती व ती सुनावणी पुन्हा दिनांक ११-१०-२०११ रोजी ठेवण्यात आली होती. त्या सुनावणीस पुनश्च जन माहिती अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद तसेच जन अपिलीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद अनुपस्थित होते. याची गंभीर दखल आयोगाने घेऊन सुनावणीस पुन्हा एकदा पुढील तारीख देऊन ती आज रोजी ठेवण्यात आलेली आहे.

३) अपिलार्थी डॉ. अविनाश देशपांडे यांनी दिनांक ०४-११-२००९ च्या माहिती अर्जान्वये माहितीच्या अधिकारामध्ये विचारलेली माहिती ही कॅन्सर पेशंट तपासणी तसेच उपचारासंदर्भातील आहे. या माहितीमध्ये व्यापक जनहित असल्यामुळे राज्य माहिती आयोगाच्या या खंडापीठाने दोन सुनावण्या पुढे ढकलून पुन्हा आज दिनांक ०७-०१-२०१२ रोजी ११-३० वाजता ही सुनावणी ठेवण्यात आली आहे. या सुनावणीत विचारलेल्या माहितीचे महत्व व त्यामध्ये असलेले व्यापक जनहित या सर्व बाबी विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रकरण पाच यातील राज्य माहिती आयोगास दिलेल्या अधिकारानुसार कलम १८ (१) (ख) (Section. 18 (1) (b)) व १८ (१) (ग) (Section. 18 (1) (c) अन्वये तसेच १८ (२) (Section. 18 (2) व १८ (३) (ङ) (Section. 18 (3) (e) मधील अधिकाराचा वापर करुन संचालक, आरोग्य सेवा, मुंबई व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना विशेष साक्षीकरिता पाचारण करण्यात आले आहे.

४) आज रोजी सुनावणीच्या वेळी डॉ. सुरेश चुन्नीलाल गुप्ता, संचालक, आरोग्य सेवा, मुंबई, डॉ. प्रविण हरिश्चंद्र शिनगारे, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, उप संचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी डॉ. प्रकाश लक्ष्मीनारायण गट्टाणी, सध्याचे जन अपिलीय अधिकारी डॉ. शिवाजी बा. सुक्रे, वैद्यकीय अधीक्षक, जन माहिती अधिकारी डॉ. माधुरी कुलकर्णी, उप वैद्यकीय अधीक्षक हे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

५) अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जात खालील माहिती मागितली आहे.

१) " can a Doctor with M.B.B.S. Qualification Dispense, prescribe & administer CHEMOTHERAPY Drugs for cancer patient ?

२) If No, under which law,GR, Authority ? (Government Resolution) "

आज रोजी सुनावणीच्या वेळी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई डॉ. प्रविण हरिश्चंद्र शिनगारे यांनी त्यांच्या विशेष साक्षीदरम्यान अपिलार्थी यांनी विचारलेल्या माहितीमधून उपस्थित झालेल्या मुद्दयावर त्यांची बाजू खालीलप्रमाणे आयोगापुढे मांडली :-

५.१) " एम. बी. बी. एस. अर्हताधारक डॉक्टर कर्करोग्याला औषधे वितरीत (Dispense) करु शकतात का ?" यावर संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी त्यांची बाजू मांडली की, अशा प्रकारे एम. बी. बी. एस. अर्हताधारक डॉक्टर कर्करोग्याला औषध वितरीत करु शकत नाहीत. फार्मसी कॉन्सिल ॲक्ट १९४८ नुसार नोंदणी-धारक औषधनिर्माताच फक्त कर्करोगावरची औषधी वितरीत करु शकतो. (फार्मसी कॉन्सिल ॲक्ट १९४८, कलम ४२, पान क्रमांक २५)

५.२) " एम. बी. बी. एस. पात्रता असलेला डॉक्टर कर्करोग्याला औषधोपचार करु शकतो का ?" यावर संचालकांचे अभिप्राय आहेत की, अशा प्रकारचे औषधोपचार एम. बी. बी. एस. पदवीधारक (degree holder) डॉक्टर करु शकणार नाही. याचे कारण म्हणजे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या एम. बी. बी. एस. च्या अभ्यासक्रमामध्ये औषधशास्त्र या विषयामध्ये कर्करोगावरच्या औषधीविषयीच्या सखोल अभ्यासाचा समावेश नाही. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामधील मुद्दा क्रमांक ३ (H) मध्ये खालील बाब नमूद आहे.

" principles of cancer chemotherapy and their adverse drug reactions (Individual agent and regimes need not be taught) "

यावरुन एम. बी. बी. एस. अर्हताधारकास कर्करोगावरच्या औषधांविषयीचे सखोल ज्ञान नसल्यामुळे कर्करोग्यावर औषधोपचार करु शकत नाहीत.

५.३) एम. बी. बी. एस. अर्हताधारक डॉक्टर कर्करोग्याला केमोथेरोपी देऊ शकतो का ? यावर संचालकांचे अभिप्राय आहेत की, एम. बी. बी. एस. डॉक्टर केमोथेरोपी देऊ शकणार नाही. एम. बी. बी. एस. अभ्यासक्रमामध्ये हा विषय समाविष्ट नसल्यामुळे त्यांना त्याचे सखोल ज्ञान नसते ही बाब वर नमूद केल्याप्रमाणे मुद्दा क्रमांक दोन मध्ये अंतर्भूत आहे. त्याचप्रमाणे एम. बी. बी. एस. च्या अभ्यासक्रमाची अशा प्रकारे रचना करण्यात आली आहे की, एम. बी. बी. एस. पदवी प्राप्त केल्यानंतर असे डॉक्टर साधारण रोगांचे निदान करु शकतात “(diagnose common clinical disorders) आणि कर्करोग हा साधारण रोग नाही आहे. (and cancer is not common clinical disorder).” त्यामुळे एम. बी. बी. एस. पदवीधारक डॉक्टर केमोथेरपी देऊ शकत नाही. एम. बी. बी. एस. डॉक्टरचे कर्तव्य प्रथम दर्शनी रुग्णाला प्राथमिक स्वरुपाचे व्यवस्थापन पुरविणे असे आहे.

५.४) मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया च्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये ... " chapter (2) Duties of physician to their patients मधील 2.1.1 मध्ये नमूद केलेले आहे की, " However for good reasons, when a patient is suffering from an ailment which is not within the range of experience of the treating physician, the physician may refuse treatment and refer the

patient to another physician " त्यामुळे एम. बी. बी. एस. पदवीधारक डॉक्टर कर्करोग्यावर उपचार करु शकत नाही.

६) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई डॉ. प्रविण हरिश्चंद्र शिनगारे यांच्या साक्षीत वरील बाबी नमूद केल्यामुळे खालील सारांश निघत आहे.

६.१) " एम. बी. बी. एस. डिग्रीच्या अभ्यासक्रमामध्ये असलेले विविध विषय तसेच त्यांना देण्यात येणा-या प्रशिक्षणाचा साकल्याने विचार करता एम. बी. बी. एस. अर्हताधारक स्वतंत्रपणे कर्करोग्याला उपचार देण्यास सक्षम नाही. " याच्या पुष्ट्यर्थ युक्तिवादात संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी उपरोक्त नमूद केलेले संदर्भ दिलेले आहेत.

एम. बी. बी. एस. अर्हताधारक जे प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा इतर आरोग्य केंद्र, इस्पितळे येथे कार्यरत आहेत व ज्यांना कर्करोगाच्या व्यवस्थापनासंबंधी प्राथमिक प्रशिक्षण दिले आहे असे एम. बी. बी. एस. डॉक्टर मात्र रुग्णांची तपासणी करुन निदान करु शकतात व रुग्णांना पुढील औषधोपचारासाठी व व्यवस्थापनासाठी तज्ञांकडे पाठवू शकतात.

६.२) एम. बी. बी. एस. अर्हताधारक डॉक्टर वर नमूद केल्याप्रमाणे कर्करोग्यावर उपचार करण्यास सक्षम नसल्यासंदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई वैद्यकीय सेवा, यांनी उपरोक्त युक्तिवादामध्ये खालील आवश्यक संदर्भ नमूद केले आहेत.

१. The Pharmacy Act 1948

२. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अभ्यासक्रम

३. Indian Medical Council (Professional Conduct, Etiquette and Ethics) Regulations, २००२

७) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई डॉ. सुरेश चुन्नीलाल गुप्ता, सुनावणीस उपस्थित आहेत. त्यांनी त्यांच्या युक्तिवादात संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई श्री. प्रविण एच. शिनगारे यांनी केलेल्या युक्तिवादास सहमती दर्शविली व त्यांनी पुढे असेही नमूद केले की, शासनाच्या "Cancer Prevention Programme" अंतर्गत एम. बी. बी. एस. अर्हताधारक डॉक्टरांना कॅन्सरच्या प्रथमोपचारासंबंधी जरुरी प्रशिक्षण दिले जात आहे. जेणेकरुन सदर डॉक्टरांना कर्करोगाचे निदान व प्रथमोपचार करणे सुकर होते व तज्ञ डॉक्टरांनी निदान करुन ठरविलेल्या उपचाराच्या दिशेनुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्यास सदर प्रशिक्षित डॉक्टर सक्षम ठरतात.

८. प्रसंगावशात अपिलार्थीच्या दिनांक ०४-११-२००९ च्या विचाराधीन माहितीच्या अर्जावर संबधित जन माहिती अधिकारी तथा उप वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांनी किरणोपचार विभागातील तज्ञ प्राध्यापक श्री. शेवाळकर, यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस दिनांक ११-११-२००९ रोजी अपिलार्थीने बारा रुपये शुल्काचा भरणा केल्यानंतर दिली आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या पृष्ट्यर्थ संबंधित कायदा, निर्णय / नियम इत्यादीच्या प्रती देण्यात आलेल्या नाहीत असे नमूद केले आहे याकरिता वर नमूद केल्याप्रमाणे दोन्ही संचालकांनी

दिलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या मार्फत अपिलार्थीस कळविण्यात यावी तसेच त्याच्या पृष्ट्यर्थ परिच्छेद ६.२ मध्ये नमूद केलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्यात याव्यात या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

९. या माहिती अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीचा संबंध व्यापक जनहिताशी असल्यामुळे याविषयावर योग्य सक्षम प्राधिकरण (Appropriate Competant Authority) आवश्यक ती मार्गदर्शक तत्त्वे (guidlines) तयार करतील व त्यास सर्वसामान्यांच्या हितार्थ प्रसिध्द करतील ही बाब शासनाने पहाणे योग्य ठरत आहे. यासंदर्भात राज्य माहिती आयोगाला केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7), 19 (8) (a) (iii) व 19 (8) (a) (iv) आणि कलम 25 (5) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये शासनाचे मुख्य सचिव यांना अशी शिफारस करण्यात येत आहे की, शासनाने उपरोल्लोखित मार्गदर्शक तत्त्वे संबंधित सक्षम प्राधिकरण तयार करुन प्रकाशित करील याची व्यवस्था करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती व त्या पृष्ट्यर्थ उपरोक्त कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. राज्य माहिती आयोगाला केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19 (7), 19 (8) (a), (iii) व (iv) आणि कलम 25 (5) अन्वये प्राप्त अधिकारान्वये वर नमूद केल्याप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे (guidline) संबंधित सक्षम प्राधिकरण (Appropriate Competant Authority) तयार करुन प्रसिध्द करील, ही बाब शासनाने पहावी, अशी शिफारस मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ०७-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अविनाश आर. देशपांडे, मानवी मेडिकोडेंटल सेंटर, प्लॉट नं. १, इंदुगंगा आर्केड, सिडको कम्युनिटी सेंटरच्या बाजूला, सिडको, एन-२, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्यभवन, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, मुंबई - ४०० ००१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी-संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुभाषचंद्र रामेश्वरजी काबरा, : अपिलार्थी
मंत्री गल्ली, मानवत, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद कार्यालय, मानवत, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मानवत,
जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१७२७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुभाषचंद्र रामेश्वरजी काबरा | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, मानवत,<br>जिल्हा परभणी - श्री. यु. आर. दुधाने | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मानवत,<br>जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०७-२०११
फेरसादर दिनांक
२१-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक ०७-०३-२०११ च्या माहिती अर्जान्वये शेत सर्व्हे नंबर ५२४ मानवतमधील स्वतःच्या जमिनीवर त्यांनी काढलेल्या प्लॉटींगच्या पी. टी. आर. नकला व ना हरकत प्रमाणपत्र न देण्याबाबत दिलेल्या दिनांक २९-०१-२०११ च्या अर्जावर काय कारवाई केली त्याची माहिती मागितली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर विलंबाने दिनांक २०-०७-२०११ रोजी कळविले आहे की, या प्रकरणाची चौकशी चालू असल्यामुळे सदर प्लॉटींगच्या पी. टी. आर. देण्याचे बंद केले आहे. या प्रकरणाची चौकशी झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली आहे. अपिलार्थी त्या सुनावणीस उपस्थित होते. तथापि त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णयाची प्रत त्यांना प्राप्त झालेली नाही. त्याची प्रत आज रोजी आयोगासमोर देण्यात आली. अपिलार्थीने ती स्विकारली. अपिलार्थी यांनी त्यांच्या प्रथम अपील निर्णयाची पाहणी करावी.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मानवत, जिल्हा परभणी आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित नाहीत. या प्रकरणी त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. म्हणून त्यांची या प्रकरणी विशेष साक्ष लावण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२-०२-२०१२ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>अंतरिम आदेश</u>

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२-०२-२०१२ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०१-२०१२**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाषचंद्र रामेश्वरजी काबरा, मंत्री गल्ली, मानवत, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, नगर परिषद कार्यालय, मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मानवत, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रावसाहेब शामराव शिंदे, : अपिलार्थी
रा. पांगरा (शिंदे), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
ग्रामपंचायत कार्यालय, पांगरा (शिंदे), तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत,
जिल्हा हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९५० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पांगरा (शिंदे), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत, जिल्हा हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८-०४-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०८-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

पुढील सुनावणी दिनांक २२-०२-२०१२ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२-०२-२०१२ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रावसाहेब शामराव शिंदे, रा. पांगरा (शिंदे), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पांगरा (शिंदे), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अक्रम अहेम खान, : अपिलार्थी
काद्राबाद प्लॉट, मस्जीदजवळ, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अक्रम अहेम खान | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. डी. के. इंगोले | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. आर. जी. खोतकर, का. अ. शि. वि. प्रा. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१२-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना त्यांनी मागितलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त झालेली नाही. या व्दितीय अपील प्रकरणात आयोगाने दिनांक २२-०६-२०११ रोजी सुनावणी घेतली होती. त्यावेळी सुनावणीत असे आढळून आले होते की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२०११ च्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही. यारिता प्रकरण प्रथम अपील सुनावणीकरिता परत पाठविण्यात आले. त्यावर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी दिनांक २६-०८-२०११ रोजी सुनावणी घेतली. त्यामध्ये दिलेला निर्णय हा अत्यंत सर्वसाधारण स्वरुपाचा असा आहे. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या प्रत्येक मुद्दयावर माहिती अधिकार अधिनियमातील कलमानुसार व तरतुदीनुसार जी माहिती देय आहे त्याबाबत निर्णय घेणे आवश्यक ठरत होते तथापि त्यांनी तसे केलेले नाही. माहितीच्या अधिकारात प्राप्त झालेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेताना त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे याची गंभीर दखल आयोग घेत असून याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी चौकशी करुन प्रशासकीय कारवाई करणे योग्य ठरत आहे. अपिलार्थी यांनी एकूण पाच मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यापैकी प्रश्नार्थक स्वरुपातील माहिती तसेच लेखी स्पष्टीकरण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येत येत नसल्यामुळे देय होत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती खालीलप्रमाणे आहे असे सुनावणीच्या वेळी कथन केले. ही माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे.

१. त्रयस्थ नजमुनीसा परवीन यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमात १० व १२ वी तसेच डी. एड साठी मराठी माध्यम असून त्यांना ऊर्दू माध्यमाच्या शाळेत कोणत्या नियम अथवा कायद्यानुसार नेमले त्याची प्रत.

२. त्रयस्थ नजमुनीसा परवीन या सर्वात कनिष्ठ शिक्षिका असताना त्यांना मुख्याध्यापिका या पदाकरिता मान्यता दिली आहे त्या प्रस्तावाची प्रत, मंजूरी आदेशाची प्रत.

३. त्रयस्थ ॲडव्होकेट रुद्रवार यांना वकील म्हणून शिक्षण विभाग, परभणी यांच्याकडून फी देण्यात येते त्याबाबतची त्यांची नियुक्ती, ठरविण्यात आलेली फी याबाबतच्या कागदपत्राच्या प्रती तसेच आतापर्यंत देण्यात आलेल्या फीचा तपशील.

४.	त्रयस्थ नजमुनीसा परवीन यांना मूळ पगार वेतनश्रेणी कोणत्या नियमानुसार देण्यात आली आहे त्याबाबतचा निर्णय झालेल्या टिपणीची तसेच आदेशाची प्रत.

वरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीच्या माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक तीन मधील माहिती मोघम व व्यापक स्वरुपाची आहे तसेच ती लेखी स्वरुपात माहिती मागितली आहे म्हणून ती देय होत नाही.

या प्रकरणाकडे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे लक्ष वेधण्यात येत आहे. अपिलार्थीस सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने पुरविली जाईल याची व्यक्तिशः खातरजमा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना करावी लागेल. तसेच संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी आयोगाच्या आदेशानुसार अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेताना वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती दक्षता घेतली नाही याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी चौकशी करुन प्रशासकीय कारवाई योजावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवतील, ही बाब व्यक्तिशः पहावी.

२.	मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेताना आवश्यक ती दक्षता घेतली नाही याबाबत चौकशी करुन प्रशासकीय कारवाई योजावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक	१०-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१.	श्री. अक्रम अहेम खान, काद्राबाद प्लॉट, मस्जीदजवळ, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितीन चंपतराव आजबे, : अपिलार्थी
मु. निपाणी टाकळी, पो. ढेगळी पिंपळगांव, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, सेलू, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२०० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नितीन चंपतराव आजबे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी<br>- श्री. सतीश सोनी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, सेलू, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. व्ही. वांबुरकर | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०७-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०-०८-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०८-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५-०८-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थी यांनी दिनांक ११-०७-२०११ च्या माहिती अर्जान्वये स्वस्त धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक श्री. बन्सी घनश्याम सावंत यांच्या दुकानाबाबत जो फेर चौकशी अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी यांना पाठविला आहे त्याची माहिती मागितली आहे. सदर अर्जाची कार्यालयात दिनांक १२-०७-२०११ रोजी नोंद झाली आहे. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली कागदपत्रे देण्यात आलेली आहेत. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांना माहिती मिळाल्याचे मान्य केले.

या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन चंपतराव आजबे, मु. निपाणी टाकळी, पो. ढेगळी पिंपळगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शाम विश्वनाथ नारायणकर, | : | अपिलार्थी |
| | अण्णाभाऊ साठे नगर, पूर्णा, जिल्हा परभणी | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | जिल्हाधिकारी, परभणी | | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२४४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. विकास बापटीकर, अ. का. | : | उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. पी. पी. वाकोडकर, अ. का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २९-०३-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०-०६-२०११ |

८	राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख	दि. १४-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी पूर्णा शहरातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांच्या परवान्याबाबत एकूण सहा मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यापैकी काही मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे व उर्वरीत माहितीपैकी काही माहिती तहसीलदार, पूर्णा व काही माहिती गोपनीय शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे उपलब्ध आहे. तहसीलदार, पूर्णा यांच्याशी संबंधित माहिती दिनांक २९-०७-२०११ रोजी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उर्वरीत माहिती दिनांक ३०-०७-२०११ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यात आली आहे ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. भविष्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त होणा-या माहिती अर्जावर अर्जदारास विहित मुदतीत माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी दक्ष राहावे असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शाम विश्वनाथ नारायणकर, अण्णाभाऊ साठे नगर, पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. लक्ष्मीकांत भगवानराव दडके, | : | अपिलार्थी |
| | रा. चौधरी गल्ली, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी, | : | उत्तरवादी |
| | जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | | |
| | जन अपिलीय अधिकारी, | : | |
| | जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड | | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड<br>- डॉ. फटाले पी. के. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३०-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०-०७-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत..

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १६-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मीकांत भगवानराव दडके, रा. चौधरी गल्ली, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बालासाहेब रामराव शेंगुळे,<br>मु. पो. रावराजूर, तालुका पालम, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रावराजूर,<br>तालुका पालम, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम,<br>जिल्हा परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३६५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. बालासाहेब रामराव शेंगुळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रावराजूर,<br>तालुका पालम, जिल्हा परभणी<br>- श्री. घिरडकर रमेश दिनानाथ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम,<br>जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. एस. आर. चिलगर, विस्तार अधिकारी (पंचायत) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०६-२०११ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २५-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ३०-०८-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये ग्रामपंचायत रावराजूर, तालुका पालम येथील केंद्र सरकार, राज्य सरकार, आमदार फंड, खासदार फंड, तसेच प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या खर्चाबाबत व विविध योजनाबाबत जानेवारी २००७ ते ३१ मार्च २०११ या कालावधीची माहिती मागितली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक सध्या निलंबीत आहेत. सध्याच्या ग्रामसेवकाने आज त्यांच्याबरोबर त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली ४५ पृष्ठांची माहिती आणली आहे. आयोगाच्या आदेशानुसार ती अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थीने ती स्विकारली आहे. उर्वरीत मुद्दयांबाबतच्या माहितीचा त्यांनी शोध घ्यावा व ती उपलब्ध झाल्यानंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात ही माहिती पाहणीसाठी एक दिवस सुनिश्चित करुन तसे अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून उपलब्ध करुन द्यावी व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०१-२०१२**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालासाहेब रामराव शेंगुळे, मु. पो. रावराजूर, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, रावराजूर, तालुका पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एम. एस. बोधने, : अपिलार्थी
प्रतापनगर, नांदखेडा रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३६६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. एम. एस. बोधने | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद - श्री. एस. एम. माहोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - डॉ. आर. बी. कसबे, स. संचालक, हिवताप, औरंगाबाद | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०७-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०८-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८-०८-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणीस बोलाविले नाही, त्यांना सुनावणीचे पत्र मिळाले नाही व निर्णयही मिळाला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थीस दिनांक ०९-०९-२०११ रोजीच्या सुनावणीसाठी बोलाविण्यात आले होते, तथापि अपिलार्थी सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत, म्हणून सुनावणी घेतली नाही.

आयोगापुढील अपिलार्थीच्या दिनांक २३-०९-२०११ रोजीच्या व्दितीय अपिलातील मुद्दा क्रमांक ४ पहिल्या अपील प्राधिका-याचा तपशील यामध्ये अपिलार्थीने नमूद केलेले दिसून येत आहे की, "अपिल अधिकारी यांनी सह पत्र ब वर दिनांक ०९-०९-२०११ रोजी सुनावणी ठेवली. (या पत्राची प्रत सोबत जोडले) प्रकृती बरोबर नसल्यामुळे मी सुनावणीस उपस्थित राहिलो नाही तसे त्यांना कळविले. त्या पत्राची प्रत सोबत जोडले आहे".

अपिलार्थी आज रोजी सुनावणीस उपस्थित आहेत. त्यांनी प्रथम अपील सुनावणीच्या वेळी प्रकृती अस्वस्थामुळे सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही असे कळविले आहे. त्यांनी सहकार्य करुन माहिती लवकर मिळण्यासाठी सकारात्मक भूमिका घेणे आवश्यक होते व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथम अपिलावरील सुनावणीस पुढील तारीख मागणे उचित ठरले असते. अपिलार्थी राज्य माहिती आयोगापुढील सुनावणीसाठी उपस्थित राहू शकतात त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीस उपस्थित राहू शकले असते. ज्यामुळे त्यांना सत्वर माहिती मिळण्यास सुलभ झाले असते.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घ्यावी, याबाबतची सुनावणी नोटीस अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवावी व अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी व जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयावर समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील सुनावणीस उपस्थित राहण्याचे आयोगासमोर मान्य केले.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या दिनांक १८-०८-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०१-२०१२**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एम. एस. बोधने, प्रतापनगर, नांदखेडा रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक आरोग्य सेवा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, : अपिलार्थी

श्री मोठा मारोती मंदिराजवळ, देशमुख गल्ली, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, स्टेशन रोड, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :

अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३६८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, स्टेशन रोड, परभणी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : अनुपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. के. एम. देवकर, नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, परभणी | : उपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी<br>- श्री. पी. पी. वाकोडकर, अ. का. | : उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०७-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३-०७-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०८-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३-०९-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी सर्व्हे नंबर १४/१ मौजे खानापूर, तालुका जिल्हा परभणी येथील १९८१ साली झालेल्या एन. ए. च्या त्यावेळीच्या नकाशाची अधिका-याच्या सहीची व शिक्क्याची प्रत मागितली आहे. अकृषिक एन. ए. देणेबाबतचे अधिकार त्यावेळी उप विभागीय अधिकारी यांना होते व त्यांच्यातर्फे हे आदेश निर्गमीत झाले आहेत. दिनांक ३१-०८-१९८७ ला एन. ए. आदेश निर्गमीत झालेले आहेत. त्यांच्या पृष्ट्यर्थ दिलेल्या नकाशाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या संचिकेमध्ये उपलब्ध आहे तथापि त्यावर उपजिल्हाधिकारी यांची सही व शिक्का नाही.

संचिकेमध्ये टिपणी उपलब्ध आहे त्यावरुन एन ए मंजूर झालेला दिसतो. मूळ नकाशाची प्रत ज्यावर मंजूरी दिनांक, सक्षम अधिका-याची सही असते ते नकाशे उप जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध असणे आवश्यक आहे, ते उपलब्ध नाहीत ही बाब गंभीर आहे. या नकाशाचा शोध घेणे आवश्यक आहे. याकरिता पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, परभणी श्री. प्रवीण धरमकर यांनी या प्रकरणासंबंधी सर्व नस्ती आयोगासमोर ठेवाव्यात म्हणजे अपिलार्थीस त्याची पाहणी देण्यात येईल.

पुढील सुनावणी दिनांक २२-०२-२०१२ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२-०२-२०१२ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस

अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, श्री मोठा मारोती मंदिराजवळ, देशमुख गल्ली, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, स्टेशन रोड, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रभू राणबाजी दिपके, : अपिलार्थी
जिल्हा प्रतिनिधी, दै. प्रजावाणी, २१, स्टेडीयम कॉम्पलेक्स,
नेहरु रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रभू राणबाजी दिपके | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. एन. बी. ठाकूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. आर. बी. गिरी | : | उपस्थित |
| ३.४ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. जे. गाजरे, व. स. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१-०५-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०६-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २१-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी द्यावी.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रभू राणबाजी दिपके, जिल्हा प्रतिनिधी, दै. प्रजावाणी, २१, स्टेडीयम कॉम्पलेक्स, नेहरु रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपिलार्थी
रा. वसमत, जि.हिंगोली.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,वसमत, जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय,वसमत, जि.हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१६३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०४.०५.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५.०८.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

अपिलार्थीच्या दि. ०५.०९.२०११ रोजीच्या द्वितीय अपील अर्जावरुन असे दिसून येत आहे की, त्यांना माहिती मिळाली आहे, तथापि माहिती दिशाभूल करणारी व अपूर्ण दिली आहे, असे त्यांनी मोघमपणे नमूद केले आहे. याबाबत मागितलेल्या माहितीपैकी नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे, ही बाब तहसीलदार, वसमत यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे

आत कळवावी लागेल व तदनंतर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,वसमत पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवतील, याची तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली यांना खातरजमा करावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, वसमत, जि.हिंगोली यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने अपूर्ण माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. यशवंत दत्तराव घुगे, : अपिलार्थी
रा.कोथळज, ता.जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,मालेगाव, जि.वाशिम
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय,मालेगाव,जि.वाशिम

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१६८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मालेगाव,जि.वाशिम | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार,तहसील कार्यालय,मालेगाव,जि.वाशिम - श्री. एम.एल.राठोड | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.०२.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०७.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.०४.२०११ (अमरावती खंडपीठास प्राप्त)<br>दि. ०६.०९.२०११ (औ.बाद खंडपीठास प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,मालेगाव,जि.वाशिम यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे अतिवृष्टीत पडझड कोणत्या कारणास्तव झाली याचे स्पष्टीकरण मागितलेले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार खुलासा, स्पष्टीकरणात्मक बाबींवर माहिती देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस स्पष्टीकरण देण्यात आले नाही. ही बाब अपिलार्थीस दि. १४.०२.२०११ रोजी कळविण्यात आली आहे. तथापि यासंदर्भातील पंचनाम्याच्या प्रती अपिलार्थीस दिलेल्या आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन या बाबी दिसून येत आहेत. तसेच अपिलार्थीस देय होत असलेली माहिती देण्यात आल्याचेही दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यशवंत दत्तराव घुगे, रा.कोथळज, पो. ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मालेगाव,जि.वाशिम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,मालेगाव,जि.वाशिम यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नदाफ म.बशीर खान, : अपिलार्थी
मु.पो. चौंढी (बहिरोबा),
ता.वसमत,जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय,
उपविभाग वसमतनगर,जि.हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय,
उपविभाग वसमतनगर,जि.हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२६८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. प्रतीवर दिनांक नाही. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४.०६.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी दि. २२.०२.२०१२ रोजी दुपारी ठीक ०३.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नदाफ म.बशीर खान, मु. पो. चोंढी (बहिरोबा), ता.वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय,उपविभाग वसमतनगर,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय,उपविभाग,वसमतनगर,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भुजंग रंगनाथराव हमरापुरकर व<br>श्री. विष्णू नारायण जोशी,रा.परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक धर्मादाय आयुक्त,परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी- श्री. पांडुरंग रामराव चव्हाण | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक धर्मादाय आयुक्त, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०.०६.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०६.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी यांनी आयोगासमोर कथन केले की, परभणी येथे सन २००७ साली ब्राह्मण अधिवेशन झाले होते.

त्यासंदर्भात मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० कलम ४१(क) अन्वये नोंदणी करण्यात येऊन वर्गणी गोळा करण्याची परवानगी देण्यात आली होती. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जाद्वारे सन २००७ मध्ये परभणी येथे झालेल्या ब्राह्मण अधिवेशनाच्या हिशोबाबतची माहिती मागितली आहे.

आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन आयोगास असे दिसून आले आहे की, अपिलार्थी यांचा अर्ज ज्या दिवशी केलेला आहे, त्या दिवशी जी माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी यांच्या कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध आहे, ती देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार आवश्यक आहे. एवढयापुरते मर्यादित न राहता, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात या न्यासाची नोंद तपासून तक्रारीच्या अनुषंगाने फेरचौकशी करुन एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा, असे प्रशासकीय आदेश दिल्याचे दिसून येत आहे. ही बाब विचारात घेता अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,परभणी यांनी नव्याने सुनावणी घेऊन दोनही बाजूंचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन अधिनियमातील तरतुदीनुसार जी माहिती देय होते, त्याबाबत साकल्याने विचार करुन निर्णय घ्यावा, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. यामुळे जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर यापूर्वी दिलेला निर्णय बाजूला ठेवण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त,परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या दि. २९.११.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत नव्याने सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १०-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भुजंग रंगनाथराव हमरापुरकर, रा. येलदरकर कॉलनी, परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विश्वजित रमेशराव देशमुख, रा.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वजित रमेशराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर अभियंता, परभणी महानगरपालिका, परभणी - श्री. पवार रामराव किशनराव | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त, परभणी महानगरपालिका,परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. मुजीब खान, सहायक आयुक्त | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.०६.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.०७.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०७.०९.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी एकूण १० मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. त्यापैकी त्यांना काही मुद्यांची माहिती मिळाली आहे व काही मुद्यांची माहिती मिळणे अभिप्रेत आहे, ती खालीलप्रमाणे आहे.

१) अपिलार्थीच्या अर्जाच्या दिनांकापर्यंत नगर परिषद,परभणी कार्यालयास किमान वेतन कायदा लागू करण्यात आला नाही, याबाबत अभिलेखातील टिपणीच्या प्रती.

२) दि. ३१.०३.२०१० ते ३१.०३.२०११ या कालावधीत मंजूर झालेल्या कंत्राटदारांच्या देयकांचा तपशील ज्या रजिस्टरमध्ये आहे, त्या रजिस्टरमधील पृष्ठाच्या झेरॉक्स प्रती.

३) दि. ०१.०४.२०१० ते ३१.०३.२०११ या कालावधीमध्ये वैद्यकीय प्रतिपूर्ती केलेल्या नगरपरिषदेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या रजिस्टरच्या प्रती.

४) किमान वेतन कायद्यासंदर्भातील शासन निर्णयाच्या प्रती.

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे. त्यामुळे उपरोक्त चार मुद्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

या प्रकरणी तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली त्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या माहितीचा अर्ज व प्रथम अपील अर्ज यावर गांभीर्याने विचार करुन मुद्देनिहाय निर्णय दिलेला नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय असलेल्या माहितीचा ऊहापोह करुन जन माहिती अधिकारी यांना काही अडचणी असल्यास त्या सोडवून अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर घेतलेल्या निर्णयावर आयोगाने नाराजी व्यक्त केली आहे. ही बाब संचालक,नगर परिषद संचालनालय,मुंबई यांनी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना कळवून भविष्यात त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक प्रथम अपिलावर अधिनियमातील तरतुदींचा साकल्याने विचार करुन यथायोग्य निर्णय घेण्यासंदर्भात त्यांच्या स्तरावर सूचना निर्गमित कराव्यात.

प्रसंगावशात आयोगाच्या निदर्शनास आले आहे की, अपिलार्थी यांनी माहितीच्या अर्जान्वये नगर परिषद,परभणीकडे पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांच्या स्वच्छतेसंदर्भात काही माहिती विचारली आहे. माहिती मागणी केली त्यावेळी पाण्यांच्या टाक्यांची स्वच्छता करण्यात आली नव्हती. मागणी केलेल्या माहितीमध्ये व्यापक जनहित असल्याचे दिसून येत आहे. सबब सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी या संदर्भात व्यक्तिशः लक्ष घालून त्यांच्या अधिनस्त सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांना सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता व पाण्याच्या निर्जंतुकीकरणासंदर्भात निश्चित पध्दतीचा अवलंब होण्याच्या दृष्टीने मेंटेनन्स मॅन्युअल तयार करुन परिपत्रकाद्वारे सूचना निर्गमित कराव्यात, अशी

आयोगास माहिती अधिकार अधिनियमातील कलम 19(8)(a)(IV) मधील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिफारस करण्यात येत आहे.तसेच यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम 19(7) च्या तरतुदीकडे त्यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, परभणी महानगरपालिका यांनी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित वर नमूद केल्याप्रमाणे चार मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

२) संचालक,नगर परिषद संचालनालय,मुंबई यांनी या प्रकरणाशी संबंधित संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना भविष्यात त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक प्रथम अपिलासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार साकल्याने विचार करुन यथायोग्य निर्णय घेण्यासंदर्भात सूचना द्याव्यात.

३) सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांना सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता तसेच पाण्याच्या निर्जंतुकीकरणासंदर्भात निश्चित पध्दतीचा अवलंब होण्याच्या दृष्टीने मेंटेनन्स मॅन्युअल तयार करुन परिपत्रकाद्वारे सूचना निर्गमित कराव्यात, अशी शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजित रमेशराव देशमुख, श्री मोठा मारोतीमंदिराजवळ, देशमुख गल्ली, परभणी-४३१ ४०१.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, परभणी महानगरपालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, परभणी महानगरपालिका,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक,नगर परिषद संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस,वरळी,मुंबई-३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई -३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख बशीर शेख वहाब, : अपिलार्थी
रा. पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी कार्यालय,कंधार,जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषी अधिकारी,
तालुका कृषी कार्यालय,कंधार,जि.नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषी अधिकारी,तालुका कृषी कार्यालय,कंधार,जि.नांदेड - श्री. कदम अप्पाराव लक्ष्मणराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषी अधिकारी, कंधार,जि.नांदेड - श्री. अनंतराव विनायकराव सांगवीकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,तालुका कृषी कार्यालय,कंधार,जि.नांदेड यांनी आयोगासमोर सुनावणीच्यावेळी कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन २००८ ते २०११ या तीन वर्षांची कंधार तालुक्यातील रोजगार हमी योजना कामाच्या तपशीलाबाबत माहिती मागितली आहे. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे संकलीत करण्यास काही कालावधी लागला. या माहितीमध्ये गावनिहाय कामाचे नाव, काम सुरु झाल्याचा दिनांक व समाप्ती दिनांक, अंदाजपत्रकाच्या प्रती, कामावर केलेला एकूण खर्च, मोजमापपुस्तिका, हजेरीपत्रकाच्या झेरॉक्स प्रती इत्यादीची माहिती मागितली आहे. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,कंधार यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी मुद्दा क्र.१ ते ४ ची माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकाच्या छायाप्रती देण्याची आवश्यकता नाही, असे ठरले.उर्वरित माहितीमध्ये मोजमाप पुस्तिका, हजेरीपत्रके याचा समावेश आहे.ती माहिती संकलीत करुन आज सोबत आणली आहेत.

अपिलार्थी आज सुनावणीसाठी अनुपस्थित आहेत.तथापि वरील बाबी कागदपत्रांवरुन दिसून येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांना आज सोबत आणलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, कंधार,जि.नांदेड यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख बशीर शेख वहाब, मु.कोकाटेनगर, पालम, ता. जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी,तालुका कृषी कार्यालय,कंधार,जि.नांदेड- यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी,कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रामेश्वर विठ्ठलराव नायकवाल, रा. कारेगाव, : अपिलार्थी
ता.सेनगाव,जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
इंदिरा आवास योजना विभाग,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी, :
इंदिरा आवास योजना विभाग,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २४.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन

माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी,इंदिरा आवास योजना विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी, इंदिरा आवास योजना विभाग,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दि. २४.०६.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १०-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामेश्वर विठ्ठलराव नायकवाल, रा.कारेगाव,पो.सापटगाव, ता.सेनगाव, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी, इंदिरा आवास योजना विभाग,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, इंदिरा आवास योजना विभाग,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. इफ्तेखारोद्दीन म.शरफोद्दीन इनामदार, औंढा (ना), जि.हिंगोली | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी, तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (ना.), जि. हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (ना.), जि. हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (नागनाथ), जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, औंढा (नागनाथ),जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. शिंदे एन.एम.,अव्वल कारकुन | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०६.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १८.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,औंढा (ना.),जि. हिंगोली यांच्या प्रतिनिधीने आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. १६.०६.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये मौ. औंढा (ना.) येथील जामे मस्जीद इनाम जमीनी सर्वे नं. २०, २१,२२,२३,३२,३३ च्या दरसाला लावणीसाठी सन १९९३-९४ ते २०००-२००१ पर्यंतच्या ७ वर्षांची लावणी जमा रक्कम व हिशोब इनामदाराला मिळणेचा तपशील मागितला आहे. सदरची माहिती संकलीत करण्यास थोडा कालावधी लागला व अपिलार्थीस ही माहिती दि. १८.१०.२०११ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचे द्वितीय अपील दि. १४.१०.२०११ रोजीचे आहे. तदनंतर अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती दिल्याचे दिसून येत आहे. त्यासंदर्भात अपिलार्थीची पोच जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

या सर्व बाबींवरुन प्रकरण बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मो. इफ्तेखारोद्दीन म.शरफोद्दीन इनामदार, जामा मस्जीद, औंढा नागनाथ, ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा (नागनाथ), जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औंढा (नागनाथ),जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमेश पुरभाजी यादव, : अपिलार्थी
रा.बोरजा,पो.येहळेगाव (सो.),
ता.औंढा (ना.),जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
महसूल सहायक,
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६०६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०६.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दि. ०४.०८.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १०-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश पुरभाजी यादव, मु.बोरजा, पो.येहळेगाव (सो.), ता.औंढा (ना.), जि.हिंगोली-४३१ ७०५.

२. जन माहिती अधिकारी तथा महसूल सहायक,जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,

हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शफीकखाँ उमरखान पठाण, : अपिलार्थी
रा.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपसचिव,राज्य माहिती आयोग,खंडपीठ,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १०-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | सहायक जन माहिती अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद- श्री. जयंत कर्पे, वरिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कक्ष अधिकारी,राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसचिव,राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद -श्री. खालिद ब. अरब | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.०५.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २७.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०४.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी सहायक जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे

आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. या बाबीची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी, असे आयोगाचे निदेश आहेत. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी दि. २२.०२.२०१२ रोजी सकाळी ठीक ११.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १०-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शफीकखाँ उमरखान पठाण,रा.जुने बसस्टँड, नाका क्र. २, मु.पो.ता.कळमनुरी, जि.हिंगोली -४३१ ७०२.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख,<br>श्री मोठा मारोती मंदिराजवळ, देशमुख गल्ली, परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९४८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्र. वि. प्र. महानगरपालिका, परभणी - श्री. मो. मंजूर अहसन | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्र. ग्रंथपाल, महानगरपालिका, परभणी - श्री. एस. बी. दशरथे | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी तथा<br>वरिष्ठ लिपीक, महानगरपालिका, परभणी<br>- श्री. एम. झेड दरक | : | उपस्थित |
| ३.५ | जन माहिती अधिकारी तथा<br>लिपीक, महानगरपालिका, परभणी - श्री. डी. बी. गाडेकर | : | उपस्थित |
| ३.६ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त, महानगरपालिका, परभणी<br>- श्री. दिपक दिगंबरराव पुजारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०८-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, संबंधित चार जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) (ख) ची एक ते सतरा मुद्दयांच्या कामाच्या केलेल्या अंमलबजावणीसंदर्भात माहिती मागितली आहे. आतापर्यंत अपिलार्थी यांना ही माहिती मिळालेली नाही याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे. त्यावेळच्या तत्कालीन नगर परिषदकडे ही माहिती चार जन माहिती अधिकारी यांच्याकडे विखुरलेली आहे ती एकत्रित करुन नगरपालिकेला अपिलार्थीस देता आली नाही.

तत्कालीन मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी व सध्याचे उप आयुक्त, महानगरपालिका, परभणी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार कलम ४ (१) (ख) ची माहिती १२० दिवसांच्या विहित मुदतीत सार्वजनिक प्राधिकरणास प्रसिध्द करावयाची असताना सुध्दा आतापर्यंत करण्यात आली नाही याबाबत स्पष्टीकरण पुढील सुनावणीस सादर करावे लागेल. याकरिता कार्यालयातील कर्मचा-यांची बैठक घेऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) (ख) ची माहिती तयार करुन प्रसिध्द करावी लागेल. पुढील सुनावणीत त्याचा विचार करण्यात येईल. पुढील सुनावणीची तारीख २२-२-२०१२ राहील,असे आयोगातर्फे सुनावणीच्या वेळा निश्चित करण्यात आले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २२-०२-२०१२ रोजी दुपारी ०३-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, श्री मोठा मारोती मंदिराजवळ, देशमुख गल्ली, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा प्र. वि. प्र. महानगरपालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा प्र. ग्रंथपाल, महानगरपालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपीक, महानगरपालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, महानगरपालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, महानगरपालिका, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुरेश यादवराव अडागळे, : अपिलार्थी
मु. पो. इंदिरा नगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१५१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सुरेश यादवराव अडागळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी - श्री. सिराज मोहीयोद्दीन | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १०-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक १०-०५-२०११ च्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जिंतूर तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून सन २०१० ते २०११ या दोन वर्षाच्या कालावधीत झालेल्या सर्व कामाबाबतची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. त्यापैकी काही माहिती अपिलार्थीस दिनांक २२-०६-२०११ रोजी (२२ पृष्ठे) दिलेली आहे.

जिंतूर तालुक्यामध्ये एकूण १२५ गावे आहेत. या सर्व गावांमध्ये झालेल्या विविध कामाबाबतची माहिती अपिलार्थीने मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) प्रमाणे अपिलार्थीस या माहितीची पाहणी देणे आवश्यक होते. सुनावणीच्या वेळी आयोगाने सूचित केल्यानंतर अपिलार्थी यांनी स्वेच्छेने माहितीची व्याप्ती कमी केली व सांगितले की, त्यांना चारठाणा या मंडळाची माहिती द्यावी. याकरिता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस चारठाणा मंडळाअंतर्गत दोन वर्षात झालेल्या विविध कामांची संपूर्ण माहिती विनामूल्य द्यावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुरेश यादवराव अडागळे, मु. पो. इंदिरा नगर, पाथरी, तालुका पाथरी, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भांबळे बाबासाहेब जिजाभाऊ,<br>मु. पो. सावंगी (भां.), तालुका जिंतूर, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, सावंगी (भां.), तालुका जिंतूर, मार्फत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,<br>जिल्हा परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, सावंगी (भां.), तालुका जिंतूर, मार्फत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर,<br>जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एल. पी. जोशी ,वि.अ.(पं.) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १८-०६-२०११ च्या माहिती अर्जान्वये सांवगी (भां.) ग्रामपंचायत मधील ग्रामपंचायतीस प्राप्त झालेल्या विविध फंडातील कामाबाबतची तपशीलवार माहिती मागितली होती. त्याचप्रमाणे जानेवारपासून अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत किती ग्रामसभा घेण्यात आल्या त्याचा तपशील मागितला होता. माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. त्यानंतर अपिलार्थीस दिनांक २१-१२-२०११ रोजी माहिती देण्यात आली. आयोगापुढील कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भांबळे बाबासाहेब जिजाभाऊ, मु. पो. सावंगी (भां.), तालुका जिंतूर, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, सावंगी (भां.), तालुका जिंतूर, मार्फत गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश तुकाराम फुलावरे, : अपिलार्थी
मु. पो. ताडकळस (बसस्टॅण्ड जवळ), तालुका पूर्णा,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद,
परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रकाश तुकाराम फुलावरे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा,<br>जिल्हा परभणी - एम. के. थोरात | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद,<br>परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. टी. तमशेटे, कृषि अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०३-२०११ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०८-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी नुकताच कार्यभार घेतला आहे. अपिलार्थी यांनी तीन वर्षाची पूर्णा तालुक्यातील पंचायत समिती मार्फत संपूर्ण गावातील मंजूर होऊन बांधकाम पूर्ण झालेल्या बायोगॅस बाबत विविध तीन मुद्दयावर विस्तृत अशी माहिती मागितली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी तीन वर्षाची यादी तसेच दोन वर्षाची संपूर्ण माहिती आणली आहे त्याच्या झेरॉक्स प्रती तयार करुन आयोगाचे कामकाज संपण्यापूर्वी अपिलार्थीस देण्याचे आयोगाने निदेश दिले. ही माहिती अपिलार्थीने घ्यावी. अपिलार्थी यांनी या माहितीची पाहणी करावी व अपिलार्थी यांनी नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली आहे ही बाब त्यांना जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामूल्य पाठवावी. ही माहिती अपिलार्थीस देण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश तुकाराम फुलावरे, मु. पो. ताडकळस (बसस्टॅण्ड जवळ), तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बालासाहेब विठ्ठलराव कदम,<br>जुनी पंचायत समिती रोड, पालम, अहिल्यादेवी<br>मंदिराजवळ, पालम, जिल्हा परभणी | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, गटसाधन केंद्र पालम, जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालय, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१९७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, गटसाधन केंद्र पालम, जिल्हा परभणी<br>- श्री. ससाणे संजय धोंडीराम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालय, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी पालम तालुक्यातील विविध योजनांची तपशीलवार गावनिहाय यादी, गावनिहाय हजेरीपट यादी, हंगामी वस्तीगृह, खाऊवाटप, बांधकाम शाळा यादी, एकूण तांदुळ निधी किती इत्यादीबाबत सन २००६ ते २०११ या पाच वर्षातील विविध योजनांची माहिती मागितली आहे. अपिलार्थी स्वतः माहिती घेणार होते. माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. अपिलार्थीस दिनांक २२-०९-२०११ रोजी शिक्षणाधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी सुनावणीस उपस्थित होते. त्यांनी व्यक्तिशः माहिती घेतली आहे व त्याबाबतची पोच दिलेली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस दिनांक २२-०९-२०११ रोजी माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीचे व्दितीय अपील दिनांक ०९-०९-२०११ रोजीचे आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालासाहेब विठ्ठलराव कदम, जुनी पंचायत समिती रोड, अहिल्यादेवी मंदिराजवळ, पालम, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, गटसाधन केंद्र पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शाम विश्वनाथ नारायणकर, : अपिलार्थी
अण्णाभाऊ साठे नगर, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शाम विश्वनाथ नारायणकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी<br>- श्री. एस. आर. चिथडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २०-०५-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०५-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शाम विश्वनाथ नारायणकर, अण्णाभाऊ साठे नगर, पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पूर्णा, जिल्हा परभणी
४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हबीब अहेमद उर्फ चाऊस पि. हबीब अब्दुला, | : | अपिलार्थी |
| | रा. मंगळवारा, शाही मस्जीद जवळ, परभणी, | | |
| | तालुका जिल्हा परभणी | | |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | | |
| | जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | | |
| | - श्री. श्रीकांत कुलकर्णी | | |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | अनुपस्थित |
| | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये फैजुल उल्लूम प्राथमिक शाळा संच मान्यता व शिक्षकांची मान्यता, प्राथमिक शाळेचा संच मान्यता प्रस्ताव, देण्यात आलेली संच मान्यता, शिक्षकांचे वैयक्तीक मान्यता प्रस्ताव व मान्यता, तुकडी मान्यता प्रस्ताव व मान्य झालेल्या तुकड्या इत्यादी सन २००५ ते २०११ या सहा वर्षाच्या कालावधीतील एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे.

सदरची माहिती ज्या कर्मचा-याकडे उपलब्ध असते त्याच्यातर्फे कार्यभार हस्तांतरण झालेले नाही, त्यामुळे माहितीचा शोध घेणे कठीण होत आहे. याबाबत संबंधित तीन कर्मचा-यविरुध्द विभागीय कारवाई प्रस्तावित केली आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस मागितलेली माहिती शोधून देण्यास विलंब लागला. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली काही माहिती दिनांक १२-१०-२०११ व दिनांक ०७-०१-२०१२ रोजी उर्वरीत माहिती दिली आहे. सदरची माहिती संबंधित मुख्याध्यापका-कडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस देण्यात आली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व अपिलार्थीच्या व्दितीय अपिलावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीचे व्दितीय अपील दिनांक ०८-०९-२०११ रोजीचे आहे व अपिलार्थीस दिनांक ०७-०१-२०१२ रोजी ६० पृष्ठांची संपूर्ण माहिती विनामूल्य देण्यात आली आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हबीब अहेमद उर्फ चाऊस पि. हबीब अब्दुला, रा. मंगळवारा, शाही मस्जीद जवळ,

परभणी, तालुका जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिनबंधु सुदामराव हत्तीअंबीरे, : अपिलार्थी
महात्मा फुले नगर, गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बां.), उपविभाग,
गंगाखेड, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, परभणी

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३०८

२ सुनावणीची तारीख दि. ११-०१-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. दिनबंधु सुदामराव हत्तीअंबीरे : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बां.), उपविभाग,
गंगाखेड, जिल्हा परभणी - श्री. पी. जे. पाटील

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, परभणी

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १३-०६-२०११

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०७-२०११

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी माहिती अर्जान्वये २२ मुद्दयावर जिल्हा परिषद बांधकाम उपविभागाअंतर्गत माहिती मागितली आहे. त्यांना ही संपूर्ण माहिती आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांना मिळालेल्या माहितीची पाहणी करावी. या माहितीत त्यांना काही अपूर्ण माहिती मिळाली असल्यास ही बाब त्यांनी जन माहिती अधिकारी यांना पंधरा दिवसाच्या आत कळवावी व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जासंदर्भात उर्वरीत माहिती अपिलार्थीस द्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने वर नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत कळविल्यास उर्वरीत माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिनबंधु सुदामराव हत्तीअंबीरे, रिपाई (आठवले गट), तालुका सरचिटणीस, महात्मा फुले नगर, गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बां.), उपविभाग, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बां.), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रकाश विठ्ठलराव मुंढे, : अपिलार्थी
मु. पो. पिंपळदरी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
गंगाखेड, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
गंगाखेड, जिल्हा परभणी

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३२१

२ सुनावणीची तारीख दि. ११-०१-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
गंगाखेड, जिल्हा परभणी

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,
गंगाखेड, जिल्हा परभणी - श्री. तुकाराम गोविंदराव कासले

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०-०५-२०११

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख --

६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०७-२०११

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांच्या अधिपत्त्याखालील दोन मंडळाकडून गोळा करुन ती एकत्रित करुन अपिलार्थीस दिनांक २२-०९-२०११ रोजी दिलेली आहे व त्याची पोच अपिलार्थीने दिलेली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीचे व्दितीय अपील दिनांक १९-०९-२०११ रोजीचे आहे व त्यानंतर दिनांक २२-०९-२०११ रोजी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ११-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश विठ्ठलराव मुंढे, मु. पो. पिंपळदरी, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, गंगाखेड, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रत्नाकर त्रिंबकराव कहात,<br>नवा मोंढा (अण्णासाहेब गव्हाणे) रोड, डॉ. मानवतकर यांचे घरासमोर, परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धर्मापुरी,<br>तालुका जिल्हा परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रत्नाकर त्रिंबकराव कहात | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धर्मापुरी,<br>तालुका जिल्हा परभणी - श्री. टेकाळे आर. बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. आर. चिलगर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-०७-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७-०७-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७-०७-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २२-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी सन २००७ आणि यापूर्वीची त्यांच्या स्वतःच्या जागेची एकूण तीन मुद्दयांवर माहिती मागितली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक दोन व तीनची माहिती अपिलार्थीस यापूर्वी देण्यात आली आहे व मुद्दा क्रमांक एकची माहिती त्यांना आज रोजी देण्यात आली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात ही बाब मान्य केली.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रत्नाकर त्रिंबकराव कहात, नवा मोंढा (अण्णासाहेब गव्हाणे) रोड, डॉ. मानवतकर यांचे घरासमोर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धर्मापुरी, तालुका जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी, :
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१८७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजयभाऊ जयराम कांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर- श्री. बी.बी. खंदारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर,जि.लातूर- श्री.आर.एस.कदम | : | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १९.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.०२.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.०४.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.०७.२०११ (फेरसादर,दि.१६.०९.२०११) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंनी आयोगासमोर त्यांचा युक्तिवाद कथन केला. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये सन २००६ ते २०१० या कालावधीची अहमदपूर तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फतच्या सर्व मंजूर मातीकामाची तसेच तालुका कृषि अधिकारी श्री. पाटील यांनी केलेल्या चेक मेजरमेंट, वैद्यकीय बिलाची व कृषि विस्तार योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाची विविध माहिती एकंदर ५ मुद्यांद्वारे मागितली आहे. ही माहिती अपिलार्थी व्यक्तिशः घेणार होते. या माहितीपोटी ₹१६,४५०/- शुल्काचा भरणा करावा, असे दि. १४.०२.२०११ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. अपिलार्थी यांना हे पत्र प्राप्त झाले नाही, असे त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये कथन केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचे दि. २२.०२.२०११ रोजीचे प्रथम अपील दि. २८.०२.२०११ रोजी प्राप्त झाले. त्यासंदर्भात दि. २८.०३.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली आहे. त्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यावेळी शुल्काचा भरणा केल्यावर अपिलार्थीस माहिती देण्यात यावी, असा निर्णय प्रथम अपिलावर सुनावणीच्या वेळी घेण्यात आला आहे. अपिलार्थी यांनी आज रोजीच्या सुनावणीच्या वेळी युक्तिवादात कथन केले की, त्यांना शुल्काचा तपशील कळविलेला नाही. तसेच माहितीसाठी शुल्काचा भरणा करावा हे जन माहिती अधिकारी यांचे पत्र प्राप्त झाले नाही. त्यामुळे त्यांना विनामूल्य माहिती द्यावी.

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती एकंदर अंदाजित ८००० पृष्ठांची विस्तृत प्रमाणात आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावेत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती सशुल्क द्याव्यात. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेली माहिती पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही

कागदपत्रांच्या प्रती सशुल्क द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कांबळे संजयभाऊ जयराम, द्वारा ॲड. गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सतीश चन्नवीरजी डोणगावकर,<br>रा.उदगीर, जि.लातूर. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार,पुरवठा विभाग, उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०६१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सतीश चन्नवीरजी डोणगावकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार,पुरवठा विभाग, उदगीर, जि.लातूर - श्री. गोविंद येरमे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६/०४/२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. --/०४/२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९/०५/२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८/०८/२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंनी आयोगासमोर आपला युक्तिवाद कथन केला. आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन अपिलार्थी यांनी दि. ०६.०४.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये एकूण ५ त्रयस्थ स्वस्तधान्य दुकानांची एपीएल गहू व तांदुळ पावती बुकच्या छायाप्रती व वाटप रजिस्टरच्या प्रती अशी सन जानेवारी, २००६ ते डिसेंबर,२००९ या कालावधीची माहिती मागितलेली आहे. जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे, ती देण्यात आली आहे. उर्वरित माहिती पाच स्वस्तधान्य दुकानदार यांच्याकडे आहे. ती माहिती पुरविण्याकरिता दुकानदारांना कळविण्यात आले आहे.त्रयस्थ दुकानदारांनी या माहितीच्या कागदपत्रांच्या छायाप्रतीसाठी ₹१२,०००/- खर्च होतील असे कळविले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जावर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. यासाठी जन माहिती अधिकारी यांनी संबंधित स्वस्तधान्य दुकानदारांकडून ही माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये मागवून अपिलार्थीस या माहितीची पाहणी देऊ करणे व तदनंतर त्यांना आवश्यक काही कागदपत्रे देण्यासंदर्भात निर्णय घेणे उचित राहिले असते. अशाप्रकारचा निर्णय संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनीही या प्रकरणी घेतल्याचे दिसून येत नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांनी या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन अधिनियमातील तरतुदीनुसार पुन्हा सुनावणी घेऊन यथोचित निर्णय घेण्यासाठी आयोगातर्फे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०५.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक ११-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सतीश चन्नवीरजी डोणगावकर, बस्वेश्वर चौक, रेल्वेस्टेशन रोड, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,पुरवठा विभाग, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे, : अपिलार्थी
रा.पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा दुग्धविकास अधिकारी, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य), मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३९६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी -श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.०५.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ३०.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २७.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, त्यांनी त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जाद्वारे मागासवर्गीय मत्स्य व्यावसायिक सहकारी संस्था,म.पाथरी, जि.परभणी संदर्भात एकूण १४ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी सन २००० ते २०११ असा आहे. त्यांना आजपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळालेली नाही. त्यांच्या

प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (मत्स्य),म.रा. मुंबई यांनी सुनावणी घेऊन दि.०५.१२.२०११ रोजी निर्णय दिला आहे. या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते. सुनावणीनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिले आहेत की, " ---- अर्जदार यांना आवश्यक असलेली माहिती संस्थेकडुन प्राप्त करुन द्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा. अर्जदार यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी गैर अर्जदार यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधून हवी असलेली संपूर्ण माहिती प्राप्त करुन घेऊन तसे या कार्यालयास कळवावे." तथापि त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही.

आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित नाहीत. त्यांची बाजू आयोगास समजू शकत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. या बाबीची गंभीर दखल आयोग घेत आहे. यासंदर्भात जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्याकरिता पुढील सुनावणीची तारीख देण्याचा निर्णय आयोग घेत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २२.०२.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक ११-०१-२०१२**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळकृष्ण शंकरराव कांबळे, इंदिरानगर, पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा दुग्धविकास अधिकारी, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य),आयुक्त मत्स्य व्यवसाय यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, तारापोरवाला मत्स्यालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एम.एस.बोधने, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक धर्मदाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४३८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अधीक्षक,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी- श्री.पांडुरंग रामराव चव्हाण | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक धर्मदाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २६.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक

वाटते. तसेच जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी यांची अधिनियमातील कलम १८ (३) (ङ) नुसार विशेष साक्ष आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २२.०२.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एम.एस.बोधने,प्रतापनगर,नांदखेडा रोड,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शेख असलम शेख पाशा,<br>रा.गुलशनाबाद, परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>सहायक जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले महामंडळ मागासवर्ग (मर्या.),परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले महामंडळ मागासवर्ग (मर्या.),परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख असलम शेख पाशा | : | उपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांचे मदतनीस श्री. शेख नबी शेख जलिल | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - लिपीक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित),परभणी - श्री. मो. एजाज खाँन | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), परभणी- श्री. एस.एम.चिलवंत | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०.१०.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, त्यांचे मदतनीस, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंनी कथन केलेला युक्तिवाद आयोगाने ऐकून घेतला. अपिलार्थी यांनी सन २००७ ते मार्च, २०११ मध्ये एन.एस.के.एफ.डी.सी.मुंबई यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाबाबत एकूण ५ मुद्यांद्वारे विस्तृत अशी माहिती मागितली आहे. या कालावधीमधील या योजनेअंतर्गत सुमारे ८०० लाभार्थी असतील, असे जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले. या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त होत असते. तथापि अभिलेखातील यासंदर्भातील उपलब्ध कागदपत्रे त्रयस्थांची माहिती असल्यामुळे अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदीनुसार त्रयस्थांची बाजू ऐकून घेणे आवश्यक आहे. जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जी माहिती देय होत असेल ती अपिलार्थीस देणे आवश्यक आहे अथवा माहितीचे स्वरुप व्याप्ती विचारात घेऊन अधिनियमातील कलम ७(९) प्रमाणे माहितीची पाहणी देणे उचित होईल. या सर्व बाबी साकल्याने विचारात घेऊन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर प्रथमतः अधिनियमातील कलम ८,११, ७(९) इ. तरतुदी विचारात घेऊन सुनावणी होऊन यथायोग्य निर्णय पारित होणे आवश्यक आहे. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या सर्व बाबी पाहता, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ(मर्यादित), मुंबई यांना एक विशेष बाब म्हणून जन अपिलीय अधिकारी म्हणून आयोगास प्राप्त अधिकारानुसार निश्चित करण्यात येत आहे. त्यांच्याकडे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांनी अपिलार्थीच्या दि.

०६.०९.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख असलम शेख पाशा, रा.गुलशनाबाद, द्वारा चॉईस टेलर, सुपर मार्केट रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा लिपीक, महात्मा फुले मागासवर्ग महामंडळ (मर्यादित) , परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग महामंडळ (मर्यादित) परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्यादित), सुप्रिम शॉपिंग सेंटर, गुलमोहर क्रासरोड, नं.९, जेव्हीपीडी स्कीम, जुहू-४९, मुंबई यांना अपिलार्थीचा माहिती अर्ज, प्रथम व द्वितीय अपील यांच्या प्रतीसह या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. ठाकुर अंबादास सखाराम, : अपिलार्थी
रा.पालम, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय,पालम, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय
कार्यालय,पालम,जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. ठाकुर अंबादास सखाराम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - कृषी अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, पालम, जि.परभणी - श्री. डी.पी.विभुते | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषी अधिकारी, पालम, जि.परभणी - श्री. एस.व्ही.लाडके | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन २००९ ते दि. ०६.०४.२०११ पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून झालेल्या कामाबाबत ९ मुद्यांद्वारे विस्तृत माहिती मागितली आहे. या माहितीमध्ये (१) गावाचे नाव (२) कामाचे नाव (३) काम सुरु दिनांक व समाप्त दिनांक(४) कामाची एकूण अंदाजपत्रकीय किंमत(५) कामावर केलेला एकूण खर्च (६) मोजमाप पुस्तिकेची झेरॉक्स(७) अंदाजपत्रकाची झेरॉक्स (८) हजेरीपत्रके(९) अंतीम प्रमाणपत्र या मुद्यांचा समावेश आहे. या माहितीकरिता ₹२०००/- रक्कम भरावी म्हणजे प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील असे दि. १५.०४.२०११ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस कळविले आहे. तसेच प्रत्यक्ष कार्यालयास भेट देऊन माहिती पाहून माहितीच्या झेरॉक्स प्रतीच्या खर्चाची रक्कम भरणा करावी, असाही पर्याय देण्यात आला आहे.त्याचप्रमाणे गोषवाऱ्याच्या दहा पानाची रक्कम ₹२०/- जमा करुन तेवढी माहिती घेऊन जावी व उर्वरित माहिती आवश्यक ती रकमेचा भरणा केल्यावर देण्यात येईल, असेही कळविण्यात आलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी या पत्रात असेही नमूद केले आहे की, दि. ०६.०४.२०११ रोजीचा अर्ज प्राप्त झाला. अर्जासोबत दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा करण्याबाबतचे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही, असा युक्तिवाद आयोगासमोर मांडला.

वरील सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती देण्याची जन माहिती अधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे, असे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीचा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले नाही. अपिलार्थी यांनी दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र सादर केले नाही किंवा शुल्काची रक्कमही भरली नाही. त्यामुळे अपिलार्थीस माहिती मिळविण्यामध्ये स्वारस्य नसावे, या निष्कर्षाप्रत येऊन या स्तरावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. ठाकुर अंबादास सखाराम, मु.पो. कोकाटेनगर, पालम, ता.पालम, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, पालम, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सय्यद शफीक सय्यद पाशा, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
अल्पसंख्यांक विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई-३२

जन अपिलीय अधिकारी, :
अल्पसंख्यांक विकास विभाग,
मंत्रालय,मुंबई-३२

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०३.२०११ (मुंबई कार्यालयास प्राप्त)<br>दि. २६.०९.२०११ (औ.बाद कार्यालयास प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ व्यक्तीच्या संदर्भात स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती अपेक्षिली आहे.सदर माहिती अधिनियमातील कलम २(च)मधील 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाही.त्यामुळे सदरची माहिती अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणार नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सय्यद शफीक सय्यद पाशा, महात्मा गांधीनगर, धार रोड, परभणी - ४३१ ४०१

२. जन माहिती अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी,अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संभाजी वामनराव मोरे, : अपिलार्थी
रा.पिंपळगाव, पो.गौर, ता.पुर्णा, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उप कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५७८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उप कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग,जिल्हा परिषद, परभणी- श्री. शेख एम.एन. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, परभणी - श्री. पी.जे.पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी जिल्हा परिषद, परभणी येथील दोन उपविभागाअंतर्गत सन २००७ ते २०११ या वर्षात पूर्ण झालेल्या अंगणवाडी, तिर्थ क्षेत्र, एस.आर.एफ.,एस.आर. व सी.आर., दवाखाना दुरुस्ती, शाळा दुरुस्ती व नवीन शाळा बांधकाम, क्वॉर्टर दुरुस्ती, आमदार व खासदार फंड परभणी जिल्हयासाठी किती प्राप्त झाला, अशी विविध मुद्यांसंदर्भात विस्तृत माहिती मागितली आहे. या माहितीची व्याप्ती विस्तृत असल्यामुळे त्याचप्रमाणे माहिती उपविभागाशी संबंधित असल्यामुळे एका महिन्याच्या आत ही माहिती संकलीत करणे अशक्यप्राय होते. पुढे आयोगासमोर असेही कथन केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात दि. ११.१०.२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. त्यासंदर्भात झालेल्या निर्णयानुसार अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्यात यावी, असे जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केले होते. सदर माहिती संकलीत करुन आज सोबत एकून २९९+३६१=६६० पृष्ठांची माहिती आज सोबत आणली आहे.अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत.

आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(ञ)(एक) नुसार पहिला पर्याय म्हणजे माहितीची पाहणी देणे असा आहे. तथापि जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहिती संकलीत करुन आज रोजी सोबत आणलेली आहे. सदर माहितीचा संच अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्याची व्यवस्था करावी लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, परभणी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचा संच आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संभाजी वामनराव मोरे, मु.पिंपळगाव, पो.गौर, ता.पूर्णा, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग,जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. भास्कर गोविंदराव साळवे, : अपिलार्थी
पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,सेलु,
जि.परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,सेलु,
जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,सेलु, जि.परभणी - श्री. मिर बासीत अली | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, सेलू, जि.परभणी - श्री. आर.ऐ.रोडगे | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०६.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०७.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सन २०१० - २०११ या कालावधीची सेलू तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील झालेल्या कामाची विस्तृत माहिती मागितली आहे. या माहितीमध्ये - महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेली कामे, मोजमाप पुस्तिका, कामावर असलेल्या मजूरांच्या हजेरीपटाच्या छायांकित प्रती व जलसंधारणाची झालेली कामे, सलग समतलचर, जैविक बांध, रा.ढा.बा. लुझ बोल्डर स्ट्रॅक्चर, अर्दन स्ट्रॅक्चर, मातीचे नाला बांध, सिमेंट बंधारा, फळबाग लागवडीचे अनुदान, ठिबक सिंचनचे अनुदान व लाभार्थीची यादी व विविध योजनेमध्ये झालेली कामे, गावनिहाय व मंडळ निहाय लाभार्थीच्या नावासह तालुका कृषि अधिकारी यांच्या संपूर्ण कार्यक्षेत्राची माहिती, मृद संधारण योजनेअंतर्गत कोणती कामे करण्यात आली, कामाचा प्रकार, स्वरुप व गावनिहाय माहिती, आतापर्यंत किती खर्च झाला, कामे पूर्ण किती अपूर्ण किती तसेच कामावर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नावे, अंदाजपत्रकाच्या नकला - या मुद्यांचा समावेश आहे. सदर माहितीची व्याप्ती विचारात घेता कलम ७(१) नुसार एका महिन्यात संकलीत करुन देणे शक्य नव्हते. तथापि सर्व माहिती संकलीत करुन अपिलार्थीस दि. ०९.०१.२०१२ रोजी एकूण १६३ पृष्ठे विनामूल्य देण्यात आली आहेत. यासंदर्भातील अपिलार्थीची पोच त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस दि. ०९.०१.२०१२ रोजी माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीचे द्वितीय अपील दि. १८.१०.२०११ रोजीचे आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भास्कर गोविंदराव साळवे, ज्ञानेश्वर नगर, पाथरी, ता.पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,सेलु, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, सेलु, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती प्रभावती एकनाथराव राऊत, : अपिलार्थी
रा.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
नगर परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६५१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. ११-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती प्रभावती एकनाथराव राऊत | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर रचनाकार, महानगरपालिका, परभणी - श्री. अजय वि.कस्तुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी - कर अधीक्षक, महानगरपालिका, परभणी - श्री. नगरसाळे एस.बी. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - उपआयुक्त, महानगरपालिका, परभणी - श्री. दिपक पुजारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.१०.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०३.१०.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांच्या स्वतःच्या जागेसंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली आहे. त्यापैकी त्यांना काही मुद्यांची माहिती मिळाली आहे व काही मुद्यांची माहिती मिळणे अभिप्रेत आहे, ती खालीलप्रमाणे आहे.

५) दि.२४.०१.१९६७ ला देण्यात आलेल्या परवानगीची प्रत. मुद्दा क्र. १ व २ मधील बांधकामच्या परवानगीची प्रत जी सन १९६७ साली मिळाली आहे, ती मिळाली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अशाप्रकारची सन १९६७ साली बांधकाम परवानगी देण्यात आली नव्हती. ती सन १९८४ ला देण्यात आलेली आहे. त्यासंदर्भातील माहिती देण्यात आली आहे. यासंदर्भात आयोगाचे अभिप्राय असे आहेत की, जर सन १९६७ साली अपिलार्थीने संदर्भित केलेली बांधकाम परवानगी देण्यात आलेली नसेल तर त्यासंदर्भात अभिलेखात जी उपलब्ध कागदपत्रे आहेत त्याची प्रत अपिलार्थीस देण्यात यावी. त्याप्रमाणे आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यासंदर्भातील कागदपत्रे देण्यात आली. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

६) वॉर्ड क्र. ३५(जुना) मालमत्ता क्रमांक २९ श्री. महम्मद जफर ताहेर अन्सारी दि. २२.०३.२००२ कर वसूली पावतीची झेरॉक्स प्रत प्राप्त झाली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक यांनी आयोगासमोर कथन केले की, सदरच्या पावत्या जुन्या असल्याकारणाने नगर पालिकेच्या कार्यप्रणालीनुसार नष्ट करण्यात आल्या आहेत. तथापि कराचा भरणा केला आहे, त्या रजिस्टरमधील नमूद भागाच्या प्रमाणित प्रती आज रोजी आयोगाच्या सूचनेनुसार अपिलार्थीस देण्यात आल्यात. अपिलार्थी यांनी त्या स्वीकारल्या.

७) सन २००२(दि. २२.०३.२००२) मध्ये श्री.महम्मद जफर ताहेर अन्सारी यांना नगर परिषदेने दिलेल्या जागेच्या प्रमाणपत्राची प्रत देण्यात आली नाही. सदर जागेचा फेरफार झालेला आहे. त्यासंदर्भातील नोंद असलेली कागदपत्रे अपिलार्थीस प्रमाणित प्रतीच्या स्वरुपात आज रोजी आयोगाच्या सूचनेनुसार देण्यात आलीत. अपिलार्थी यांनी ती स्वीकारली.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक ११-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. प्रभावती एकनाथराव राऊत, अग्निशामक दल, क्वॉर्टर, नगर परिषद, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, महानगरपालिका,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, : अपिलार्थी
श्री मोठा मारोती मंदिरा जवळ, देशमुख गल्ली, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी
मर्या. उपविभाग, जिंतूर, जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी
मर्या. विद्युत भवन, जिंतूर रोड, जिल्हा परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१९४७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी<br>मर्या. उपविभाग, जिंतूर, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी<br>मर्या. विद्युत भवन, जिंतूर रोड, जिल्हा परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-०५-२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५-०७-२०११ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०२-०८-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत याची गंभीर दखल आयोगाने घेतली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी दिनांक ०४-०५-२०११ च्या माहिती अर्जान्वये कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांना श्री. बी. डी. शिवकर यांच्याबाबत एकूण बारा मुद्दयावर माहिती मागितली आहे. या माहितीकरिता जन माहिती अधिकारी यांनी सदरचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी सहायक अभियंता, राज्य विज वितरण कंपनी मर्या. उपविभाग, जिंतूर, जिल्हा परभणी यांच्याकडे वर्ग केला आहे. त्यांच्याकडून अपिलार्थीस माहिती प्राप्त झालेली नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या प्रथम अपिलावर दिनांक १४-०७-२०११ रोजी सुनावणी झाली आहे व जन माहिती अधिकारी यांना १४ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती द्यावी असा निर्णय दिला आहे तथापि त्यांना आजपर्यंत जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. उपविभाग, जिंतूर, जिल्हा परभणी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार माहितीच्या अर्जावर विहित मुदतीत कलम ७ (१) नुसार माहिती देणे त्यांची प्रमुख जबाबदारी आहे. तथापि आज रोजी सुनावणीच्या दिनांकापर्यंत (दिनांक १२-०१-२०१२ पर्यंत) अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांना आज रोजी सुनावणीस उपस्थित राहून त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली होती. तथापि ते अनुपस्थित आहेत. अपिलार्थीस माहिती न देण्याचा प्रमाद त्यांच्या हातून घडला असून माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी करण्याबाबत त्यांच्याकडून कसूर झाला आहे.

संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. उपविभाग, जिंतूर, जिल्हा परभणी (श्री. बन) यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांना रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांची राहील.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीमध्ये काही माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये नमूद

माहितीच्या व्याख्येत बसत नाही. ही माहिती वगळून उर्वरीत माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य नोंदणीकृत टपालाने पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. उपविभाग, जिंतूर, जिल्हा परभणी (श्री. बन) यांना रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परभणी यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विश्वजीत रमेशराव देशमुख, श्री मोठा मारोती मंदिरा जवळ, देशमुख गल्ली, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. उपविभाग, जिंतूर, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. विद्युत भवन, जिंतूर रोड, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती जयश्री पि. दिनकरराव देशमुख, : अपिलार्थी
सौभाग्यवती निवास, मु. पो. झरी, तालुका जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप आयुक्त, विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, विभाग, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०२१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती जयश्री पि. दिनकरराव देशमुख | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी (प्र.), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद - श्री आर. व्ही. कड | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद - श्री. पी. व्ही. बनसोडे | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ३०-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०८-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, श्रीमती जयश्री दिनकरराव देशमुख, सह शिक्षिका, जिल्हा परिषद, परभणी यांनी दिनांक ०४-०६-२०११ च्या माहितीच्या अधिकारातील अर्जान्वये जिल्हा परिषद, परभणी मधील प्रतिनियुक्ती संदर्भातील माहिती व कार्यालयाच्या मान्यतेशिवाय करण्यात आलेल्या प्रतिनियुक्ती बाबत संबंधित अधिका-यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत अशी एकूण बारा मुद्दयांवर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयाचे पत्र दिनांक २८-०६-२०११ अन्वये अपिलार्थीस नोंदणीकृत डाकेने माहितीचे व पोस्टाचे शुल्क रुपये ३३०/- भरणे विषयी कळविले होते. सदरील पत्र अपिलार्थी श्रीमती जयश्री दिनकरराव देशमुख यांना दिनांक ०१-०७-२०११ रोजी प्राप्त झालेले आहे.

परंतु ३० दिवसाचा कालावधी होण्यापूर्वीच श्रीमती जयश्री दिनकरराव देशमुख यांनी दिनांक ०४-०६-२०११ रोजीच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती न मिळाल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) नुसार दिनांक ३०-०६-२०११ च्या अर्जान्वये प्रथम अपील दाखल केले. त्यानुसार अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाचे पत्र दिनांक ०७-०७-२०११ अन्वये प्रथम अपिलाची सुनावणी दिनांक १८-०७-२०११ रोजी दुपारी ०१-०० वाजता ठेवण्यात आली असल्याचे कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे सदर सुनावणीस अपिलार्थी स्वतः हजर होत्या.

अपिलार्थी यांनी कागदपत्राचे शुल्क व पोस्टाचा खर्च चलनाव्दारे दिनांक ०४-०७-२०११ रोजी भरणा केले असल्याने, अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०६-२०११ रोजीच्या अर्जाव्दारे शासकीय माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्रशासन) यांचेकडे जी माहिती मागितली होती ती माहिती नियमातील तरतुदीप्रमाणे आठ दिवसात अपिलार्थीस पोस्टाव्दारे देण्याचे निर्देश अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (आस्थापना) यांनी सहायक माहिती अधिकारी यांना सुनावणीच्या दरम्यान दिले होते.

त्यानुसार जिल्हा परिषद, परभणी मधील विविध संवर्गातील कर्मचा-यांच्या प्रतिनियुक्ती व बदल्या प्रस्तावास मान्यता दिलेल्या प्रस्तावासंदर्भातील माहिती संबंधितास देण्यात आली तसेच संबंधिताच्या अर्जामध्ये अ. क्र. ७ ते १२ वर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती मागितली होती. माहितीच्या अधिकारात अभिलेख्यामध्ये उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या प्रतीच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. मुद्दयावरील मते, कोणती कार्यवाही केली, इत्यादीचा समावेश माहितीच्या व्याख्येत होत नसल्याने अशी माहिती देता येणार नसल्याचे श्रीमती जयश्री दिनकरराव देशमुख यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक २५-०७-२०११ अन्वये कळविण्यात आले आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांना काही माहिती मिळाली आहे. तथापि मुद्दा क्रमांक २ व ५ यासंदर्भातील माहिती त्यांना मिळाली नाही.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज दिनांक ०४-०६-२०११ चा आहे. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०६-२०११ रोजी शुल्काचा भरणा करावा असे अपिलार्थीस कळविले आहे. तथापि या शुल्काचा भरणा करण्याऐवजी अपिलार्थीने दिनांक ३०-०६-२०११ रोजी तीस दिवसाच्या आत जन अपिलीय अधिकारी यांच्याडे प्रथम अपील दाखल केले व तदनंतर दिनांक ०४-०७-२०११ रोजी या शुल्काचा भरणा केला. त्यानुसार दिनांक २५-०७-२०११ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली आहे. अपिलार्थी यांना काही मुद्दयावर माहिती मिळाली नाही व ती मिळण्याची त्यांनी आयोगास विनंती केली. विशेषत: मुद्दा क्रमांक २, ५ व ६ या मधील त्यांनी आयुक्त कार्यालयाला प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावाबाबत टिपणी इत्यादीची व्यापक स्वरुपात सन २००८ पासून ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतची माहिती मागितली आहे. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची साधनसामग्री व मनुष्यबळ मोठ्या प्रमाणावर वळवावे लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियमतील भूमिकेशी सुसंगत दृष्टीकोनातून माहितीची मागणी करणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे व माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत. ही बाब विचारात घेता अपिलार्थी यांनी त्यांना नेमकी कोणती माहिती आवश्यक आहे ती नमूद करुन मागणी सूचित करावी. त्यानंतर त्यांना माहिती पुरविणे शक्य होईल. ही बाब अपिलार्थी यांनी मान्य केली व त्यांना आवश्यक असलेली नेमकी माहिती त्या वेगळ्या अर्जाने मागतील असे त्यांनी आयोगास सांगितले. वरील पार्श्वभूमीवर प्रकरण बंद करण्याच्या निर्णयाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०१-२०१२**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती जयश्री पि. दिनकरराव देशमुख, सौभाग्यवती निवास, मु. पो. झरी, तालुका जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (प्र.), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनिल केशवराव कान्हे, : अपिलार्थी
सचिव, लक्ष्मीबाई कान्हेपाटील सेवाभावी संस्था, परभणी,
व्दारा, कान्हेपाटील हॉस्पिटल, शिवाजी पुतळयाजवळ, डॉ.
हेडगेवार मार्ग, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०५६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अनिल केशवराव कान्हे | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली<br>- श्री. र. वै. मिटकरी | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १४-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६-०७-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-०८-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांना दिनांक १९-०४-२०११ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे. तथापि त्यांना ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत मिळाली नाही. अपिलार्थी यांना दिनांक २६-०७-२०११ रोजी माहिती देण्यात आली आहे. यावरुन माहिती मिळण्यास एकूण ६७ दिवसांचा विलंब झाला आहे. याकरिता संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली व त्यांचे सहायक अधिकारी / कर्मचारी रुपये १६,७५० /- (अक्षरी रुपये सोळा हजार सातशे पन्नास) शास्तीस पात्र ठरत आहे.

संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली व त्यांचे सहायक अधिकारी / कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे रुपये १६,७५० /- (अक्षरी रुपये सोळा हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा आयोगास कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत सादर करावा लागेल. संबंधित जन माहिती अधिकारी यांना ही नोटीस तामीली करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, हिंगोली यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली व त्यांचे सहायक अधिकारी / कर्मचारी यांना रुपये १६,७५० /- (अक्षरी रुपये सोळा हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०१-२०१२**

------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनिल केशवराव कान्हे, सचिव, लक्ष्मीबाई कान्हेपाटील सेवाभावी संस्था, परभणी, व्दारा, कान्हेपाटील हॉस्पिटल, शिवाजी पुतळ्याजवळ, डॉ. हेडगेवार मार्ग, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी,<br>विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली - श्री. डी. डी. फुपाटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ३१-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११-०४-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०५-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०५-०८-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

पुढील सुनावणी दिनांक २३-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## अंतरिम आदेश

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २३-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बालासाहेब विठ्ठलराव कदम, : अपिलार्थी
जुनी पंचायत समिती रोड, पालम, तालुका पालम,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, पालम,
जिल्हा परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम कार्यालय,
परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पालम,<br>जिल्हा परभणी - श्री. एम. ए. जलील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी<br>- श्री. जी. एस. खाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०७-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०९-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जान्वये प्रश्नार्थक स्वरुपाची विविध कामाबाबतची पालम तालुक्यातील माहिती मागितली आहे. ही संपूर्ण माहिती विहित मुदतीत एका महिन्याच्या आत तयार ठेवण्यात आली होती. अपिलार्थी हे व्यक्तिशः माहिती घेणार होते. परंतु अपिलार्थी माहिती घेण्यास उपस्थित झाले नाहीत म्हणून अपिलार्थीस दिनांक १७-१२-२०११ रोजी पोस्टाने माहिती पाठविण्यात आली आहे. तथापि अपिलार्थी यांनी दिनांक ११-०१-२०१२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे की, त्यांना माहिती अपूर्ण व इंग्रजीतून मिळाली आहे. त्यांना संपूर्ण माहिती मराठीमध्ये आवश्यक आहे. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती मराठीमध्ये भाषांतरीत करुन पाठविली आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन या बाबी दिसून येत आहे. अपिलार्थीने यांनी मागितलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार देय होत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या स्वरुपात माहिती तयार करुन दिली आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालासाहेब विठ्ठलराव कदम, जुनी पंचायत समिती रोड, पालम, तालुका पालम, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पालम, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नितीन चंपतराव आजबे, : अपिलार्थी
मु. निपाणी टाकळी, पो. ढे. पिंपळगांव, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी
जन अपिलीय अधिकारी, :
उपजिल्हाधिकारी कार्यालय, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२०१
२ सुनावणीची तारीख दि. १२-०१-२०१२
३ आज रोजीची उपस्थिती
३.१ अपिलार्थी : अनुपस्थित
३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी
- श्री. सतीश सोनी
३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित
उप विभागीय अधिकारी, सेलू, तालुका सेलू,
जिल्हा परभणी

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०७-२०११
५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख दि. --
६ प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०८-२०११
७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख दि. २५-०८-२०११

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १२-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये त्यांनी दिनांक २८-०६-२०११ रोजी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितली आहे. कार्यवाही अपूर्ण असल्यामुळे माहिती देण्यात आली नाही. चौकशी प्रक्रिया पूर्ण झाली आहे व त्याची कागदपत्रे अपिलार्थीस दिनांक ०३-०९-२०११ रोजी दिली आहे. अपिलार्थीने ती स्विकारली आहे. अपिलार्थी चौकशी प्रक्रियेत सहभागी होते.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नितीन चंपतराव आजबे, मु. निपाणी टाकळी, पो. ढे. पिंपळगांव, तालुका सेलू, जिल्हा परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सेलू, तालुका सेलू, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हबीब अहेमद उर्फ हम्मू चाऊस पि. हबीब अब्दुला, : अपिलार्थी
रा. मंगळवारा, शाही मस्जीद जवळ,
तालुका जिल्हा परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी<br>- श्री. एन. जी. ठाकूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २५-०७-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०७-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हबीब अहेमद उर्फ हम्मू चाऊस पि. हबीब अब्दुला, रा. मंगळवारा, शाही मस्जीद जवळ, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजू बाबुराव जाधव, : अपिलार्थी
मु. पो. माळहिवरा, तालुका जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली,
जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी, :
उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली,
जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - प्रतिनिधी श्री. गोपाळ बन्सीराम जाधव यांचेसह | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली,<br>जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी,<br>उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली,<br>जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०६-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १५-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी त्यांचे प्रतिनिधी श्री. गोपाळ बन्सीराम जाधव यांचे सह उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना सुनावणीस बोलाविले नाही किंवा त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३०-०६-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. राजू बाबुराव जाधव, मु. पो. माळहिवरा, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, हिंगोली, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. एम. एस. बोधणे, : अपिलार्थी

प्रताप नगर, नांदखेडा रोड, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

उपसंचालक, आरोग्य सेवा, महात्मा गांधी चौक, मेन रोड, लातूर

जन अपिलीय अधिकारी, :

उपसंचालक, आरोग्य सेवा, महात्मा गांधी चौक, मेन रोड, लातूर

१ अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३६७

२ सुनावणीची तारीख दि. १२-०१-२०१२

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी : अनुपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित

मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय उपसंचालक, आरोग्य सेवा, महात्मा गांधी चौक, मेन रोड, लातूर

- श्री. पी. जी. मालचे

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : अनुपस्थित

उपसंचालक, आरोग्य सेवा, महात्मा गांधी चौक, मेन रोड, लातूर

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. १८-०७-२०११

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२-०८-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १८-०८-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, श्री. एम. एस. बोधने यांचा दिनांक १८-०७-२०११ रोजीचा माहिती अर्ज त्यांच्या कार्यालयास दिनांक २१-०७-२०११ रोजी प्राप्त झाला. माहिती देण्यासाठी त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक १९६०७/११, दिनांक १२-०८-२०११ अन्वये माहिती १४९ पानाची असल्याने व अपिलार्थीने माहितीची रजिस्टर पोस्टाने मागणी केली असल्याने रुपये ३६८ /- चलनाव्दारे रक्कम भरणा करणेबाबत अर्जदारास कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत कळविण्यात आले. तसेच दिनांक १७-०८-२०११ रोजी दूरध्वनीव्दारेही रक्कम भरणेबाबत कळविण्यात आले आहे. अपिलार्थीने रक्कम भरल्याचे चलन प्राप्त झाले नसल्यामुळे त्यांना माहिती पाठविण्यात आली नाही व सदर बाबीची पुर्तता करणेबाबत अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे.

यानंतर अर्जदारांनी दिनांक १८-०८-२०११ रोजी प्रथम अपील अर्ज पाठविला आहे. सदर अपील अर्ज त्यांच्या कार्यालयास दिनांक २०-०८-२०११ रोजी प्राप्त झाला आहे व अपील सुनावणी दिनांक १६-०९-२०११ रोजी ठेवण्यात आली, याबाबत अपिलार्थीस कळविण्यात आले. तथापि अपिलार्थी सुनावणीस उपस्थित राहिले नाही त्यामुळे अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पुन:श्च संधी देऊन व चलन भरणा करुन माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत अर्जदारांस कळवणेबाबत निर्णय घेतला व कार्यालयाचे पत्र क्रमांक २२२७९/ ११, दिनांक १६-०९-२०११ अन्वये अपिलार्थीस कळविण्यात आले आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०६-११-२०११ च्या पत्रान्वये विनामूल्य माहिती देण्याबाबत विनंती केली त्यानुसार कार्यालयाचे पत्र क्रमांक २६४५९/११ दिनांक १६-११-२०११ अन्वये मुद्दा क्रमांक १ ते ६ ची माहिती स्पीड पोस्ट व्दारे अपिलार्थीस विनामूल्य पाठविण्यात आली. तसेच मुद्दा क्रमांक ५ ची जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड / उस्मानाबाद यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती कार्यालयाचे पत्र क्रमांक ५८३/१२ दिनांक ०७-०१-१२ अन्वये पाठविण्यात आली आहे.

वरील सर्व बाबीवरुन तसेच कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या माहिती अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार विहित मुदतीत शुल्काचा भरणा करण्याकरिता अपिलार्थीस कळविण्यात आले आहे आणि अपिलार्थी यांना ते पत्र प्राप्त झाले आहे. असे अपिलार्थी यांच्या दिनांक २३-०९-२०११ रोजीच्या द्वितीय अपिलावरून दिसून येत आहे. यामुळे अपिलार्थी यांना विनाशुल्क माहिती देण्याची केलेली कारवाई योग्य नाही असे

आयोगाचे मत आहे. अपिलार्थी यांचे बरेच माहितीचे अर्ज तसेच द्वितीय अपीले आहेत व ते दारिद्र्यरेषेखालील नाहीत त्यामुळे त्यांनी माहितीकरिता शुल्क भरणे आवश्यक ठरत होते. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते असे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अर्जावर सत्वर माहिती मिळण्याकरिता सकारात्मक भूमिका घेऊन प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी उपस्थित राहणे आवश्यक ठरत होते, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एम. एस. बोधणे, प्रताप नगर, नांदखेडा रोड, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, कार्यालय उपसंचालक, आरोग्य सेवा, महात्मा गांधी चौक, मेन रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा, महात्मा गांधी चौक, मेन रोड, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,<br>बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उमाकांत गणपतराव शेट्टे, : अपिलार्थी<br>शिवगण निवास, सताने निवास समोर, बिदर रोड, उदगीर,<br>जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी<br>विभागीय कर्मचारी अधिकारी (मा.आ.), राज्य परिवहन<br>महामंडळ विभाग, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :<br>विभाग नियंत्रक, राज्य परिवहन लातूर विभाग, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विभागीय कर्मचारी अधिकारी (मा.आ.), राज्य परिवहन महामंडळ विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक, राज्य परिवहन लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०५-२०११ (मुंबई कार्यालयाकडे प्राप्त ) <br> २६-०९-२०११ (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १०-०३-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, लातूर विभाग, लातूर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, लातूर विभाग, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-०३-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १२-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उमाकांत गणपतराव शेट्टे, शिवगण निवास, सताने निवास समोर, बिदर रोड, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी अधिकारी (मा.आ.), राज्य परिवहन महामंडळ विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मात्रे आर.एल. : अपिलार्थी

रा.सुकळीवीर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
विशेष समाजकल्याण कार्यालय,हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय समाजकल्याण अधिकारी,
समाजकल्याण कार्यालय,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२१७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक आयुक्त,समाजकल्याण विभाग, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. व्ही.एन.मईंग, कनिष्ठ लिपीक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. अरवत बी.जी.समाजकल्याण अधिकारी,वर्ग-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०८.०१.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०६.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७.०९.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रे व युक्तिवादावरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थीने या प्रकरणात त्यांचे प्रथम अपील मुदतीनंतर सादर केले आहे. त्यासंदर्भात संयुक्तिक कारण न दिल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळले. द्वितीय अपील अर्ज व मूळ अर्जावरुन त्यांना माहिती न मिळाल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जावरुन त्यांना मौ. कांडली, ता.कळमनुरी, जि.हिंगोली येथील पशुसंवर्धन (पदविका) या विद्यालयासंदर्भात सन २००३ ते २०१० सालाबाबत शिष्यवृत्तीचे वाटपासंदर्भात माहिती मागितली आहे. अशाप्रकारे मागील ८ वर्षात सुमारे १००० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती व १००० विद्यार्थ्यांच्या संदर्भातील माहितीची कागदपत्रे फार मोठया प्रमाणात होत असल्यामुळे देणे व्यवहार्य ठरत नाही.

या सर्व बाबी विचारात घेता विचाराधीन माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस सन २००३ ते २०११ पर्यंत प्रतिवर्षी शिष्यवृत्ती देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या व प्रतिवर्षी देण्यात आलेली शिष्यवृत्तीची एकूण रक्कम अपिलार्थीस कळविण्यात यावी, असे आयोगाचे निदेश आहेत.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मात्रे आर.एल.रा.सुकळीवीर, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,विशेष समाजकल्याण कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक उपायुक्त, विभागीय समाजकल्याण कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अब्दुल गफार अब्दुल जब्बार खान,<br>रा.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>विभाग प्रमुख,<br>नगर परिषद कार्यालय,परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,परभणी | : | |

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५६१ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.०६.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांचे द्वितीय अपील माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये विहित मुदतीत सादर केलेले नाही. तथापि सुनावणीसाठी दाखल करुन घेण्यात येत आहे. अपिलार्थी यांना विनामूल्य माहिती देण्यात यावी, असा निर्णय

तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,परभणी यांनी घेतल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देण्यात आली किंवा कसे ही बाब कागदपत्रांवर उपलब्ध नाही. याकरिता प्रकरण उपआयुक्त, महानगरपालिका,परभणी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी प्रकरणात पुन्हा सुनावणी घ्यावी व विलंब झाला असल्यास संबंधितांवर त्यांच्या स्तरावर उचित कारवाई करावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका,परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. १७.०६.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल गफार अब्दुल जब्बार खान,एकबाल नगर,परभणी

२. जन माहिती अधिकारी, मिटींग विभाग,महानगरपालिका कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका कार्यालय,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप भानुदासराव बोरुळ, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
व्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५९८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी-श्री. उगले गो.वा. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्र.महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी - श्री. पी.डी.भाले | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.०७.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २०.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.०९.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १७.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. ०२.०७.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये त्यांच्या स्वत:संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला त्यावेळी सदरची संचिका अवर सचिव (उद्योग-८) मंत्रालय यांच्याकडे सादर करण्यात आली होती. त्यामुळे संचिका प्राप्त होताच संचिकेच्या झेरॉक्स प्रती आपणास देण्यात येतील असे दि. २९.०७.२०११ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत कळविलेले आहे. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, परभणी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १५.०९.२०११ रोजी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. सदरची संचिका आता जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध झाली असल्याकारणाने अपिलार्थीस विनामूल्य माहिती द्यावी अशी अपिलार्थी यांनी विनंती केल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी तसा निर्णय घेतला, असे जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास कथन केले व त्याचदिवशी अपिलार्थीस माहिती देण्यात आली.

अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. त्यांचे दि. १३.१०.२०११ रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये द्वितीय अपील सादर करण्यासाठीच्या प्रयोजनामध्ये संपूर्ण माहिती त्यांना प्राप्त झाली नाही, असे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीच्या वेळी या तीनही मुद्यांशी संबंधित कागदपत्रांची पाहणी अपिलार्थीस देण्यात आली असून या तीनही मुद्यांच्या माहितीसह एकूण ५८९ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप भानुदासराव बोरुळ, वझे यांचा वाडा, जिवन कलामंदिर समोर, विद्यानगर,

परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र, परभणी - यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शिंदे बालासाहेब बन्सीधरराव, : अपिलार्थी
रा. कानसुर, ता.पाथरी, जि.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,पाथरी, जि.परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार,
तहसील कार्यालय,पाथरी, जि.परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल/पुरवठा), तहसील कार्यालय,पाथरी,जि.परभणी -श्री. एम.जी.दासुद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, पाथरी, जि.परभणी- श्री. बालाजी शेवाळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.०९.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पाथरी, जि. परभणी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जान्वये मौ.कानसुर, ता.पाथरी येथील एका त्रयस्थ केरोसीन विक्रेत्याची ऑगस्ट, २००५ ते अर्ज करण्याच्या तारखेपर्यंतची (दि.१८.०७.२०११) वाटप रजिस्टर,पावती बुक, स्टॉक रजिस्टर, कॉटम रजिस्टर इ.माहिती मागितली आहे. माहिती त्रयस्थ दुकानदारांकडे उपलब्ध आहे. ती दुकानदाराकडून जन माहिती अधिकारी यांच्याकडे संकलीत होण्यास काही कालावधी लागला. ही माहिती एका महिन्याच्या आत देणे शक्य नव्हते. माहिती एकत्र करुन अपिलार्थी यांना दि. ०३.१०.२०११ रोजी देण्यात आली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि. ०३.१०.२०११ रोजीच्या माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पु), पाथरी यांना लिहिलेल्या पत्रांवरुन माहिती दिल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बालासाहेब बन्सीधरराव शिंदे, मु.पो.कानसुर, ता.पाथ्री, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल/पुरवठा), तहसील कार्यालय,पाथरी,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, पाथरी, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. भांबळे बाबासाहेब जिजाभाऊ,<br>रा.सावंगी (भा.), ता.जिंतूर,<br>जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,जिंतूर,<br>जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपजिल्हाधिकारी,<br>उपजिल्हाधिकारी कार्यालय,सेलू, जि.परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. भांबळे बाबासाहेब जिजाभाऊ | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय,जिंतूर,जि.परभणी - श्री. देशमुख जयराज सदाशिव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी,सेलू, जि.परभणी | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी -श्री.व्ही. के.आंभूरे, अव्वल कारकून. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२.०८.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १५.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २८.०९.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २१.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना आजपावेतो मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, जिंतूर यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी सावंगी (भां), ता.जिंतूर या गावातील स्वस्तधान्य दुकानांचा परवाना व रॉकेल वितरणासंदर्भात काही माहिती मागितली आहे. मौ. सावंगी (भां) या गावात एकच स्वस्तधान्य दुकान आहे व सन १९९७ मध्ये सदर स्वस्त धान्य दुकानदारास रॉकेल वितरणाचा परवाना देण्यात आला होता. ही माहिती स्वस्त धान्य दुकानदाराकडे उपलब्ध असल्याकारणाने माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध करुन घेण्याकरिता स्वस्त धान्य दुकानमालकास दि. २०.०८.२०११ रोजी अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करण्यात आले आहे. यावर त्रयस्थ दुकानदार यांनी दि. ३१.०८.२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे की, मागितलेल्या माहितीची एकूण पृष्ठे ५११७ इतकी होतात व त्यासाठी खर्चाची रक्कम ₹१०,२३४/- होईल. अपिलार्थीस शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता कळविण्यात आले आहे. कारण अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. अपिलार्थीस दि.१०.०९.२०११ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे की, त्यांनी मागितलेली माहिती स्वस्त धान्य दुकानदाराकडून मागविण्यात आली आहे. कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून हस्तगत करुन घ्यावी व यावर अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही. तदनंतर पुन्हा अपिलार्थीस दि. २७.१२.२०११ रोजी जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे की, उपलब्ध असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन पाहू शकतात व त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य पुरविण्यात येईल. अपिलार्थी यांनी यासंदर्भात प्रतिसाद दिलेला नाही.

राज्य माहिती आयोगासमोर सादर केलेल्या युक्तिवाद व कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी सन १९९७ ते २०१० या कालावधीची विस्तृत माहिती मागितलेली आहे. अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची व्याप्ती फार मोठी असल्याकारणाने तीस दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती पुरविणे शक्य नव्हते, ही बाब आयोगास मान्य होणारी आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती स्वस्तधान्य दुकानदाराकडून संकलीत करुन घेऊन शुल्काची रक्कम अपिलार्थीस कळविलेली आहे व तदनंतर अपिलार्थीस विनामूल्य माहिती देऊ केली आहे. तथापि अपिलार्थी यांनी यासंदर्भात प्रतिसाद दिलेला नाही.

या सर्व बाबी विचारात घेता या टप्प्यावर अपील बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाबासाहेब जिजाभाऊ भांबळे, रा.सावंगी (भां), ता.जिंतूर,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,जिंतूर,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,सेलू, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सफीयोद्दीन वलियोद्दीन काझी,<br>रा.गंगाखेड, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>भांडारपाल,<br>नगर परिषद कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, गंगाखेड, जि.परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - भांडारपाल,नगर परिषद कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी- श्री. डी.एस.मोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी- श्री. गणेश चव्हाण | : | उपस्थित |
| ३.४ | जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे वकील ॲड.अरुण व्ही.राख | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १५.०२.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०३.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी त्यांच्या वकिलासह उपस्थित आहेत.

जन माहिती व अपिलीय अधिकारी त्यांच्या वकिलासह आयोगासमोर त्यांची बाजू मांडण्यास तयार आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २३.०२.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सफीयोद्दीन वलियोद्दीन काझी,रा.सिव्हील कोर्टाच्या पाठीमागे,गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा भांडारपाल,नगर परिषद कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय,गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

सौ. प्रभावती एकनाथ राऊत, : अपिलार्थी
रा.परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय,परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी,
नगर परिषद कार्यालय,परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६५० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१०.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०८.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०३.१०.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे आयोगातर्फे सदर प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याचा

निर्णय घेण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची पुढील सुनावणी दि. २२.०२.२०१२ रोजी दुपारी ०३.०० वा. होईल. या सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. प्रभावती एकनाथराव राऊत, अग्नीशामक दल क्वॉर्टर,नगर परिषद,परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, महानगरपालिका,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मधुकर हिराजी मुळे,<br>रा.पुर्णा, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपव्यवस्थापक (बँकींग व अकौंटस)<br>दि. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,<br>जि.मुख्य शाखा,परभणी | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपव्यवस्थापक (बँकींग व अकाऊन्टस)<br>दि. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,<br>जि.मुख्य शाखा,परभणी | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६५२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मधुकर हिराजी मुळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहव्यवस्थापक (प्रशासन)दि. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जि.मुख्य शाखा,परभणी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.०७.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही, असे दिसून येत आहे. मा.उच्च न्यायालयाने सहकारी बँकांसंदर्भात दिलेले निर्णय तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुनावणी घेऊन यथोचित निर्णय घेण्यासाठी आयोगातर्फे प्रकरणात विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे. त्यांच्याकडे अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपील अर्जाच्या प्रतीसह प्रकरण पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. २०.०७.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मधुकर हिराजी मुळे, शिवाजी रोड, मुळे गल्ली, पूर्णा, ता.पूर्णा,जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा सहव्यवस्थापक (प्रशासन),दि. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,

जि.मुख्य शाखा,परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दिलीप बळवंतराव डासाळकर, : अपिलार्थी
रा.सेलु, जि.परभणी.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (मा),
शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, परभणी
जन अपिलीय अधिकारी, :
शिक्षण विभाग (माध्यमिक),
जिल्हा परिषद, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६५४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. दिलीप बळवंतराव डासाळकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपशिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, परभणी- श्री. एन.जी.ठाकूर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, परभणी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०८.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंनी आयोगासमोर आपला युक्तिवाद कथन केला. अपिलार्थी यांनी दि. ०५.०८.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये परभणी जिल्हयातील खाजगी अनुदानित शाळेतील अनधिकृत शिक्षक-कर्मचारी पत्रकारांवर तात्काळ कार्यवाही करणेबाबत माहिती मागितलेली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रे यावरुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०९.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमत: सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जि.प.परभणी यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा),जि.प.परभणी यांनी अपिलार्थीच्या दि. ०९.०९.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १२-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप बळवंतराव डासाळकर, अत्रेनगर, सेलू, जि.परभणी-४३१ ५०३.

२. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (मा.),जिल्हा परिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा.),जि.प.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती जैतुनबी शेख सुलतान,<br>रा.निपानी टाकळी,<br>ता.सेलू, जि.परभणी | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, बुद्रुक हिंगणी, ता.धारुर,<br>जि. बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय,धारुर,जि.बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६६३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १२-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती जैतुनबी शेख सुलतान | : | अनुपस्थित |
| ३.२ | अपिलार्थी यांच्यातर्फे ॲड. एम.एस.कोकाटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, हिंगणी (बु.), ता.धारुर,जि. बीड - श्री. डांगे एम.बी. | : | उपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन माहिती अधिकारी -श्री. डिगे सी.जी. व श्री. करपे बी.बी. | : | उपस्थित |
| ३.५ | श्री. व्ही.बी.येळंबकर, विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, धारुर,जि.बीड | : | उपस्थित |
| ३.६ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर,जि.बीड - श्री. एम.एल.गेडेकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०६.०५.२०११ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.०६.२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २५.०७.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २९.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंनी आयोगासमोर आपला युक्तिवाद कथन केला. अपिलार्थी यांच्या वकिलांनी आयोगासमोर कथन केले की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या एकूण ८ मुद्यांपैकी काही माहिती त्यांना प्राप्त झाली आहे. मुद्दा क्र. ५ व ६ संदर्भातील माहितीची आवश्यकता नाही. तथापि त्यांना खालील माहिती प्राप्त झालेली नाही.

१) मुद्दा क्र. ३ मधील त्रयस्थ श्री. हरि नारायण सोळंके यांची गाव नमुना नं. ८ ची नक्कल (घ.नं.३१५) व श्री. बबन रंभा माके यांची गाव नमुना नं. ८ची नक्कल.

२) मुद्दा क्र. ४ मधील घर नं. ३१५ ची कोणत्या कागदपत्रांच्या आधारे नोंद झाली, त्या कागदपत्राची नक्कल

३) मुद्दा क्र. ७ मधील जुना घर क्र. ७१ श्री. बागवन यांच्या नावाच्या घराची नक्कल, नवा घर नं. ९८ ची नक्कल व नमुना नं. ८ ची नक्कल.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी कथन केले की, सदरची मूळ कागदपत्रे त्यांच्या अभिलेखावर उपलब्ध नाहीत. शोध घेऊनही सापडली नाहीत. आयोगाने यासंदर्भात कोणत्या रजिस्टरवर नोंद असू शकते, याची विचारणा केली असता असे कथन केले की, करपात्र इमारतीच्या कर आकारणी रजिस्टरमध्ये नोंद असू शकते. कारण सर्व मालमत्तांची सर्वेक्षणानुसार नोंद घेतलेली असते. यावर आयोगाने सूचित केल्याप्रमाणे उपलब्ध रजिस्टरमध्ये असलेली माहिती झेरॉक्स प्रतीच्या स्वरुपात देण्यात आली. आयोगासमोर अपिलार्थी यांच्या वकिलांनी ती स्वीकारली.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक १२-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती जैतुनबी शेख सुलतान, रा.निपानी टाकळी, मु.पो.ढेगळी पिंपळगाव (पोस्ट), व्हाया मानवत,ता.सेलू, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, हिंगणी (बु.), ता.धारुर,जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, धारुर,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सतीश चन्नविरजी डोणगावकर,<br>उदगीर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, पुरवठा विभाग,<br>तहसील कार्यालय, उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर,<br>जि.लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२०६२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६/०४/२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | --/०४/२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९/०५/२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८/०८/२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी दि. ०६.०४.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये एकूण ५ त्रयस्थ स्वस्तधान्य दुकानांची एपीएल गहू व तांदुळ परमीटच्या

छायाप्रती अशी सन जानेवारी, २००६ ते डिसेंबर,२००९ या कालावधीची माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. यासाठी जन माहिती अधिकारी यांनी संबंधित स्वस्तधान्य दुकानदारांकडून ही माहिती त्यांच्या कार्यालयामध्ये मागवून अपिलार्थीस या माहितीची पाहणी देऊ करणे व तदनंतर त्यांना आवश्यक काही कागदपत्रे देण्यासंदर्भात निर्णय घेणे उचित राहिले असते. अशाप्रकारचा निर्णय संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनीही या प्रकरणी घेतल्याचे दिसून येत नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांनी या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन अधिनियमातील तरतुदीनुसार सुनावणी घेऊन यथोचित निर्णय घेण्यासाठी आयोगातर्फे प्रकरण त्यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.०९.०५.२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सतीश चन्नवीरजी डोणगावकर, बस्वेश्वर चौक, रेल्वेस्टेशन रोड, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,पुरवठा विभाग, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय,उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. देविदास रामराव गायकवाड, : अपिलार्थी
जुना औसा रोड,लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - निरीक्षक, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | सहायक माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक - श्री. चिलकावार राजेश्वर राजलिंग | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. सहायक जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी दि. १२.०१.२०१२ अन्वये त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, - "श्री. देविदास रामराव गायकवाड यांनी माहिती अधिकार अधिनियम - २००५ अंतर्गत मागणी केलेली माहिती ही या कार्यालयाच्या अधिपत्याखालील अनुदानीत मिलींद कनिष्ठ महाविद्यालय, लातूर यांचेशी संबंधित असल्यामुळे सदर अर्ज डाक नोंद पत्र क्र.१२३० दि. १५.१०.२०११ अन्वये संबंधित महाविद्यालयाकडे वर्ग करण्यात आला होता. त्यानुसार संबंधित महाविद्यालयाकडून अर्जदारास पूर्ण माहिती न दिल्यामुळे अर्जदारानी त्यांचे अर्ज दि. ०५.११.२०११ अन्वये अपील अर्ज सादर केल्याप्रमाणे सदर अपील अर्ज डाक नोंद पत्र क्र. १३४७ दि. १९.११.२०११ अन्वये प्राचार्य तथा अपिलीय अधिकारी, मिलींद कनिष्ठ महाविद्यालय,लातूर यांचेकडे वर्ग करण्यात आला होता. तथापि संबंधितास काही माहिती अर्जदारास दिले नव्हते, म्हणून दि. ०७.०१.२०१२ रोजी या कार्यालयात अर्जदारास व संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यास बोलावून घेवून माहिती देण्यास सुचना देण्यात आले. त्यानुसार प्राचार्य तथा अपिलीय अधिकारी मिलींद कनिष्ठ महाविद्यालय, लातूर यांनी त्यांचे पत्र क्र. १४५/२०१२ दि. ११.०१.२०१२ अन्वये श्री देविदास रामराव गायकवाड यांना दि. ११.०१.२०१२ रोजी हस्तदेय माहिती दिली. त्यानुसार संबंधित माहिती मिळाल्याचे पोहच पत्र दिले आहे. तसेच सविनय कळविण्यात येते की, श्री देविदास रामराव गायकवाड यांनी सदर अपील माघारी घेत असल्याचे दि. ११.०१.२०१२ रोजी लिहून दिले असून सदर पत्र यासोबत जोडून सादर करण्यात येत आहे."

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०१-२०१२**

--------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. देविदास रामराव गायकवाड, "श्री मावूली",दत्त मंदिरमागे ड्रायव्हर कॉलनी, जुना औसा रोड, लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. यशवंत गणपतराव कुलकर्णी, : अपिलार्थी
रा.लाळी (खुर्द), ता.जळकोट, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक, लाळी (खुर्द),
ता.जळकोट, जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, जळकोट, जि.लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२३८ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. यशवंत गणपतराव कुलकर्णी | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक, लाळी (खुर्द), ता.जळकोट, जि.लातूर- श्री. भोसले एस.यु. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, जळकोट, जि.लातूर- श्री. बी.आर.दापके | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३.०५.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३.०६.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.०७.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी दि. १३.०५.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, लाळी (खु), ता.जळकोट, जि.लातूर यांच्याकडून एकूण १२ मुद्यांवर विस्तृत स्वरुपात विविध विषयावर ग्रामपंचायतीची माहिती मागितली आहे. या माहितीकरिता ₹१३२०/- इतक्या शुल्काचा भरणा करावा म्हणजे माहिती देता येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी कलम ७(१) नुसार विहित मुदतीत दि. १६.०५.२०११ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पत्र पाठविले आहे व त्यासंदर्भातील पोस्टाची पावती त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे. तदनंतर अपिलार्थीस पुन्हा एकदा जन माहिती अधिकारी यांनी पोस्टाने दि. ०४.०७.२०११ रोजीच्या पत्राद्वारे अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे स्मरणपत्र पाठविले आहे व शुल्काचा त्वरित भरणा करावा म्हणजे माहिती देता येईल,असे कळविले आहे. यासंदर्भात पोस्टाचा दाखला त्यांच्या अभिलेखात उपलब्ध आहे. हे ही पत्र अपिलार्थीस मिळाले नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, जळकोट, जि.लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. दि. २६.०७.२०११ रोजी शुल्काचा भरणा करुन माहिती द्यावी, असा निर्णय दिला आहे. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार आहेत, असेही दिसून येत आहे.मागील दोन वेळेचा अनुभव विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर दि. २९.०७.२०११ रोजीच्या पत्राद्वारे ₹१३२०/- शुल्काचा भरणा करावा, अशी विनंती करणारे पत्र अपिलार्थीकडे खासदुतामार्फत पाठविल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी ते पत्र घेण्यास नकार दिला, अशी दोन पंचांनी नोंद केली आहे. अपिलार्थी दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. अपिलार्थी यांनी दि. १०.०८.२०११ रोजी या माहिती अर्जासंदर्भात ग्रामसभेच्या वेळी शुल्क घेऊन माहिती देण्यात यावी, अशी विनंती करणारा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिला. सदर अर्ज ग्रामसेवकांनी स्वीकारला नाही व यावर दोन पंचांनी नोंद केली आहे. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा करुन माहिती मिळविणे योग्य ठरत आहे. याकरिता त्यांनी शुल्काची रक्कम पंधरा दिवसांच्या आत भरणा करावी व पुढील पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस देण्यात यावी, या

निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. यशवंत गणपतराव कुलकर्णी, रा. लाळी (खुर्द), पो.मंगरुळ, ता.जळकोट, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, लाळी (खुर्द),ता.जळकोट, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, जळकोट, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. प्रमोद दिगंबरराव बिरादार, : अपिलार्थी
रा. वाढवणा (बु.),ता. उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, वाढवणा (खु.),उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. प्रमोद दिगंबरराव बिरादार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, वाढवणा (बु.),वाढवणा (खु.),ता.उदगीर, जि.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, उदगीर,जि.लातूर- श्री. पाटील ए.पी. | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी -गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर,जि.लातूर - श्रीमती यु.पी.बिरादार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१.०६.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०७.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०८.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी दि. ०१.०६.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये गट विकास अधिकारी,पंचायत समिती, उदगीर यांच्याकडे वाढवणा (बु.), वाढवणा (खू.), आडोळवाडी, किनी व सुकणी या पाच ग्रामपंचायतीमध्ये प्राप्त झालेला निधी, करापोटी जमा रक्कम व खर्चाचे तपशील पावत्यासह, मासिक बैठक व ग्रामसभा ठराव अशी विस्तृत माहिती मागितली आहे. माहितीचा कालावधी दि. ०१.०४.२००९ ते ३१.०५.२०११ असा दोन वर्षे आहे. अपिलार्थी यांनी ५ ग्रामपंचायतीची माहिती मागितली आहे. सदरची माहिती ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध असते. अशाप्रकारे गावाच्या ग्रामसेवकास जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित केले आहे. त्यांच्याकडे सरळ अर्ज करणे अपेक्षित आहे.  तथापि अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा अर्ज गट विकास अधिकारी यांच्याकडे केलेला आहे. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी जरी पाचही ग्रामपंचायतीकडे अधिनियमातील कलम ६(३)(एक)नुसार अर्ज वर्ग केला तरी प्रभावीपणे माहिती मिळणे शक्य होणार नाही, असे आयोगाचे मत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक ठरते. तथापि अपिलार्थी यांना आयोगातर्फे सूचित केल्याप्रमाणे या अर्जाच्या अनुषंगाने मागितलेल्या माहितीची व्याप्ती स्वेच्छेने कमी करुन फक्त मौ. वाढवणा (बु.) या गावाशी संबंधित माहिती मिळावी, अशी त्यांनी विनंती केली व उर्वरित माहितीकरिता स्वतंत्रपणे अर्ज करतील.

याकरिता गट विकास अधिकारी यांना पहावे लागेल की, संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाढवणा (बु.) अपिलार्थीस एका महिन्याच्या आत माहिती पाठवतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, वाढवणा (बु.) यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी व ही कार्यवाही होईल याची गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर यांनी स्वतः खातरजमा करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रमोद दिगंबरराव बिरादार, मु.पो.वाढवणा (बु.), ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, वाढवणा (बु.),उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विजयकुमार गुरनाथ पवार, : अपिलार्थी
रा.सोमनाथपुर, ता.उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपुर,
ता.उदगीर,जि.लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,उदगीर,जि.लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३४३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विजयकुमार गुरनाथ पवार | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,सोमनाथपुर, ता.उदगीर,जि.लातूर - श्री. राठोड सिताराम हरिलाल | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर - श्री. पाटील ए.पी. | : | उपस्थित |
| ३.३ | गट विकास अधिकारी,पंचायत समिती,उदगीर,जि.लातूर - सौ. यु.पी.बिरादार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १९.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर, जि.लातूर उपस्थित आहेत.

दोनही बाजूंनी आयोगासमोर युक्तिवाद मांडला. आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी ग्रामपंचायत कार्यालय, सोमनाथपुर येथील विविध मुद्यांवर विविध योजनेमधील सर्व कामांसंदर्भात विस्तृत माहिती मागितली आहे. या माहितीमध्ये ग्रामपंचायतीला प्राप्त झालेला निधी, ती रक्कम कोणकोणत्या कामावर खर्च केली, त्याची लेखी स्वरुपात माहिती, सरपंच किशन नामदेव चव्हाण यांना आजपर्यंत किती मानधन दिले ते मानधन चेकद्वारे की रोख रक्कम दिली, त्यांना दिलेल्या रकमेची पावती, चेकची प्रत, बर्फाचा कारखाना लगत असलेल्या जुन्या विहिरीच्या बाजूने खोदकाम व कॉंक्रीट मालात भिंत बांधकामासाठी शासनाकडून एकूण निधी किती प्राप्त झाला, तो निधी कोणत्या योजनेतून देण्यात आला त्या बांधकामाचे मूल्यांकन प्रत, सभागृहाचे बांधकामासाठी वैज्ञानिक विकास मंडळ, तांडावस्ती सुधार योजना या दोन योजनेच्या निधीतून कोणत्या योजनेच्या निधीतून सभागृहाचे बांधकाम घेण्यात आले, त्या दोन्ही कामाच्या मूल्यांकनासह माहिती देणे, सानेगुरुजी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था सोमनाथपूर या घरात अतिक्रमण केलेल्या लोकांचे फेरफार व नमुना नं. ८ ला नोंदी कोणत्या पुरावे आधारे घेण्यात आल्या ते पुरावे व नमुना नं. ८ च्या प्रती, भ्रष्टाचार अभियान प्रमुख श्री.सोपान कांबळे यांच्या मिळकतीबाबत, यशवंत ग्राम समृध्दी योजना, महात्मा गांधी तंटामुक्त समिती, विद्युत मोटार,पाईपलाईन योजना, तांडा वस्ती सुधारयोजना- या मुद्यांचा समावेश होता. अशा व्यापक स्वरुपाच्या १६ मुद्यांसंदर्भात अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जात माहिती मागितली आहे. तथापि माहितीचा कालावधी नमूद केलेला नाही. तथापि त्यांना सध्याचे सरपंच यांच्या कार्यकाळातील माहिती आवश्यक आहे, असे सुनावणीच्या वेळी केलेल्या युक्तिवादावरुन दिसून येत आहे. बऱ्याच मुद्यांवर लेखी स्पष्टीकरण अपेक्षिले आहे. सदर माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मधील 'माहिती'च्या व्याख्येत बसत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २८.०७.२०११ च्या पत्रान्वये दि. १६.०८.२०११ रोजीची वेळ निश्चित करुन अधिनियमातील कलम ७(१) नुसार विहित मुदतीत कळविले आहे की, सर्व मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याकारणाने ग्रामपंचायतीमध्ये त्यांना पाहणी देण्यात येईल. अपिलार्थी यांना दि. ०२.०८.२०११ रोजी पत्र प्राप्त झाले आहे. तथापि त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(ज) नुसार माहितीच्या अधिकारात पहिला पाहणीचा पर्याय आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी पाहणी देऊ केली आहे. ही बाब आयोगास योग्य वाटते. त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी कलम ७(९) नुसार जन माहिती अधिकारी यांनी माहितीची पाहणी द्यावी व आवश्यक तेवढया माहितीच्या झेरॉक्स प्रती द्याव्या, असा निर्णय दिला आहे. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते. या सर्व बाबी विचारात घेता त्याचप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार

दिलेली पाहणी आयोगास योग्य वाटते. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही व ही सर्व माहिती छायाप्रतींच्या स्वरुपात पाहिजे, असा त्यांनी युक्तिवाद केला आहे. अशाप्रकारे अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय यापूर्वी देण्यात आलेले आहेत. अपिलार्थीला माहितीची पाहणी देऊ केली आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

या सर्व बाबी विचारात घेता अपील या टप्प्यावर फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजयकुमार गुरनाथ पवार, रा.सोमनाथपुर, ता.उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,सोमनाथपुर, ता.उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मासुमखान इस्माईलखान पठाण, : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षण उपसंचालक,लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४२० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शिक्षणाधिकारी (मा.), जि.प.लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. आत्राम आर.जी.,कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षण उपसंचालक,लातूर | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. रा.न.गारकर, शिक्षण उपनिरीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०४.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०५.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०९.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. २६.०५.२०११ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये दि. ०१ जून, २०१० ते ३१ मार्च,२०११ पर्यंत लातूर जिल्हयातील माध्यमिक शिक्षकांना देण्यात आलेल्या वैयक्तिक मान्यतेच्या संच मान्यता, रिक्त जागेचा तपशील दर्शविणारे प्रपत्र, आरक्षण तक्ता, जाहिरात, सेवाज्येष्ठता यादी, शाळा समिती ठराव, न्यायालयीन प्रकरणाची यादी, जातीचे प्रमाणपत्र, रुजू अहवाल, नेमणूक आदेश व अनुदान मंजूरीच्या आदेशाची प्रत अशी विस्तृत माहिती मागितली आहे. ही माहिती एका महिन्याच्या आत संकलीत करणे शक्य नव्हते त्यामुळे अपिलार्थीस विहित मुदतीत देता आली नाही. याकरिता अपिलार्थीस दि. १२.०१.२०१२ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पाहणीकरिता कळविले आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दहा दिवसांच्या आत माहिती द्यावी, असा निर्णय घेतला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रे त्याचप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप विचारात घेता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार पाहणी दिली आहे, ही बाब आयोगास योग्य वाटते. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही व ही सर्व माहिती छायाप्रतींच्या स्वरुपात पाहिजे, असा त्यांनी युक्तिवाद केला. अशाप्रकारे अशी माहिती एकत्रित करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपेक्षित नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज अव्यवहार्य ठरतो. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. प्रसंगी अशाप्रकारच्या माहिती अर्जांवर माहिती देण्याची आवश्यकता नाही असे निर्णय केंद्रीय माहिती आयोगाने यापूर्वी घेतलेले आहेत.तथापि जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अभिलेखाची पाहणी देऊ करण्याची भूमिका घेतली आहे. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील तसेच अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध

करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मासुमखान इस्माईलखान पठाण, आयेशा कॉलनी, खोरी गल्ली, लातूर-४१३ ५३१.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा), जिल्हा परिषद,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सोनटक्के शिवाजी त्रिंबकराव,<br>रा. लोहारा, ता.उदगीर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वैद्यकीय अधिकारी (प्राथमिक),<br>आरोग्य केंद्र हेर, ता.उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५०८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सोनटक्के शिवाजी त्रिंबकराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - वैद्यकीय अधिकारी, प्रा.आरोग्य केंद्र, हेर, ता.उदगीर,जि.लातूर - डॉ. वाघमारे महेश मल्लीकार्जून | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी- डॉ.बोडके एन.डी.,प्रशासन अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १४.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.०७.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंनी आपले म्हणणे आयोगासमोर कथन केले. आयोगापुढील युक्तिवाद व कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांनी एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. त्यापैकी मुद्दा क्र.४ व ५ ची माहिती अपूर्ण मिळाली आहे, असे त्यांच्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी नमूद केले आहे. प्रथम अपिलावरील सुनावणीनंतर मुद्दा क्र. ४ व ५ ची माहिती देण्यात आली आहे. अपिलार्थी यांना ही माहिती मिळाल्याचे आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांनी मान्य केले. तथापि ही माहिती खोटी आहे, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार लेखी माहिती देणे अभिप्रेत नाही. जी माहिती उपलब्ध आहे, त्यासंदर्भातील कागदपत्रांच्या प्रती देणे आवश्यक आहे. ही बाब जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. अपिलार्थी यांनी मुद्दा क्र. ४ व ५ बाबत नेमकी खोटी म्हणजे काय, याबाबत पंधरा दिवसांच्या आत कळवावे व त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती द्यावी लागेल व उपलब्ध नसल्यास तसे कळवावे लागेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने माहितीबाबत त्यांच्या कार्यालयास कळविल्यास पुढील पंधरा दिवसांच्या आत त्यासंदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज विचारात घेऊन नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सोनटक्के शिवाजी त्रिंबकराव,मु.पो.लोहारा, ता.उदगीर, जि.लातूर-४१३५१७

२. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्रा.आरोग्य केंद्र, हेर,

ता.उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती विमल गणपत निला,<br>रा.कबनसांगवी, ता.चाकुर, जि.लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्रकल्प अधिकारी,<br>एकात्मिक बाल विकास सेवा योजना, उदगीर, जि.लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी<br>(महिला व बालकल्याण),<br>जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्रीमती विमल गणपत निला | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - बाल विकास प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, उदगीर, जि.लातूर- श्री. पी.टी.बनसोडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण),जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. ए.ए.शेख, कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २३.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०१.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२.१२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १७.१०.२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी,जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंनी आपले म्हणणे आयोगासमोर कथन केले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, या प्रकरणी यापूर्वी आयोगाने अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय देण्याचे आदेशित केले होते. त्यानुसार प्रकरणात जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण),जिल्हा परिषद, लातूर यांनी पुनश्च सुनावणी घेऊन दि. ०२.०८.२०११ रोजी निर्णय दिला आहे.

आयोगापुढे सादर केलेला युक्तिवाद व कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर, अपिलकर्त्याला प्रकरणाची वस्तुस्थिती कळवावी,असा निर्णय दिला आहे. त्याप्रमाणे अपिलार्थीस दि. ०५.१०.२०११ रोजीच्या पत्राद्वारे कळविल्यचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ. विमल गणपत निला, रा.कबनसांगवी, ता. चाकूर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी,एकात्मिक बाल विकास सेवा योजना, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा

परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वसंत गणपतराव बानाटे, : अपिलार्थी
रा.भिंगोली, पो.कळमगांव, ता.शिरुर अनंतपाळ,
जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,शिरुर अनंतपाळ,जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६१३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - शाखा अभियंता,पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर - श्री. डाळे जी. सी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर - श्री. दाताळ एन.एस | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १२.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०७.२०११ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.०८.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दि. १२.०७.२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये पंचायत समितीच्या कार्यकक्षेतील दि. ०१.०१.२००९ ते ३१.०३.२०११ या कालावधीमध्ये इंदिरा आवास घरकुल योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांची नावे, झालेल्या कामाचे मुल्यांकन व अंतिमीकरण, बिलाच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत व दि.३१ मार्च, २०११ चा एम.पी.आर.ची झेरॉक्स प्रत अशी विस्तृत माहिती मागितली आहे. या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या सुमारे ३९६ असून त्यासंदर्भातील कागदपत्रांची संख्या सुमारे ४००० होते. याकरिता ₹८,०००/- खर्च लागणार आहे. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती आहेत. छायाप्रतीकरिता लागणाऱ्या एवढया खर्चासाठी निधी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. ही बाब व माहितीचे स्वरुप विचारात घेता माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार अपिलार्थीस संपूर्ण अभिलेखाची व्यक्तिशः पाहणी करावी, असे विहित मुदतीत दि. ३०.०७.२०११ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांनी कथन केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली, त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व माहितीचे स्वरुप विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी घेतलेला निर्णय कायम केला व अपिलार्थीस माहितीची पाहणी द्यावी, असा निर्णय दि. २१.११.२०११ रोजी दिलेला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व कागदपत्रे विचारात घेता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीची व्याप्ती विचारात घेऊन, कलम ७(९) नुसार माहितीची पाहणी देऊ केली व पाहणीनंतर काही आवश्यक कागदपत्रे विनामूल्य देण्याची तयारी ठेवली आहे. तथापि अपिलार्थी यांनी प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम 2 (ञ) मध्ये माहितीच्या अधिकाराचा तपशील नमूद केला आहे. पहिला पर्याय पाहणी आहे. त्याप्रमाणे पाहणी देऊ केली आहे. ही बाब आयोगास योग्य वाटते. या सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वसंत गणपतराव बानाटे,मु. भिंगोली, पो.कळमगाव,ता.शिरुर अनंतपाळ,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता,पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अनंतवाड शैलेंद्र शंकरराव, : अपिलार्थी
रा.बोरी, ता.जि.लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, लातूर
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,लातूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६१६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०५.०७.२०११ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०२.०९.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०.१०.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक ज्येष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील

कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्यावेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,लातूर यांच्याकडे प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,लातूर यांनी अपिलार्थीच्या दि. ०२.०९.२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अनंतवाड शैलेंद्र शंकरराव,रा.बोरी, ता.जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी,पंचायत समिती कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. स्वामी गणपत सिंदलिंग,<br>प्रदिप किराणा स्टोअर्स समोर, नारायण नगर, लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री देशिकेंद्र विद्यालय सिंग्नल कॅम्प, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२२३७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. स्वामी गणपत सिंदलिंग | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, श्री देशिकेंद्र विद्यालय सिंग्नल कॅम्प, लातूर<br>- सौ. मंगलगे जे. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०३-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २३-०८-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २९-०४-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १३-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती ती अपिलार्थीस देण्यात आली. जात प्रमाणपत्र उपलब्ध नव्हते ते देण्यात आले नव्हते ते आज रोजी आयोगासमोर देण्यात आले. अपिलार्थी यांनी ते स्विकारले.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. स्वामी गणपत सिंदलिंग, प्रदिप किराणा स्टोअर्स समोर, नारायण नगर, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री देशिकेंद्र विद्यालय सिंग्नल कॅम्प, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, : अपिलार्थी
ॲड गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर, तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. संजयभाऊ जयराम कांबळे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८-०२-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०७-२०११ |

फेरसादर दिनांक
१६-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

पुढील सुनावणी दिनांक २३-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी हे व्यक्तिशः उपस्थित राहतील याची व्यवस्था कृषि सह संचालक, लातूर श्री. जाधव यांना करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २३-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संजयभाऊ जयराम कांबळे, ॲड गायकवाड यांचे निवास, संत गोरोबा सोसायटी, नांदेड रोड, लातूर, तालुका जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अहमदपूर, जिल्हा लातूर यांना

या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. कृषि सह संचालक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. तिवारी विद्याधर प्रसाद रामप्रसाद,<br>घर नं. ३-२-१९४, शिवाजी हौसिंग सोसायटी, बसस्टँड समोर, उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, गांधी चौक, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. तिवारी विद्याधर प्रसाद रामप्रसाद | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी., कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. गारकर आर. एम. शिक्षण उप निरीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २१-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २४-०८-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०७-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०८-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २६-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण तीन मुद्दयावर माहिती मागितली आहे. त्यातील एका मुद्दयाची माहिती त्यांना मिळाली आहे.

खालील दोन मुद्दयाची माहिती मिळालेली नाही.

१. विचाराधीन दिनांक ०९-०४-२०१० च्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी पाठपुरावा केलेल्या अहवालाच्या प्रती.

२. वरील निर्णयावर संस्थेने केलेल्या अंमलबजावणीबाबतच्या प्रती.

ही माहिती अपिलार्थीस एका महिन्याच्या आत देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर सांगितले.

अपिलार्थी हे जेष्ठ नागरिक आहेत. त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. त्यांनी माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे. याकरिता जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना परत एकदा त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी सुनावणीस पुढील तारीख देण्यात येत आहे.

पुढील सुनावणी दिनांक २३-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २३-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. तिवारी विद्याधर प्रसाद रामप्रसाद, घर नं. ३-२-१९४, शिवाजी हौसिंग सोसायटी, बसस्टँड समोर, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, गांधी चौक, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बुदरे अमोल रामराव,<br>मु. पो. नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, कै. नरसिंगराव चव्हाण प्राथमिक विद्यालय,<br>नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, कै. नरसिंगराव चव्हाण प्राथमिक विद्यालय,<br>नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर<br>- सौ. ए. के. बिरादार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. जी. माने, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. प्रतीवर दिनांक नाही |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३-०७-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०८-०९-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २६-०९-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज त्यांच्याकडे दिनांक २०-०७-२०११ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीकरिता आवश्यक शुल्काचा भरणा करण्याकरिता अपिलार्थीस दिनांक ११-०८-२०११ रोजी कळविण्यात आले. अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०९-२०११ रोजी शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस दिनांक ०९-०९-२०११ रोजी माहिती तयार असल्याचे पोस्टाव्दारे कळविले आहे. अपिलार्थी प्रत्यक्ष माहिती घेणार होते. तथापि त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

प्रसंगावशात अपिलार्थी यांनी मागितलेली हीच माहिती दोनदा त्यांचे लहान बंधू यांनी पोस्टाव्दारे मागितली आहे व ती त्यांना मिळाली आहे.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रे पाहता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने पाठवून द्यावी या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बुदरे अमोल रामराव, मु. पो. नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कै. नरसिंगराव चव्हाण प्राथमिक विद्यालय, नळेगांव, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिंदे प्रल्हाद रामचंद्र,<br>सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, रस्ता क्रमांक ८, पदमा सदन, लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>शिक्षण विभाग (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२३९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (प्रा.), जिल्हा परिषद, लातूर - श्री. एस. जी. माने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-०८-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६-०९-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक २१-०५-२०११ च्या माहिती अर्जान्वये लातूर तालुक्यातील १४१ खाजगी शाळांचा पट पडताळणी अहवाल व शाळानिहाय संच प्रत अशी माहिती मागितली आहे. ही माहिती देण्यासाठी रुपये १७०० इतका खर्च येत असून त्यासाठी आपण सदरील रक्कम चलनाव्दारे भरणा करुन चलनाची प्रत सादर करावी म्हणजे पुढील कार्यवाही अनुसरण्यात येईल असे अपिलार्थीस विहित मुदतीत दिनांक १०-०६-२०११ रोजी कळविले. तथापि अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थी व्यक्तिशः माहिती नेणार होते. उपरोक्त सर्व बाबी कागदपत्रावरुन दिसून येत आहेत.

अत: अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे रुपये १७०० इतक्या रक्कमेचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे करणे आवश्यक आहे. असा भरणा अपिलार्थी यांनी पंधरा दिवसाच्या आत करावा. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस माहिती पाठवावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने पंधरा दिवसाच्या आत शुल्काचा भरणा केल्यास अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने माहिती पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिंदे प्रल्हाद रामचंद्र, सिध्दार्थ हौसिंग सोसायटी, रस्ता क्रमांक ८, पदमा सदन, लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (प्रा.), जिल्हा परिषद,

लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुर्यवंशी संभाजी वामनराव,<br>व्दारा, गोंड काशिनाथ, रुकमे नगर, अहमदपूर,<br>जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४४६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. एस. जी. माने, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.५ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. व्ही. व्ही. तसलगे, कार्यालय अधीक्षक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-१०-२००९ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १५-०३-२०१०<br>फेरसादर दिनांक<br>०४-१०-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) नुसार दिनांक २९-०९-२००९ रोजी विहित मुदतीत कळविले आहे की, आपल्या माहिती अर्जान्वये मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. माहितीचा कालावधी जून २००६ ते सप्टेंबर २००९ असा आहे. करिता सर्व माहिती संकलीत करण्यास कार्यालयास बराचसा कालावधी लागणार आहे. याकरिता आपणास नेमकी कोणती माहिती हवी आहे ही माहिती समक्ष कार्यालयात उपस्थित राहून पाहून घ्यावी. तथापि अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक ११-१२-२००९ रोजी सुनावणी घेतली घेऊन निर्णय निर्गमीत केला आहे की, माहिती अधिकारी यांनी एक आठवड्याच्या आत अर्जदारास विनामूल्य माहिती द्यावी. प्रथम अपील सुनावणीस अपिलार्थी उपस्थित होते.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जून २००६ ते सप्टेंबर २००९ अशा तीन वर्षाच्या कालावधीतील जिल्हा परिषद, लातूर येथे प्राप्त तक्रारीच्या सर्व सत्यप्रती मागितल्या आहेत. त्याचप्रमाणे संबंधितांना दिलेले पत्र, कारणे दाखवा नोटीसा इत्यादी वरची मोघम व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. नेमकी तक्रार किंवा व्यक्तीचा उल्लेख केला नाही. ही माहिती एकत्र करण्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचे मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. माहिती अधिकार अधिनियमतील कलम ७ (९) नुसार ही बाब अपेक्षित नाही. अपिलार्थी यांनी अशा प्रकारची मोघम, विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील उद्दिष्टे सफल होत नाहीत व अर्ज अव्यवहार्य ठरुन त्याचे गांभीर्य नष्ट होते असे आयोगाचे मत आहे. तसेच अशा माहिती अर्जावर विचार करता येणार नाही असे निर्णय प्रसंगी घेण्यात आलेले आहेत. या सर्व बाबी विचारात घेता हे प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुर्यवंशी संभाजी वामनराव, व्दारा, गोंड काशिनाथ, रुकमे नगर, अहमदपूर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सगर सुधीर व्यंकटराव,<br>मु. पो. किल्लारी, तालुका औसा, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२४७९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. सगर सुधीर व्यंकटराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>अधीक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर - श्री. एस. जी. माने | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-०५-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-१०-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी दिनांक २१-०५-२०११ रोजीच्या माहिती अर्जान्वये संचिका क्रमांक ५३ या क्रमांकाच्या संचिकेतील मान्य टिपणीच्या छायांकीत प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी यांनी ही माहिती व्यक्तिशः मागितली आहे. अपिलार्थी हे जिल्हा परिषदेचे कर्मचारी आहेत. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०३-०६-२०११ च्या पत्रान्वये अपिलार्थीस रुपये ३० इतक्या शुल्काचा भरणा करावा व माहिती व्यक्तिशः घेऊन जावी असे कळविल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यास प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे पंधरा दिवसाच्या आत शुल्काचा भरणा करावा व शुल्काचा भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाच्या संदर्भातील माहितीच्या प्रती देण्याची व्यवस्था करावी. मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घ्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी पंधरा दिवसाच्या आत शुल्काचा भरणा केल्यास अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जाच्या संदर्भात माहिती अपिलार्थीस द्यावी. अपिलार्थी यांनी ही माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घ्यावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सगर सुधीर व्यंकटराव, मु. पो. किल्लारी, तालुका औसा, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक वर्ग-२, शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, : अपिलार्थी
शिवगण निवास, सत्ताने निवास समोर, बिदर रोड, उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
आगार प्रमुख, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, औसा,
आगार विभाग, लातूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,
विभागीय कार्यालय, लातूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२५५३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, औसा,<br>जिल्हा लातूर - श्री. जाधव मुरलीधर पांडुरंगराव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,<br>विभागीय कार्यालय, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. देशमुख<br>शिवाजी प्रल्हादराव, विभागीय वाहतुक अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ११-०१-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. १०-०३-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२-०५-२०११ (मुंबई कार्यालयाकडे प्राप्त)<br>२६-०९-२०११ (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांचा दिनांक ११-०१-२०११ चा माहितीचा अर्ज आगार प्रमुख, औसा आगार विभाग, लातूर यांच्याकडे प्राप्त झालेला नाही, त्यामुळे त्यांना त्यावर कारवाई करता आली नाही. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, रा. प., लातूर यांच्याकडे दिनांक १०-०३-२०११ रोजी प्रथम अपील केले. त्यावर दिनांक २८-०४-२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीचा अर्ज दाखल न झाल्याची नोंद घेऊन अपील निकाली काढण्यात आले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ श्री. एन. आर. सुर्यवंशी, चालक यांच्या जुलै १९८९ ते जून १९९१ या कालावधीमधील पगारपत्रकाच्या सत्यप्रती मागितल्या आहेत. या कालावधीतील श्री. एन. आर. सुर्यवंशी, चालक हे येथे कार्यरत नव्हते. त्यामुळे माहिती देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे व्दितीय अपील आयोगाच्या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०१-२०१२**

-------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, शिवगण निवास, सत्ताने निवास समोर, बिदर रोड, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन महामंडळ, औसा, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विजयकुमार राजेंद्र पाटील कोनाळीकर,<br>व्दारा, शिव - गंगा बिल्डींग, २ रा मजला, रघुकुल मंगल कार्यालयाजवळ, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, प्रियदर्शनी उच्च माध्यमिक विद्यालय, साकोळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण), जिल्हा परिषद, लातूर | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६१० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. विजयकुमार राजेंद्र पाटील कोनाळीकर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य प्रियदर्शनी उच्च माध्यमिक विद्यालय, साकोळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. आत्राम आर. जी. कक्ष अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २७-०६-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०-०७-२०११ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६-०८-२०११ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १९-१०-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी त्यांचे म्हणणे मांडले.

आयोगापुढील युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक १६-०८-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे आढळून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्या समस्येवर तोडगा सुनावणीच्या वेळी ते काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी घोषित केले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या प्रथम अपिलावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे अभिप्रेत आहे. याकरिता प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १६-०८-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक १३-०१-२०१२** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजयकुमार राजेंद्र पाटील कोनाळीकर, व्दारा, शिव - गंगा बिल्डींग, २ रा मजला, रघुकुल मंगल कार्यालयाजवळ, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य प्रियदर्शनी उच्च माध्यमिक विद्यालय, साकोळ, तालुका शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. डी. बी. सरोदे,<br>प्रोफेसर, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/२६३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. १३-०१-२०१२ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ - श्री. सुभाष म. बच्चुवार | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>संचालक शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी - श्री. संजय क. वासनिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०४-२०११ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३-०६-२०११ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६-०७-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९-०७-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २४-१०-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक ११-०१-२०११ च्या पत्रान्वये प्रकृती अस्वस्थामुळे सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्यामुळे प्रकरणात सुनावणीस पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली आहे. त्यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आयोगास आवश्यक वाटते म्हणून सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे.

पुढील सुनावणी दिनांक २३-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

या व्दितीय अपिलाच्या सुनावणीकरिता पुढील तारीख देण्यात येत आहे. पुढील सुनावणी दिनांक २३-०२-२०१२ रोजी सकाळी ११-०० वाजता वाजता ठेवण्यात येत आहे. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व वस्तुनिष्ठ माहितीनिशी व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक १३-०१-२०१२**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. डी. बी. सरोदे, प्रोफेसर, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर, जिल्हा लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, शिक्षण व अधिष्ठाता पशुविज्ञान, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, तेलंगखेडी, नागपूर-१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.